# तृतीय वर्ष कला

## सत्र - VI (CBCS)

## मराठी अभ्यासपत्रिका क्र. VII

# भाषाविज्ञान आणि मराठी व्याकरण

## विषय कोड : 86616

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्राध्यापक डॉ. डी. टी. शिर्के**
स्थानापन्न कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राचार्य डॉ. अजय भामरे**
स्थानापन्न प्र-कुलगुरु,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवर**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्रकल्प समन्वयक** : **प्रा. अनिल आर. बनकर**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग व
प्रमुख, मानव्यविद्याशाखा,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**अभ्यास समन्वयक** : **प्रा. बालाजी ग्यानोबा कांबळे**
मराठी विभाग (आयडॉल),
दूर व मुक्त अध्ययन संस्था, (आयडॉल)
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**लेखक** : **डॉ. गोविंद काजरेकर**
मराठी विभाग प्रमुख,
गोगटे-वाळके महाविद्यालय, बांदा,
सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग

: **प्रा. रुपाली कांबळे**
मराठी विभाग,
सतीश प्रधान ज्ञानसाधना कॉलेज,
ठाणे

**एप्रिल २०२३, मुद्रण - १**

**प्रकाशक** : संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

**अक्षर जुळणी व मुद्रण** : मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०००९८

# अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १) | शब्दांचे वर्गीकरण - पारंपारिक व आधुनिक | ०१ |
| २) | विकरण | २३ |
| ३) | शब्दसिध्दी | ४७ |
| ४) | प्रयोग विचार | ७१ |


❖❖❖❖

# तृतीय वर्ष बी. ए. सत्र – VI
# अभ्यासपत्रिका क्र. 7
# 'भाषाविज्ञान आणि मराठी व्याकरण'

नमूना प्रश्न पत्रिका गुण – 100

**सूचना:**

1) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
2) अंतर्गत पर्याय लक्षात घ्यावेत .
3) प्रश्नांसमोरील अंक गुण दर्शवितात .

**1.** पारंपरिक व्याकरणातील शब्द म्हणजे काय ते सांगून नाम व सर्वनाम या शब्दजातींचा परिचय करून द्या. (२०)

किंवा

शब्दांच्या नव्या वर्गीकरणाचा आढावा घ्या.

प्रश्न २.भाषेतील लिंग विकार म्हणजे काय? स्वरूप वैशिष्ट्याची चर्चा करा. (२०)

किंवा

विभक्ती म्हणजे काय? विभक्तीचे प्रकार सांगा.

प्रश्न ३. शब्दसिद्धीचे प्रत्यय मांडून मराठीतील शब्दसिद्धीचा सविस्तर आढावा घ्या. (२०)

किंवा

शब्दसिद्धी म्हणजे काय ते सांगून सिद्ध शब्द आणि साधित शब्द यांचे सोदाहरण विवेचन करा.

प्रश्न ४. भावेप्रयोग आणिसंकीर्ण प्रयोगाच्या व्याख्या मांडून त्यांच्या प्रकारांचे विस्तृत विवेचन करा. (२०)

किंवा

प्रयोगविचार हा वाक्यविचार आहे, असे का म्हटले जाते ते सांगून त्याआधारे दामलेकृत प्रयोगव्यवस्थेची

चर्चा करा.

टिपा लिहा. (कोणतेही चार ) (२०)

१) विशेषणाचे प्रकार सांगा
२) संबोधनविभक्ती
३) सामासिक शब्द
४) प्रयोगसंकल्पना
५) शब्दयोगी अव्यय व्याख्या व प्रकार
६) पंचमीविभक्ती
७) अभ्यस्त शब्द
८) कर्तरी प्रयोग

❖❖❖❖

# १

# शब्दांचे वर्गीकरण – पारंपरिक व आधुनिक

**घटक रचना**


१.१ उद्दिष्टे

१.२ प्रस्तावना

१.३.१ शब्दाच्या व्याख्या

१.३.२ शब्दांचे वर्गीकरण - पारंपरिक शब्दजातिविचार

१.३.३ नामाची वैशिष्ट्ये

१.३.४ विशेषनाम

१.३.५ धातूची वैशिष्ट्ये

१.3.६ क्रियाविशेषण

१.3.७ उभयान्वयी अव्यय

१.3.८ उभयान्वयी अव्यय याचे प्रकार

१.४ स्वाध्याय

१.५ संदर्भ ग्रंथ


## १.१ उद्दिष्टे

- विद्यार्थ्यांना शब्दाचे वर्गीकरण करता येईल .
- भाषेत शब्दाला महत्वाचे स्थान आहे याची ओळख होईल .
- व्याकरणात वर्ण विचारानंतर शब्द विचार यांची ओळख होईल .
- भाषिक वर्णमाला समजून येईल .
- नामाचे प्रकार विस्ताराने समजण्यास मदत होईल .
- मराठी व्याकरणाची ओळख विस्ताराने होईल .
- मराठी व्याकरण कारांची ओळख होईल .

## १.२ प्रस्तावना

व्याकरणात वर्णविचारानंतर शब्दविचार केला जातो. ‘शब्द’ संज्ञा व्यवहारात व्यापक अर्थाने वापरली जाते. कोणत्याही अर्थपूर्ण वर्णसमूहाला शब्द असे म्हटले जाते. वाक्य हे शब्दांनी बनलेले असते, असेही म्हटले जाते. मात्र कोशातील शब्द आणि वाक्यातील शब्द यांचे स्वरूप व्याकरणिकदृष्ट्या वेगळे मानले जाते. वाक्यातील शब्दांना प्रत्यय जोडलेले असतात. म्हणून त्यांना ‘पद’ ही संज्ञा वापरली जाते. शब्दांना अर्थ असतो पण प्रत्ययांना अर्थ नसतो. मात्र प्रत्यय शब्दांना जोडले जातात, तेव्हा शब्दांची विशिष्ट रूपे तयार होतात.

### १.३.१ शब्दाच्या व्याख्या :

शब्दाच्या व्याख्या करण्याचे प्रयत्न व्याकरणकारांनी केलेले दिसतात.

१)’संकेताने किंवा रूढीने अर्थ दाखविणारा जो वर्णसमुदाय त्यास शब्द म्हणतात.’– **कृष्णशास्त्री चिपळूणकर**

२)’बाह्य किंवा अंत:सृष्टीतील कोणतीही वस्तू दाखविणाऱ्या वर्णास किंवा वर्णसमुदायास शब्द म्हणतात.’ **– मो. के. दामले.**

३)’वर्णांचा उपयोग करून आपण कल्पना व्यक्त करणारे ध्वनिसमुदाय निर्माण करतो. त्या ध्वनिसमुदायांना शब्द म्हणतात’. **– ना. गो. कालेलकर**

सारांश शब्द तयार होण्यासाठी अर्थपूर्ण वर्णसमुदायाची आवश्यकता असते. केवळ वर्णसमुदाय असून उपयोगाचे नाही तर त्या समुदायास समर्पक अर्थ असणे आवश्यक असते. राम, आंबा, डोंगर, इमारत, गवत हे अर्थपूर्ण शब्द होत.

### १.३.२ शब्दांचे वर्गीकरण - पारंपरिक शब्दजातिविचार :

शब्दांचे वर्गीकरण कोणत्या निकषांनी करावे यामध्ये व्याकरणकारांमध्ये मतभेद असलेले दिसतात. मराठी शब्दजाती विचारावर संस्कृत, आणि इंग्रजी भाषेचा प्रभाव असलेला दिसतो. पंडिती व्याकरणात सांगितलेल्या आठ भाषणप्रकाराच्या आणि इंग्रजीतील Part of Speech च्या आधारे दादोबा पांडुरंग तर्खडकर, मो. के. दामले यांनी आठ शब्दजाती मानलेल्या दिसतात.

दादोबा पांडुरंग यांनी सविभक्तिक आणि अविभक्तिक असे प्रकार पाडले तर मो. के. दामले यांनी त्यांनाच विकारी आणि अविकारी अशी संबोधने योजली आहेत. सविभक्तिक किंवा विकारी या प्रकारात नाम, सर्वनाम, विशेषण आणि क्रियापद या चार उपप्रकारांचा समावेश केला तर अविभक्तिक किंवा विकारी या प्रकारात क्रियाविशेषण, शब्दयोगी, उभयान्वयी आणि केवलप्रयोगी या चार उपभेदांचा समावेश केला आहे. दामले आणि दादोबांच्या विचारांवर इंग्रजी व्याकरणाचा प्रभाव असलेला दिसतो.

म. पा. सबनीस यांनी शब्दांचे चार प्रकार मानले

१) पूर्णार्थ शब्द

२) अर्धार्थ शब्द (सर्वनाम, उभयान्वयी, केवलप्रयोगी)

३) ईषदर्थ शब्द (धातू, उपसर्ग)

४) निरर्थक शब्द (शब्दयोगी, कालार्थ प्रत्यय, साधित प्रत्यय) सबनीसानी शब्दांचा व्यापक विचार करून प्रत्यय आणि उपसर्ग यांनाही वर्गीकरणात स्थान दिले आहे.

चिपळूणकरांच्या मते शब्दांच्या मुख्य शब्दजाती तीनच आहेत.

१) प्रातिपदिक (नाम, सर्वनाम, विशेषण)

२) धातू

३) अव्यय

हे तीन होत. अव्ययांचे भेद त्यांना मान्य नाहीत.

अरविंद मंगरूळकर यांना विकारी अविकारी अशी विभागणी मान्य नसून त्यांच्या मते, " ज्यांना आपण विकारी वा सव्यय म्हणतो ती काहीवेळा बदलत नाहीत त्यांना कोणतेही विकार होत नाहीत उदा. उंच, गोड ही विशेषणे" म्हणून त्यांनी विकार होणाऱ्या शब्दांना विकारसह आणि विकार न होणाऱ्या शब्दांना विकारासह अशा संज्ञा वापरल्या आहेत.

शब्दांच्या वर्गीकरणात व्याकरणकारामध्ये मतभेद असले तरी विकार होणारे आणि अविकारी रहाणारे शब्द ही तत्त्वे अनेकांना मान्य असलेली दिसतात. या आधारे मराठी व्याकरण विचारातील पारंपरिक शब्दजातीचे स्वरूप पाहता येईल.

**नाम**

नाम ही पहिली शब्द जाती होय. या शब्दाचा वापर व्यापक अर्थाने केला जातो.

**नामाच्या व्याख्या :**

१) 'पदार्थाचे नाव मग ते पदार्थ प्रत्यक्ष दिसोत किंवा त्यांचा नुसता संस्कार मनाच्या ठाई असो' – **दादोबा पांडुरंग**

२) 'ज्या शब्दापासून संख्या, लिंग इत्यादिकांनी परिच्छिन्न म्हणजे युक्त अशा पदार्थांचा बोध होतो व तो पदार्थ जेव्हा विशेष्य असतो म्हणजे त्याचा विभक्ती किंवा शब्दयोगी अव्यय यामध्ये न येता दुसऱ्या शब्दावर अन्वय होत नाही अशा शब्दास नाम म्हणावे' - **चिपळूणकर**

३) 'वास्तविक किंवा काल्पनिक सृष्टीतील कोणतीही वस्तू दाखवणारा जो विकारी शब्द त्यास नाम म्हणतात.'

**- मो. के. दामले**

४) 'नाम म्हणजे वस्तूचा वाचक असा सहजलिंगी शब्द.' **-अरविंद मंगरूळकर**

### १.३.३ नामाची वैशिष्ट्ये :

१) नाम हा एक वस्तूवाचक शब्द आहे.

२) नामाने दाखवली जाणारी वस्तू कधी वास्तव सृष्टीतील प्रत्यक्ष असेल, तर कधी काल्पनिक सृष्टीतील अप्रत्यक्ष असेल. उदा. माणूस, घोडा, झाड, पर्वत हे प्रत्यक्ष वास्तवातील तर सुख, चिंता, शौर्य हे काल्पनिक व अप्रत्यक्ष होत.

३) नाम या शब्दातून प्राणी, पदार्थ व त्यांच्या ठिकाणचे धर्म यांचा बोध होतो.

४) नाम ही विकारी शब्दजाती असून तिला लिंग, वचन, विभक्ती हे प्रमुख विकार होतात काही वेळा अव्ययांचा ही विकार होतो.

५) सर्वनामे, विशेषणे, केवलप्रयोगी अव्यय असलेले शब्द सुद्धा नामाच्या ठिकाणी येतात व त्यांचा नामाप्रमाणे उपयोग होतो. उदा. 'शहाण्याला शब्दाचा मार.'

६) नाम ही भाषेत सर्वात जास्त वापरली जाणारी शब्द जाती आहे.

**नामाचे प्रकार**

दादोबांनी नामाचे सामान्यनाम, विशेषनाम, व भाववाचकनाम असे तीन प्रकार सांगितले. दामले यांनी या तीन प्रकारांचे 'धर्मिवाचक नाम' आणि 'धर्मवाचक नाम' अशा दोन प्रकारात विभाजन केले.

**धर्मिवाचक नाम**– 'ज्या नामाने प्राण्यांचा अथवा पदार्थांचा किंवा समुदायाचा बोध होतो त्यास धर्मिवाचक नाम असे म्हणतात.' शिवाजी, स्त्री, प्राणी, कागद, सैन्य ही धर्मिवाचक नामे होत.

**धर्मवाचक नाम**–'ज्या नामाने प्राणी अथवा पदार्थ यामध्ये वास करणाऱ्या कोणत्याही गुणधर्माचा बोध होतो अथवा भावाचा बोध होतो त्याच धर्मवाचक नाम असे म्हणतात.' दादोबानी धर्मवाचक नामांना भाववाचक नाम असे म्हटले आहे. शौर्य, विद्वत्ता, गुलामगिरी, शांतता इत्यादी.

दामले आणि दादोबा यांनी केलेल्या नामाच्या वर्गीकरणास सबनीस मंगरूळकर यांनी विरोध केला आहे. त्यांच्या मते 'या वर्गीकरणाने नामाच्या कार्यात कोणताही ही फरक पडत नाही. किंवा कार्याचा विशेष बोध होत नाही.

**पारंपरिक पद्धतीने नामाचे पुढील तीन प्रकार पाडले जातात**.

### १.३.४ विशेषनाम :

**१) विशेषनाम** – 'ज्यां नामानी एका धर्मीचा म्हणजे प्राण्याचा, पदार्थाचा किंवा त्याच्या समुदायाचा बोध होतो त्यास विशेष नाम असे म्हणतात, हिमालय, किशोर, महाराष्ट्र' इत्यादी. ही दामले यांनी केलेली व्याख्या महत्त्वाची आहे.

विशेष नामे ही एकवचनी असतात. बहुदा ती निरर्थक म्हणजेच अर्थहीन असतात. त्यातून त्या व्यक्तीचा, ठिकाणाचा त्याच्या वैशिष्ट्याचा बोध होत नाही. काही विशेषनामे अर्थपूर्ण असतात. कधी अर्थसंकोच्याने तर कधी अर्थविस्ताराने वापरली जातात. उदा, गोपाळ, सूर्य, चंद्र, विष्णू ही विशेषनामे अर्थशून्य असत नाहीत. वार, महिने, सण, नक्षत्रे इत्यादींची नावे विशेषनामे असली तरी ती सामान्यनामे म्हणून योजली जातात. जसे की, राहू-केतू, सोळा सोमवार इत्यादी.

**सामान्य नाम**– 'ज्या नामाने अनेक धर्मीचा अथवा धर्म समुदायाचा म्हणजे जातीचा किंवा वर्गाचा बोध होतो त्यास सामान्य नाम म्हणतात.' मनुष्य, शाई, पर्वत इत्यादी. सामान्यनाम बहुदा अनेकवचनास लागते. सामान्यनामास अर्थ असतो. या शब्दांमुळे त्यांच्या ठिकाणी असणाऱ्या सामान्य गुणधर्मांचा बोध होतो. उदाहरणार्थ, अरण्य, प्राणी, पर्वत, नदी. सामान्यनामे बहुदा संखेने मोजता येणारी नामे असतात. उदा. सात नद्या, दहा डोंगर इत्यादी.

**भाववाचक नाम**– 'पदार्थ, प्राणी अथवा व्यक्ती यांच्या ठिकाणी असणाऱ्या गुणधर्माचा बोध करणारे काही शब्द असतात त्यांना भाववाचक नाम असे म्हणतात.' दामले यांनी अशा नामास धर्मवाचक नाम असे म्हटले आहे. धर्म म्हणजेच गुणधर्म. मनुष्यत्व, पशुत्व, गोडी, उंचीही धर्मवाचक नामे होत.

**सर्वनाम**

सर्वनामही मराठीतील सर्वात वादग्रस्त शब्द जाती आहे. इंग्रजी व्याकरणातील Pronouns या शब्दासाठी पर्यायी शब्द म्हणून सर्वनाम हा शब्द वापरण्यात येतो. संस्कृत मध्ये सर्वनाम ही शब्द जाती नाही. म्हणून संस्कृतच्या आधारे मराठी व्याकरणाची संरचना करणाऱ्या चिपळूणकर, गुंजीकर इत्यादी व्याकरणकारांनी सर्वनाम ही शब्द जाती मानलेली नाही. नाम, विशेषण, धातु या शब्दजातीपासून कोणत्या तरी अर्थाचा बोध होतो पण सर्वनामापासून होत नाही. तो, ती म्हणजे नेमके कोण, हे निश्चित सांगता येत नाही.

**सर्वनामाच्या व्याख्या**

१) सर्व नामांची जी नामे म्हणजे जी सर्व प्रकारच्या नामाबद्दल येतात ती सर्वनामे होत.' - **डॉ. भांडारकर**

२) सर्वनाम म्हणजे नामाचा वारंवार उच्चार व्हावा म्हणून समयविशेषी त्याच्या स्थानी जे शब्द येतात ते प्रत्येक' -- **दादोबा पांडुरंग तर्खडकर**

३) जो विकारी शब्द विशिष्ट अर्थधोतक नसून ज्यास पूर्वापार संबंधाने सर्व प्रकारच्या नामांचा अर्थ येऊ शकतो म्हणजे जो वाटेल त्या नामाबद्दल उपयोगात येतो त्यास सर्वनाम असे म्हणतात' उदा. मी, तू, तो, हा इत्यादी - **दामले**

### सर्वनामाची वैशिष्ट्ये

१) सर्वनाम ही विकारी शब्द जाती आहे. तिला लिंग, वचन, विभक्तीचे विकार होतात. मात्र काही सर्वनामांना स्वतःचे लिंग नाही. म्हणून मंगरूळकर यांनी काही सर्वनामे समलिंगी तर काही अलिंगी असतात, असे म्हटले आहे.

२) सर्वनामांना स्वतःचा अर्थ नाही तसेच सर्वनामामुळे वस्तू, व्यक्ती अथवा त्याचा गुणधर्म यांचा बोध होत नाही. नामांचा जो अर्थ असतो तो सर्वनामांना पूर्वापार संबंधाने येत असतो. म्हणून कृ. पा. कुलकर्णी यांनी सर्वनाम हे प्रतिनाम असते, असे म्हटले आहे.

३) सर्वनामे नामाबद्दल येतात त्याप्रमाणे काही वेळा ती क्रियापदे, विशेषणे यांच्याविषयी सुद्धा येतात. उदाहरणार्थ 'आकाशाचा रंग निळा आहे, तो मला फार आवडतो'

४) सर्वनामांचा संख्येविषयी व्याकरणकारामध्ये मतभेद असलेले दिसतात. दामले यांनी मराठीत एकूण नऊ सर्वनामे मानली आहेत. ती अशी- मी, तू, आपण, स्वतः, तो, हा, जो, कोण, काय.

५) चिपळूणकरांनी मी, तू, तो, हा, जो, कोण, काय, किती अशी आठ सर्वनामे मानली आहेत. परंतु किती हे सर्वनाम फारसे महत्त्वाचे नसल्याने सात सर्वनामे मानलेली दिसतात.

### सर्वनामांचे प्रकार

सर्वनामांचे प्रकार किती व कोणते मानावेत याविषयी व्याकरणकारात मतभेद असलेले दिसतात. दादोबा पांडुरंग यांनी पाच सर्वनामे मानली आहेत. तर चिपळूणकर, जोशी यांनी सामान्य सर्वनाम यास विरोध करून चार प्रकार मानले आहेत. पुरुषवाचक, आत्मवाचक, दर्शक, अनुसंबंधी, प्रश्नार्थक आणि अनिश्चित अशी सहा सर्वनामे दामले यांनी मानली आहेत.

### पुरुषवाचक सर्वनाम

व्याकरणात पुरुष संकल्पना वक्ता किंवा लेखकाच्या दृष्टीने वापरली जाते. पहिला वक्ता किंवा लेखक. दुसरा श्रोता किंवा वाचक म्हणजेच ज्याच्याशी वक्ता बोलतो किंवा लेखक ज्याच्यासाठी लिहितो तो, आणि तिसरा ज्याच्या विषयी बोलले जाते किंवा लिहिले जाते तो. ही तीन अंगे व्याकरणात अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय पुरुष म्हणून ओळखली जातात. मी, आपण ही प्रथमपुरुषी सर्वनामे. तू, आपण ही द्वितीयपुरुषी सर्वनामे, तर तो, कोण, काय ही तृतीयपुरुषी सर्वनामे होत. दामले यांनी आम्ही, तुम्ही, ती, हे या सर्वनामांचा यात वापर केला नाही. कारण ती मूळ सर्वनामाची अनेकवचनी रूपे आहेत.

प्रथमपुरुषी सर्वनामाचे अर्थ आणि उपयोग भिन्नभिन्न रीतीने केले जातात. 'मी' या सर्व नामाचा वापर प्रथमपुरुषी एकवचनी सर्वलिंगी होतो. व्यक्ती स्वतः संबंधी बोलते तेव्हा या

सर्व नामाचा वापर करते. 'आम्ही' हे सर्वनाम प्रथमपुरुषी एकवचनी व सर्वलिंगी आहे. आम्ही म्हणजे मी चे अनेक वचन होईल. मी आणि माझ्या बरोबरचे सर्व असा आम्हीचा अर्थ होतो. काहीवेळा 'मी' या सर्वनामांचा उपयोग एकवचनी केला जातो. राजे लोक, मोठे अधिकारी, संपादक 'मी' या अर्थाने 'आम्ही' या सर्वनामांचा उपयोग करतात. उदाहरणार्थ, 'आम्ही लढाई करणार नाही.' 'आम्ही ही बातमी छापून आणू शकतो.'

तू, तुम्ही या सर्वनामांचे असेच उपयोग होताना दिसतात. ही द्वितीयपुरुषी सर्वनामे आहेत. व सर्वलिंगी आहेत. तुम्ही या सर्वनामाचा आदरार्थी वापरही होत असतो. तो, ती ही तृतीयपुरुषी एक वचनी सर्वनामे आहेत.

'आपण' हे पुरुषवाचक सर्वनाम प्रथमपुरुषी, द्वितीय पुरुषी अनेकवचनी येते. तृतीय पुरुषी आपण हे क्वचितच वापरले जाते. 'आपण हे काम करणार नाही.' प्रथमपुरुषी 'आपण माझ्याकडे कधी याल.' द्वितीयपुरुषी मी-आम्ही, तू- तुम्ही या सर्वनामा ऐवजी 'आपण' हे सर्वनाम वापरले जाते. आत्मवाचक 'आपण' आणि 'आपण' हे द्वितीयपुरुषवाचक सर्वनाम ही भिन्न आहेत.

**आत्मवाचक सर्वनामे**

'आपण', 'स्वतः' ही आत्मवाचक सर्वनामे होत. 'आपण' हे आत्मवाचक सर्वनाम एकवचनी व अनेकवचनी आहे. आपण हे पुरुषवाचक सर्वनाम फक्त प्रथमपुरुषी व द्वितीय पुरुषी अनेकवचनी येते, पण आत्मवाचक आपण हे मात्र तिन्ही पुरुषी दोन्ही वचनी येते.

'स्वतः' हे सर्वनाम मराठीत क्रियाविशेषणासारखे वापरले जाते. मात्र त्यास विभक्ती प्रत्यय लागतात. उदा., 'त्यांनी स्वतःलाच कामाला वाहून घेतले.' मराठीत आपण व स्वतः यांचा कधी कधी एकत्रित वापर केला जातो उदा., 'आपण स्वतःलाच विचारले पाहिजे.'

**दर्शक सर्वनामे**

हा, ही, हे, तो, ती, ते ही दर्शक सर्वनामे होत. या सर्वनामांच्या आधारे दूरचा किंवा जवळचा धर्म सूचित केला जातो. हा, ही, हे या सर्वनामाने जवळची वस्तू दाखविली जाते. तर तो, ती, ते या सर्वनामानी दूरची वस्तू दाखविली जाते.

**अनुसंबंधी सर्वनामे**

जी सर्वनामे एकाच वाक्यात दोन नामांना जोडून येतात त्यांना अनुसंबंधी सर्वनामे म्हणतात. जो-तो, जी-ती, जे-ते ही अनुसंबंधी सर्वनामे होत. उदा. 'जे मी काम सांगितले होते ते तू करावेस.'काहीवेळा अनुसंबंधी सर्वनाम न येता केवळ संबंधी सर्वनामे वाक्याला पूर्णत्व देतात. उदा., 'गर्जेल तो पडेल काय?' 'तळे राखी तो पाणी चाखी' इत्यादी.

**प्रश्नार्थक सर्वनामे**

ज्या सर्वनामांचा वापर प्रश्न विचारण्यासाठी केला जातो, त्या सर्वनावाना प्रश्नार्थक सर्वनामे म्हणतात. कोण आणि काय ही दोन प्रश्नार्थक सर्वनामे आहेत. कोण हे सर्वनाम प्राणी अथवा मनुष्य संबंधाने येते. उदा. 'हे काम कोणी केले?' 'तिने पत्रात काय लिहिले?' इत्यादी. याशिवाय आश्चर्य, तिरस्कार यासंबंधानेही कोण या सर्वनामाचा वापर केला जातो. उदा. 'तो कोण शहाणा लागून गेलाय?', 'काय माणूस आहे?' इत्यादी. त्यामुळे कोण, काय या सर्वनामांचे विविध अर्थ व त्यानुसार भाषेत उपयोग होत असतात.

**अनिश्चित सर्वनाम**

कोण, काय या सर्वनामांचा जेव्हा वापर होतो, मात्र त्यातून निश्चित असा कोणताही अर्थ सूचित होत नाही, तेव्हा त्यांना अनिश्चित सर्वनामे म्हणतात. 'कोणाला काय सापडेल ते घ्या.' 'कोणी काय म्हणतात ते पहा.' 'ती काय वाटेल ते म्हणते.' अशाप्रकारे वाक्यात अनिश्चितता असते, म्हणून या सर्वनामांना अनिश्चित सर्वनामे म्हणतात.

**विशेषण**

विशेषणही विकारी शब्द जाती आहे. विशेषणांना स्वतःचा अर्थ असला तरी ती नामाच्या संबंधाने येतात. नामाची माहिती व गुण दाखवण्याचे कार्य करतात.

**व्याख्या**

१) 'विशेषण म्हणजे नामाच्या गुणाचा दर्शक जो शब्द तो.' **-दादोबा पांडुरंग तर्खडकर**

२) 'विभक्ती किंवा दुसरा कोणताही प्रत्यय वगैरेमध्ये आल्यावाचून ज्या प्रातिपदिकांचा अन्वय दुसऱ्या प्रातिपदिकाशी होतो त्या प्रातिपदिकास विशेषण म्हणतात… वस्तूचा काही विशेष प्रकार किंवा गुण दाखवून त्यास इतर सजातीय पदार्थाहून निराळा करिते म्हणून यास विशेषण म्हणतात.' **- चिपळूणकर**

३) 'जो विकारी शब्द नामाची व्याप्ति मर्यादित करतो त्यास विशेषण म्हणतात.' उदा. पांढरा, लाल, एक, दोन इत्यादी.' **– मो. के. दामले**

४) 'नामाचा गुण दाखवून त्याच्या अर्थाची व्याप्ती मर्यादित करणारा सविकारी शब्द त्याला विशेषण म्हणतात.' **– ग. ह. केळकर**

वरील व्याख्यामधून ग. ह. केळकर यांनी केलेली व्याख्या ही विशेषणाचे गुणधर्म दाखवणारी व वैशिष्ट्ये सांगणारी आहे.

**विशेषणाची वैशिष्ट्ये**

१) विशेषण हे नामाचा कोणता तरी गुण दाखवते उदा. उंच झाड, पांढरा कागद.

२) सर्वच विशेषणानां स्वत:चा अर्थ नसला तरी काही विशेषणाना अर्थ असतो. उदा. गोड, प्रेमळ, शहाणा इत्यादी. तो, आमचा या विशेषणाना स्वतःचा अर्थ नाही.

३) विशेषणांचा वापर स्वतंत्रपणे होत नाही ती नामाच्या संदर्भाने येतात. नामाचे लिंग-वचनाचे विकार विशेषणाना होत असतात.

४) विशेषणे नामाबद्दल कोणतीतरी माहिती सांगतात व त्यांची व्याप्ती मर्यादित करतात. उदाहरणार्थ काळा बैल, खट्याळ मुले, प्रेमळ माणूस इत्यादी

**विशेषणाचे प्रकार**

**वाक्यातील स्थानावरुन विशेषणाचे दोन प्रकार केले जातात**.

१) अधिविशेषण – विशेष्याच्यापूर्वी म्हणजे अगोदर जे विशेषण येते त्याला अधिविशेषण असे म्हणतात. उदा. 'तुषार हा प्रेमळ मुलगा आहे.'

२) विधिविशेषण - विशेष्यानंतर येणाऱ्या विशेषणास विधिविशेषण असे म्हणतात. उदा. 'त्याचा सदरा पांढरा आहे.'

अधिविशेषण आणि विधिविशेषण यामध्ये स्थानभेद आणि अर्थभेदही आहेत.

प्रा. अरविंद मंगरूळकर यांनी विशेषणांचे विकारसह आणि विकारासह असे दोन भेद मानले आहेत.

विकारसह - ज्या विशेषणाना लिंगवचनाचे प्रत्यय लागतात त्यांना त्यांनी विकारसह विशेषणे म्हटले. पांढरा, काळा चांगला इत्यादि. अशा विशेषणांना ते 'पांढरगण' असेही म्हणतात.

विकारासह - ज्या विशेषणाना लिंगवचनाचे विकार होत नाहीत, जी नेहमी अविकृत राहतात अशा विशेषणाना मंगरूळकर यांनी विकारासह असे म्हटले आहे. त्यांना त्यांनी 'गोडगण' अशी संज्ञा दिली आहे. गोड आंबा, उंच झाड, इत्यादी.

**सिद्ध व साधित**

विशेषणांचे सिद्ध व साधित असेही दोन प्रकार केले जातात. जी विशेषणे प्रत्ययाशिवाय येतात अशा विशेषणांनी सिद्ध तर प्रत्ययासहित येणाऱ्या विशेषणाना साधित विशेषणे म्हटली जातात.

गुणविशेषणे, संख्याविशेषण आणि सार्वनामिक विशेषण असे विशेषणाचे आणखी काही प्रकार पाडले जातात. गुण दाखविणाऱ्या विशेषणाना गुणविशेषणे म्हणतात. उंच, चांगली, सुंदर, वाईट इत्यादी गुण विशेषणे होत.

नामाची संख्या सांगणाऱ्या विशेषणाना संख्याविशेषण असे म्हणतात. ज्या विशेषणाचा मुळे गुणधर्माचा बोध होत नाही तर संख्येचा बोध होतो अशी विशेषणे संख्या विशेषणे होत.

संख्याविशेषणांचे संख्यावाचक, क्रमवाचक, आवृत्तीवाचक, पृथकत्ववाचक आणि अनिश्चित असे प्रकार पाडले जातात. पंधरा, वीस, पाची, साती ही संख्यावाचक विशेषणे

होत. तर पहिला, पाचवा, शंभरावा ही क्रमवाचक संख्या विशेषणे आहेत. दुप्पट, चौपट, पाचपट, शतगुण ही आवृत्तीवाचक संख्याविशेषणे होत. ज्या विशेषणांनी पृथकत्त्वाचा बोध होतो, जसे की दररोज, दरमाणशी, प्रतिक्षण, हरेक ही विशेषणे पृथकत्ववाचक विशेषणे होत. ज्या विशेषणानी संख्येचा निश्चित असा बोध होत नाही त्यांना अनिश्चित सर्वनामे असे म्हटले जाते.

**सार्वनामिक विशेषण -** सर्वनाम किंवा सर्व सर्वनाम साधित शब्द हे नामाविषयी माहिती देण्यासाठी योजले जातात असे म. पा. सबनीस यांनी म्हटले आहे. सर्वनामासारखा दिसणारा शब्द नामाप्रमाणे येऊन त्याने नामाची वस्तू कशी आहे असे दाखवले तर त्या शब्दांना सार्वनामिक विशेषण म्हणतात. जसे 'तो मुलगा, त्याची मुलगी, तिचा प्रियकर इत्यादि. काहीवेळा सर्वनामे जशासतशीच येतात तर काही वेळेस सर्वनामाची विकृत रूपे येतात. त्याचा, त्याची ही विकृत रूपे येतात व ती विशेषणे बनतात. तो घोडा- अविकृत. त्याचा घोडा- विकृत.

### धातू किंवा क्रियापद

धातू किंवा क्रियापद हे एक महत्त्वाची शब्द जाती आहे. मराठीत धातूचा क्रियापद या नावानेच उल्लेख केला जातो. क्रियापद हे पद असते. क्रियापदाच्या मूळ रूपाला धातू ही संज्ञा वापरली जाते. क्रियापदाची व्याख्या करण्याचे प्रयत्न अनेक व्याकरणकारांनी केले आहेत.

१) 'ज्या शब्दापासून कालगत क्रियेचा बोध होतो त्या शब्दास क्रियापदे म्हणतात. क्रियापदाचे मूलभूत जे शब्द म्हणजे ज्या शब्दास प्रत्यय लागून क्रियापदे होतात, त्या मूलभूत शब्दास धातू म्हणतात.' **-चिपळूणकर**

२) 'वाक्यामध्ये सांगितलेली क्रिया पूर्ण दाखविणारा जो शब्द तो क्रियापद होय. वाक्यातील हा शब्द त्याच्यामुळे क्रियादर्शक धातूला काळ, अर्थ, पुरुष, लिंग, वचन यांचे प्रत्यय लागून बनलेला असतो.' **कृ. पा. कुलकर्णी**

३) 'वाक्यातील जा क्रियावाचक विकारी शब्दाने वाक्यास पूर्णता येते, आणि वक्त्याच्या दृष्टीने त्या क्रियेच्या आख्याताचा म्हणजे काळाचा किंवा विशेष अर्थाचा बोध होतो त्यास क्रियापद असे म्हणतात... ज्या मूळ शब्दास काही विकार होऊन म्हणजे काही प्रत्यय लागून क्रियापद बनते त्यास धातू किंवा क्रिया असे म्हणतात.' **मो. के. दामले**

वरील व्याख्यामधून धातू व क्रियापद यांचे स्वरूप स्पष्ट होत

### १.३.५ धातूची वैशिष्ट्ये

धातू म्हणजे क्रियावाचक मूळ शब्द होय.

धातूही विकारी शब्द जाती आहे. तिला लिंग, वचन, पुरुष,काळ व अर्थ असे पाच प्रकारचे विकार होतात.

**धातूचे प्रकार**

१) अर्थावरून - सकर्मक आणि अकर्मक असे दोन प्रकार पाडले जातात.

२) व्युत्पत्ती वरून - सिद्ध आणि साधित तो असे प्रकार पडतात.

३) उपयोगावरून - सहाय्य, शक्य व प्रयोजक असे तीन प्रकार पाडले जातात.

**अर्थावरून प्रकार**

धातूने दाखवलेली क्रिया कर्त्यापासून निघते व ज्या दुसऱ्या कोणावर किंवा कशावर तरी तिचा परिणाम घडतो किंवा निदान ज्याकडे तिचा रोख किंवा कल असतो त्यास त्या क्रियेचे कर्म म्हणतात. रामाने रावणास मारले. या विधानात मारण्याची क्रिया रावणावर घडली. ज्या धातूस कर्म असते ते सकर्मक आणि ज्या धातूस कर्म नसते ते अकर्मक धातू होय. क्रियादर्शक असून जे धातू अकर्मक आहेत, त्या अकर्मक म्हणण्याचे कारण असे की, त्यांनी दाखवलेली क्रिया कर्त्याच्या ठायी परिणित होते म्हणजे तिचा परिणाम दुसऱ्या कुणावर किंवा कशावर घडत नाही अथवा तिचा रोख दुसरीकडे असत नाही. आकाश निळे असते, तो राजा झाला. इत्यादी वाक्यात अकर्मक धातू आहेत.

**द्विकर्मक धातू**

काही व्याकरणकारांनी द्विकर्मक धातू मानले आहेत. अर्थात हा वादग्रस्त प्रकार आहे. ज्याला दोन कर्मे असतात ते द्विकर्मक धातू होत. 'मी लाडू आणि चकल्या खाल्या.''गुरुजी मुलांना कविता शिकवतात' या वाक्यात दोन कर्मे आहेत. मुलांना आणि कविता. इतिहास हे प्रत्यक्ष कर्म तर मुलांना हे अप्रत्यक्ष कर्म होय. असे द्विकर्मक धातूचे प्रतिपादन मंगरूळकरांनी केले आहे.

**अकर्तृक धातू**

धातूविचारातील हा वादग्रस्त प्रकार आहे. वास्तविक कोणतीही क्रिया कर्त्यावाचून घडत नाही; परंतु चिपळूणकरांच्या मते 'प्रत्येक धातू कर्म असते असा नियम नाही तसा प्रत्येक धातूस कर्ता असतोच असा नियम नाही. उजाडते, मळमळते या धातूंमध्येच कर्ता व क्रिया या दोन्ही अध्याहृत झाल्यामुळे त्यास कर्तृपदाची अपेक्षा लागत नाही...अशा क्रियापदास अकर्तृक क्रियापदे असे म्हणावे असे त्यांचे म्हणणे आहे. दादोबा पांडुरंग यांनी या क्रियापदाना भावकर्तृक क्रियापदे असे म्हटले आहे. क्रियापदाचा भाव हाच कर्ता असतो. मात्र चिपळूणकरांच्या मते, भाव हा कर्ता नसतो तर या धातूनाच कर्ता नसतो, म्हणून त्यांना भावकर्तृक म्हणण्यापेक्षा अकर्तृक म्हणणे योग्य असे प्रतिपादन केले आहे. कृ. पा. कुलकर्णी यांच्या मते 'भाषेत सर्व क्रियापदाना कर्ता असतो. काही क्रियापदांचा कर्म असते पण काही क्रियापदाना त्यांचा भावच मुख्य असतो. खरे म्हणजे भाव सर्वच क्रियापदांना असतो पण एखाद्या विशिष्ट रचनेत तो मुख्य असतो.' दामले यांनी अशा क्रियापदाना अकर्तृक असे म्हटले आहे. 'या धातूंचा उपयोग नेहमी तृतीयपुरुषी नपुसकलिंगी एकवचनी होतो' असेही त्यांनी म्हटले आहे.

**सिद्ध व साधित**

व्युत्पत्तीवरून धातूचे सिद्ध व साधित हे दोन प्रकार पडतात. सिद्ध किंवा व्युत्पन्न धातू म्हणजे जे मुळातच असतात. त्यांची व्युत्पत्ती कशापासूनही होत नाही. उदाहरणार्थ वाच, लिही, खा, जा इत्यादि. साधित म्हणजे सिद्ध धातूना प्रत्यय लागून जी धातूची रूपे बनतात त्यांना साधित धातू असे म्हणतात. उदा. खा – खाणे, जा- जाणे, माणूस- माणसाळणे, लांब- लांबणे, काढ – काढणे इत्यादि. हे धातूंचे प्रकार नाम, विशेषण, क्रियाविशेषण, शब्दयोगी अव्यय इत्यादी शब्दजाती पासूनही बनलेले असतात. यावरून दामले यांनी नामसाधित, विशेषणसाधित, क्रियाविशेषणसाधित असे त्यांचे उपप्रकार मानले आहेत.

**धातूंचे उपयोगावरून प्रकार - शक्य व प्रयोजक**

शक्य व प्रयोजक हे धातूंचे वैशिष्ट्यपूर्ण प्रकार आहेत. सिद्ध धातूला काही प्रत्यय लागून त्यातून ही रूपे तयार होतात. हे धातू मानण्याविषयी व्याकरणकारांत काही मतभेद असलेले दिसतात.

**प्रयोजक धातू**

दामले यांच्या मते जेव्हा मूळ धातूचा कर्ता आपण होऊन धातुदर्शित क्रिया करीत नाही, तर दुसऱ्याच्या प्रेरणेने क्रिया करतो असा अर्थ त्या मूळ धातूच्या विकृत रूपावरून उत्पन्न होतो तेव्हा त्या विकृत धातूस प्रयोज्य किंवा प्रयोजक धातू असे म्हणतात. जसे - कृष्णाने भीमाकडून जरासंधास मारविले. यातील मार या धातूचा मूळ कर्ता म्हणजे मारणारा जो भीम तो आपण होऊन क्रिया न करता कृष्णाच्या प्रेरणेने क्रिया करतो. मार या धातूचा मारव या विकृत रूपासून बोध होतो म्हणून मारव हा प्रयोजक धातू होय. दादोबा पांडुरंग यांच्या मते 'जे क्रियेच्या मुख्य कर्त्यास अन्याच्या प्रेरणेने गौणत्व येऊन अन्यच मुख्य कर्ता असतो येथे त्या क्रियापदाचा प्रयोजक क्रियापद म्हणतात.'

कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी प्रयोजक व शक्य धातूंची साधित धातू या गटात गणना केली आहे. प्रयोजक धातू व दुसरे शक्यार्थक धातू हे दोन्ही प्रकारचे साधित धातू मूळ धातूस 'व' प्रत्यय लागून सिद्ध होतात. प्रयोजक धातू पुढीलप्रमाणे साधले जातात. अ) मूळ धातूस प्रत्यय लागून- व, अव, अवव हे प्रत्यय लागून धातू तयार होतात. उदाहरणार्थ कर - करव, आण- आणव, माग – मागव, गाणे – गाववणे, खाणे- खाजवणे, पहाणे पाहववणे इत्यादि.

ब) मूळ धातूच्या आद्याक्षरास वृद्धी, ऱ्हास व उकारास गुण होतो. तसेच दुसऱ्या अक्षरातील ट चा ड व; त चा व होतो.

गळणे - गाळणे

वळणे वाळणे

टाळणे- टाळणे

तुटणे – तोडणे

गुंतणे – गोवणे इत्यादी

### शक्य धातू

काही व्याकरणकारांनी शक्य धातू हा प्रकार मानला; परंतु तो सिद्ध धातू नसून साधित धातूचाच प्रकार आहे. शक्य धातूतून कर्त्याच्या ठिकाणी क्रिया करण्याची इच्छा, अपेक्षा, सामर्थ्य, शक्यता आहे, असा भाव सूचित होतो तेव्हा त्याला शक्य धातू म्हणतात. प्रयोजक व शक्य धातू तयार होताना व, अवव हे समान प्रत्यय लागतात. प्रयोजक धातूरूपात व शक्य धातूरूपात फारसा फरक आढळत नाही. त्यातून व्यक्त होणाऱ्या अर्थात फरक जाणवतो.

यासंबंधी कृ.पा. कुलकर्णी यांनी असे म्हटले आहे की, 'धातूच्या मूळ रूपाला अव हा प्रत्यय लागून जे रूप तयार होते त्याला धातूचे प्रयोजन भेदी रूप म्हणतात. कर हे मूळ भेदी रूप + अव हा प्रयोजक प्रत्यय = करव हे प्रयोजक भेद रूप असून त्याचा अर्थ करावयास लावणे, कडून करून घेणे, करावयाची प्रेरणा करणे असा आहे. हे धातूच्या मूळ रूपावरून जे प्रयोजक रूप तयार झाले. धातूच्या शक्यार्थी रूपापासून अव प्रत्यय लागून शक्यार्थी किंवा शक्य भेदी रूप सिद्ध होते. अव हा प्रत्यय प्रयोजक आणि शक्यार्थी असे दोन्ही भेद दाखवणारा असला तरी ते दोन प्रत्यय स्वतंत्र आणि निराळे आहेत. त्यांचे रूप निराळे आहे.'

सारांश प्रयोजक व शक्य धातूची रूपे बनताना समान व्याकरणिक प्रक्रिया घडते म्हणून प्राध्यापक मंगरूळकर यांनी प्रयोजक व शक्य भेद मानण्यास विरोध केला. सकर्मक, अकर्मक आणि धातूज या तत्त्वांच्या आधारे मराठीतील धातूंचे भेद स्पष्ट होतात. त्यासाठी वेगळा प्रकार मागण्याची गरज नाही असे त्यांचे मत आहे.

### सहाय्य धातू

काही धातूंचा उपयोग धातूंचे काळ, अर्थ बदलण्याकडे होतो, म्हणून त्यांना सहाय्य धातू म्हणतात. केले पाहिजे, नको आहे, जायला हवे इत्यादी क्रियापदातील धातू सहाय्य धातू होत. हे धातू क्रियापदांच्या रूपांशी जोडले असता त्यांचा काळ व अर्थ फिरवतात. त्यांना संयुक्त क्रियापदे तयार करण्यारे धातू असेही म्हणतात. उदा. तो काम करीत आहे, त्याने काम केले पाहिजे. इत्यादि.

## १.३.६ क्रियाविशेषण

क्रियाविशेषण ही अविकारी शब्द जाती मानली जाते. मात्र काही क्रियाविशेषणाना विकार होताना दिसतात. म्हणून क्रियाविशेषण ही शब्दजाती विकारी आणि अविकारी अशा दोन्ही रूपात दिसते.

**क्रियाविशेषणाच्या व्याख्या**

१) ‘क्रियाविशेषण म्हणजे ज्या शब्दाने क्रियेच्या गुणाचा अथवा प्रकाराचा बोध होतो तो शब्द.’ **दादोबा पांडुरंग तर्खडकर**

२) ‘जी अव्यये धात्वार्थाशी किंवा विशेषणाशी किंवा धात्वार्थान्वयी दुसऱ्या अव्ययाशी अन्वय पावतात,त्यांस क्रियाविशेषण अशी पारिभाषिक संज्ञा देतात.’ **कृष्णशास्त्री चिपळूणकर**

३) ‘ज्यावेळी क्रियेचे कोणत्याही प्रकारचे विशेषत्व दाखवले जाते, म्हणजे जी क्रियेसंबंधीचे स्थल, काल, रीती, संख्या इत्यादी धर्म दाखवितात, त्यास क्रियाविशेषण म्हणतात. उदा. येथे, तेथे, लवकर, हळू इत्यादी.’ **मो. के. दामले**

४) ‘क्रियाविशेषण म्हणजे क्रियेचा विशेष दाखविणारा शब्द... त्याला कधी विभक्तिप्रत्यय लागत नाही किंवा त्याचे सामान्यरूप होत नाही. स्थळ, काळ, रीती, संख्या वगैरे हे त्या क्रियेचे अगर घटनेचे विशेष होत. हे विशेषण दाखवणारे वाक्यातील जे शब्द ते क्रियाविशेषण होत.’ **कृ. पां. कुलकर्णी**

५) म. पा. सबनीस यांच्या मते, ‘लिंग वचन या विकारास पात्र असणाऱ्या विशेषणास क्रियाविशेषण असे म्हणतात. जसे- चांगला, चांगली, चांगले. ज्या क्रियाविशेषणास लिंग, वचन किंवा कोणतेच विकार होत नाही त्यास क्रियाविशेषण अव्यय असे म्हणतात. जसे- हळू, कोठे, येथे इत्यादि.

थोडक्यात क्रियाविशेषण ही शब्दजाती विकारी आणि अविकारी अशा दोन्ही प्रकारची आहे. विशेषणासारखी शब्दजाती विकारी असूनही अविकारी असते. तिचा विकारी गटात समावेश केला त्याप्रमाणे क्रियाविशेषणाचा परंपरा म्हणून अविकारी गटात समावेश करणे योग्य होईल.

**क्रियाविशेषणाची वैशिष्ट्ये**

१) क्रियाविशेषण ही क्रियेची विशेषणे असल्याने ती क्रियेसंबंधित कोणत्यातरी प्रकारची माहिती सांगतात.

२) स्थळ, काळ, रीती, संख्या इत्यादी धर्म क्रियाविशेषणामुळे दाखवले जातात.

३) सिद्ध क्रियाविशेषणे संख्येने अल्प असून साधित क्रिया विशेषणे अधिक आहेत.

४) नामे, विशेषणे, शब्दयोगी अव्यये याना प्रत्यय लागून ती क्रियाविशेषणासारखी वापरली जातात.

५) क्रियाविशेषण ही विकारी आणि अविकारी अशा दोन्ही प्रकारची शब्द जाती असल्याने तिचे क्रियाविशेषण आणि क्रियाविशेषण अव्यय असे भेद मानावे लागतात.

## क्रियाविशेषणाचे प्रकार

### स्वरूपमूलक क्रियाविशेषण

१) सिद्ध - जे शब्द मूळचे अव्यय असून क्रियाविशेषणाप्रमाणे उपयोगात येतात त्यांना सिद्ध क्रियाविशेषण असे म्हणतात उदा. हळू, लवकर.

२) साधित - जी क्रियाविशेषणे अन्य शब्दास काही प्रत्यय किंवा शब्दयोगी अव्यय लागून तयार होतात त्यास साधित क्रियाविशेषणे म्हणतात.

अ) नामसाधित – सकाळी, रात्रीचा, प्रथमतः

ब) सर्वनामसाधित – जेणेकरून, तेणेकरून, यामुळे.

ड) विशेषणसाधित – मोठ्याने, एकदाच, चांगला, सर्वत्र.

ड) धातुसाधित – खेळताना, चालताना, निजल्यावर, बसल्यावर.

इ) अव्ययसाधित – जवळून, खालून, वरून, पूर्वीचा.

फ) समासघटित – दररोज, गावोगाव, शास्त्रीयदृष्ट्या, प्रतिक्षण.

३) **स्थानिक क्रियाविशेषण** - इतर जातीचे शब्द जशास तसे जेव्हा वाक्यात क्रियाविशेषण म्हणून वापरले जातात तेव्हा त्यांना स्थानिक क्रियाविशेषणे म्हणतात.

ती चांगली गाते, तो नकळत बोलला.

तो काय कपाळ लिहिणार?  तो काय माती शिकणार?

ती फिरून आली,  त्याने पाय वर केला.

या वाक्यात यात जी नामे आली आहेत स्थानिक क्रियाविशेषणांचे कार्य करतात.

### अर्थमूलक क्रियाविशेषण

**१) स्थलवाचक -** क्रियेचे स्थळ दाखविणाऱ्या क्रियाविशेषणांना स्थलवाचक क्रियाविशेषणे म्हणतात. इकडे, तिकडे, वर, खाली, जवळून, येथून, तेथून, मधून इत्यादि.

**२) कालवाचक -** क्रियेचा काळदर्शित करणाऱ्या क्रियाविशेषणांना कालवाचक क्रियाविशेषणे म्हणतात. त्यांचे क्षणवाचक, अवधीवाचक, पौनःपुन्यवाचक असे प्रकार पाडले जातात. आज, उद्या, काल, नंतर, आता, सध्या, हल्ली, तेव्हा (क्षणवाचक), नित्य, सदा, सर्वदा, सदोदित, रातोरात (अवधीवाचक), तर वारंवार, पुन्हापुन्हा, पुष्कळदा, क्षणोक्षणी, दरसाल (पौनःपुन्यवाचक) होत.

३) **संख्यावाचक किंवा परिमाणवाचक क्रियाविशेषणे -** क्रियेविषयी संख्येची किंवा परिमाणाची माहिती देणारी क्रियाविशेषणे म्हणजे संख्यावाचक किंवा परिमाणवाचक होत. पहिला, दुसरा, चौपट, कधीही, साफ, सर्वांशी, किंचित, जरा, थोडासा, अधिक, फार, पुष्कळ, हळू, क्रमाने, क्रमशः, इत्यादी

४) **रीतीवाचक किंवा गुणवाचक -** क्रियेची गती किंवा गुण असा अर्थ व्यक्त करणारी क्रियाविशेषणे म्हणजेच रीतीवाचक वा गुणवाचक होत. उगाच, आपोआप, जसे, तसे, जाणूनबुजून, पटकन, चटकन, भरभर, गपगप, झटपट इत्यादि.

### १.३.७ उभयान्वयी अव्यय

वाक्यातील शब्द किंवा वाक्य जोडण्यासाठी काही शब्दांचा वापर केला जातो, त्या शब्दांना उभयान्वयी अव्यय म्हणतात. हे शब्द खऱ्याअर्थी अव्यय असतात. कारण त्यांना कोणत्याही परिस्थितीत विकार होत नाहीत.

**व्याख्या**

१) ‘ज्या अवयांचा संबंध दोन शब्दांच्या अथवा दोन वाक्यांच्या परस्पर अन्वयाकडे असतो त्यास उभयान्वयी अव्यय म्हणतात.’ **- दादोबा पांडुरंग तर्खडकर**

२) ‘वाक्यार्थात जुळण्या सारखा स्वतंत्र अर्थ त्यास नसतो, परंतु त्याच्या योगाने वाक्यापासून अधिक अर्थ भासतो, त्या अव्ययास उभयान्वयी अव्यय म्हणावे.’ **- कृष्णशास्त्री चिपळूणकर**

३) ‘जे अवव्य क्रियेचे विशिष्टत्त्व न दाखविता एका वाक्याचा दुसऱ्या वाक्याशी संबंध दाखविते म्हणजे एका वाक्याची दुसऱ्या वाक्याची सांगड घालते त्यास उभयान्वयी असे म्हणतात.’ **- मो. के. दामले**

वरील व्याख्यावरून उभयान्वयी अव्ययाचे स्वरूप स्पष्ट होते. दोन वाक्य किंवा दोन शब्द जोडण्याचे काम उभयान्वयी अव्यय करतात. तसेच ती क्रियेचे विशिष्टत्व न दाखवता मूळ अर्थात भर घालीत असतात. स्वतःला अर्थ नसणे, अविकारी असणे ही उभयान्वयीची वैशिष्ट्ये होत.

### १.३.८ उभयान्वयी अव्यय याचे प्रकार

उभयान्वयी अव्यय यांचे मुख्य दोन भेद केले जातात

१) प्रधानवाक्यसूचक किंवा प्रधानत्वसूचक

२) गौणवाक्यसूचक किंवा गौणत्वसुचक

**१) प्रधानत्वसुचक**

ज्या अव्यायानी प्रधानवाक्य जोडण्यात येतात त्यास प्रधानत्वसुचक उभयान्वयी अव्यय म्हणतात. त्याचे मुख्यत्वे चार प्रकार पडले जातात.

१) समुच्चयबोधक - ज्या अव्ययांनी दोन किंवा अधिक वाक्यांचा किंवा शब्दांचा एकत्र समुच्चय किंवा संग्रह होतो त्यास समुच्चयबोधक म्हणतात. आणि, व, आणखी ही समुच्चयबोधक अव्यये होत.

२) विकल्पबोधक - ज्या अव्ययांनी दोन किंवा अधिक वाक्यापैकी किंवा शब्दापैकी कोणत्या तरी एकाचे ग्रहण होते त्यास विकल्प बोधक म्हणतात. उदा. किंवा, अथवा, अगर, की ही विकल्पबोधक उभयान्वयी अव्यये होत. त्याने शिक्षण किंवा नोकरीचा विचार करावा, त्याने प्रेम वा लग्न याचा विचार करावा.

३) न्यूनत्वबोधक - ज्या अव्ययांनी अर्थामधील काही कमीपणा दाखवण्यात येतो त्यास न्यूनत्वबोधक म्हणतात. पण, बाकी, परंतु, परी इत्यादी. त्याने अभ्यास केला पण पास झाला नाही, त्याने शेतीत खूप कष्ट घेतले परंतु मनासारखे पीक आलेच नाही.

४) परिणामबोधक ज्या अव्ययांनी यांचा उद्देश पुढे येणाऱ्या वाक्यातील अर्थ मागील वाक्याचा परिणाम आहे असे दाखविण्याचा असतो तेव्हा त्यांना परिणाम बोधक अव्यय म्हणतात तेव्हा सबब याकरिता यास्तव तस्मात इत्यादी मी तयार आहे तेव्हा तू लवकर ये तो प्रेमळ आहे म्हणून सर्वांना आवडत

**२) गौणवाक्यसूचक**

ज्या अव्ययांनी प्रधानवाक्याला अन्य गौण वाक्य जोडली जातात त्यास गौणत्व सूचक उभयान्वयी म्हणतात. त्याचे प्रकार -

अ) **कारणदर्शक** -ज्या अव्ययामुळे आधीच्या वाक्यातील क्रियेचे कारण त्या अव्यव्यानंतर येणाऱ्या वाक्यात सांगितले जाते त्यामुळे क्रियेचे कारण समजते अशा अव्ययाना कारणदर्शक असे म्हणतात. का, का की, कारण की ही कारणदर्शक अव्यये होत. तो मृत्यू पावला कारण अपघात जबरदस्त होता.

आ) **उद्देशदर्शक**– ज्या अव्ययामुळे पहिल्या वाक्यातील क्रियाचा उद्देश, दुसऱ्या वाक्यात सांगितला जातो त्यास उद्देश अव्यये म्हणतात. उदा. सबब, म्हणून, कारण, की, का की. ही अव्यये परिणाम बोधक अव्ययांसारखी असली तरी दोहोंत फरक आहे. म्हणून हे अव्यय उद्देशदर्शक म्हणूनही वापरले जाते. उदा. त्याला मरायचे होते म्हणून तो तू विष प्याला. त्याला घर सोडून जायचे होते म्हणून तो भांडला.

इ) **संकेतदर्शक** -संकेत किंवा अट असा अर्थ व्यक्त करताना या अव्ययांचा वापर केला जातो. जर-तर, जरी-तरी यद्यपि-तथापि. त्याने अभ्यास केला तरी तो पास होऊ शकला नाही, लोकांची सेवा करा म्हणजे ते तुम्हाला निवडून देतील.

ई) **स्वरूपदर्शक** - ज्या अव्ययानी दोन वाक्य जोडली जातात तेव्हा पहिल्या वाक्याचा खुलासा, त्याचे स्वरूप पुढील वाक्यात स्पष्ट होते. उदा. म्हणजे, म्हणून, कि, जे. कोबी म्हणून एक भाजी आहे, सरिता म्हणजे नदी, तो म्हणाला की मी तुमचाच आहे.

अशाप्रकारे उभयान्वयी अव्यय त्यांचा वेगवेगळ्या प्रकारे उपयोग होतो म्हणून त्यांचे प्रकार वेगवेगळे मानले जातात

**केवलप्रयोगी अव्यय**

केवलप्रयोगी अव्यय ही शब्द जाती काहीशी विवादास्पद आहे. हा शब्द एक अर्थपूर्ण ध्वनी समूह असतो. पुढील वाक्याशी त्याचा घटक म्हणून संबंध नसतो. याविषयी व्याकरणकारांत वाद असलेले दिसतात. उत्कट भावना प्रगट करण्यासाठी मुखातून काही उद्गार काढले जातात, त्यांना उद्गारवाची किंवा केवलप्रयोगी अव्यये असे म्हटले जाते. कृष्णशास्त्री गोडबोले यांनी केवलप्रयोगी अव्यय मानण्यास विरोध केला आहे. त्यांच्या मते, 'केवलप्रयोगी अव्ययांचा वाक्यात उपयोग होत नसतो; म्हणून ते शब्द व्याकरणात अनावश्यक आहेत.' आगरकरांनी ही शब्दजाती मागण्यास विरोध केला. त्यांच्यामते, 'वाक्य मीमांसेच्यादृष्टीने ही शब्दजाती मागण्याची गरज नाही. ही वाक्याच्या दृष्टीने शब्दांची विभागणी करताना शब्दांकडून होत असलेले कार्य व शब्दांचा अर्थ या दोन्ही गोष्टी लक्षात घेणे आवश्यक आहे; पण वाक्यदृष्टी वगळून व्याकरणदृष्टीने विचार केला तरी केवलप्रयोगी अव्यय मागण्याची गरज नाही; कारण ती त्याला मदत करीत नाहीत व त्यांच्यामध्ये वाक्याचा समग्र अर्थ व्यक्त करण्याचे सामर्थ्य असले तरी ती कोणतेही विधान स्पष्टपणे करीत नाहीत.'

**केवलप्रयोगी अव्ययाच्या व्याख्या व स्वरूप**

१) 'जेणेकरून मानसिक विकारांचा उद्बोध होतो असे जे उद्गाररूप शब्द.' - **दादोबा पांडुरंग तर्खडकर**

२) 'जी अव्यये वाक्यात अन्वय पाहणारा अर्थ दाखवीत नाहीत किंवा वाक्यावाक्याचा संबंधही भासवीत नाहीत, तर केवळ बोलणाऱ्याच्या मनातील हर्ष, शोक, आश्चर्य, तिरस्कार, अनुमोदन इत्यादी वृत्ती मात्र दर्शवितात, त्यास केवलप्रयोगी किंवा उद्गारवाचक अव्यये म्हणतात.' - **कृष्णशास्त्री चिपळूणकर**

३) 'ज्या अव्ययांचा वाक्याशी काही संबंध नसतो म्हणजे त्यांच्याशिवाय वाक्यामध्ये अर्थाची काहीएक उणीव भासत नाही, किंवा जी वाक्यावाक्यांचाही संबंध दाखवत नाहीत तर केवळ बोलणाऱ्याचे मनातील हर्षशोकादि वृत्ती मात्र दाखवितात, ती केवलप्रयोगी किंवा ऊद्गारवाची अव्यये होत. उदा. अबब!,  वाहवा!'**दामले**

**केवलप्रयोगी अव्ययांची वैशिष्ट्ये**

कृ. पा. कुलकर्णी यांनी केवलप्रयोगी अव्यय यांची वैशिष्ट्ये सांगितली आहेत ती पुढील प्रमाणे-

१) केवलप्रयोगी अव्यय म्हणजे मनातील भावनांचे अकस्मात बाहेर पडलेले उद्गार होत.

२) ती अव्यये असतात त्यांना कसलेही प्रत्यय लागलेले नसतात आणि लागतही नाहीत

३) ते वेगवेगळे म्हणजे प्रच्छन्न असलेले सारे वाक्यच असते.

४) इतर वाक्यांशी त्यांचा काही संबंध नसतो.

५) या वाक्यात कर्ता, कर्म, क्रियापद काहीच नसते. ते वाक्य म्हणजे केवळ उद्गार असतो. त्यात सर्व वाक्याचा अर्थ सामावलेला असतो.

६) तो त्याचा वाक्यात केवळ प्रयोग करतात; पण वाक्याशी त्याचा साक्षात संबंध नसतो.

७) मनातील जे विकार ह्या अव्यय शब्दांच्या रूपाने बाहेर पडतात त्यात आनंद, शोक, आश्चर्य, संमती, नकार, तिरस्कार हे मुख्य होत.

८) उद्गारवाचक शब्द हे खरे पाहता स्फोट आहेत. ते त्या त्या परिस्थितीत एकदम बाहेर पडतात. ते शब्द म्हणजे भावनेचा उद्रेक असतो

९) आपण समजतो त्या अर्थाने ती निरर्थक नाहीत.

१०) उद्गारवाचक अव्ययांचा शैली म्हणून उपयोग होतो. ती वाक्य अधिक परिणामकारक करण्यासाठी उपयुक्त ठरतात.

**केवलप्रयोगी अव्यय याचे प्रकार**

१) हर्षद्योतक - वा, वाहवा, अहाहा.

२) शोककारक - हाय हाय, हाय रे, आई ग, हर हर, अरेरे.

३) आश्चर्यद्योतक - आहा, अबब, बापरे.

४) अनुमोदन - ठीक, वावा, शाबास, अच्छा.

५) तिरस्कारद्योतक - हट्, छे, छी छी.

६) विरोधकद्योतक - छट्, छे, ऊहू .

७) संबोधनद्योतक – अरे, रे, अगो, अग.

**शब्दांचे वर्गीकरण - नवा शब्दजातिविचार**

पारंपरिक शब्दजातीचा पुनर्विचार करण्याचा प्रयत्न प्रा. अरविंद मंगरूळकर, अर्जुनवाडकर आणि प्राध्यापक मा. ना. आचार्य यांनी केला आहे. प्रारंभी आपण मंगळरूळकरांनी केलेल्या शब्दजातीच्या नव्या वर्गीकरणाचा परिचय करून घेऊ.

प्राध्यापक अरविंद मंगरूळकरनी शब्दजातीचा व्यापक पुनर्विचार करून शब्दाची 'प्रकृती' व शब्दाचे 'कार्य' लक्षात घेऊन दोन स्वतंत्र वर्गीकरणे करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या मते –

१) ‘भाषेतील शब्दांचे वर्गीकरण करताना यांचा परस्परसंक्रम होता कामा नये’.

२) भाषेतील शब्दांची सव्यय-अव्यय ही विभागणी स्वाभाविक व परस्परव्यावृत्तही आहे. मात्र शब्दांचे अव्यय-सव्ययामध्ये वर्गीकरण करताना परंपरेने अव्यय मानलेले कित्येक शब्द सव्यय ठरतात.

३) कित्येक क्रियापदे ही सलिंग ठरून विशेषणात समाविष्ट होतील, तर काही विशेषणे अव्ययांच्या वर्गात दाखल करावी लागतील.

४) शब्दांचे वर्गांतर झाले म्हणून त्यांचे कार्य लुप्त होत नाही.

५) नाम आणि सर्वनामे विभक्ती यांना विभक्तीकार्य एकाच प्रकारचे होत असल्याकारणाने आणि त्यांचे कार्य सारखे असल्याने सर्वनामांचा स्वतंत्र गट करण्याचे काही लाभ नाही. सर्वनामाचे पुढील दोन गट करणे युक्त होईल.

**सर्वनाम –**

अ) मी गण – इष्टलिंग उदा. मी, आम्ही, तुला इत्यादि

आ) त गण – सलिंग उदा. तो, हा, जिला इत्यादि

६) नामांचे धर्मवाचक आणि धर्मवाचक हे वर्गीकरण निरुपयोगी आहे.

७) या विशेषणांना लिंगवचनकारक प्रत्यय लागतात त्यांचा वेगळा गट कल्पिला तर उरलेली सर्व विशेषणे वेगळ्या गटात घालता येतील. त्यांना सोयीसाठी पांढर-गण आणि गोड-गण अशी नवे देता येतील.

मंगरूळकर मराठीच्या पारंपरिक शब्द जातीचा पुनर्विचार करून थांबत नाहीत तर शब्दांचे व्याकरणिक कार्य लक्षात घेऊन शब्दांचे पुनर्वर्गीकरण करतात.

अर्जुनवाडकर यांनी आणि मराठी शब्दजातीची नव्याने व्यवस्था लावण्याचे प्रयत्न केला आहे. प्रत्यय, प्रकृती, पद, जाती, उपाधी यात गल्लत न करता व्याकरणिक कार्याशी सुसंगत अशा रूप व अन्वय तत्वांच्या अनुरोधाने त्यांनी केलेली वर्गीकरणे पुढील प्रमाणे आहेत.

प्रत्यय- 1) सवचन(चरम) अ) सपुरुष (आख्यात), आ) आपुरुष (विभक्ती)

2) अवचन (चरमेतर) अ) धातुयोगी (कृत) आ) आधातुयोगी (तद्धित)

शब्दांचे त्यांच्या जन्मजात धर्मावर- जातीवर आधारित वर्गीकरण

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यय वर्ग- | सवचन, सपुरुष | सवचन, अपुरुष | नाही |
| प्रकृतिवर्ग - | धातू | नामिक | शेष |
| पदवर्ग | आख्यातान्त | विभक्तयंत | अव्यय |

शब्दांच्या पारंपरिक आठ जातींऐवजी नामिके, धातू आणि शेष असे तीन मूलभूत वर्ग अर्जुनवाडकर यांनी संगितले. ज्यांच्या अंती सवचन प्रत्यय येत नाहीत, अशी वाक्यातील सर्व पदे त्यांनी 'अव्यव' या संज्ञेने दाखवली आहेत. शब्दयोगी अव्ययांचे विभक्ती प्रत्ययांशी असलेले साधर्म्य लक्षात घेऊन त्यांची गणना विभक्तीप्रत्ययामध्ये करावी असे त्यांचे मत असून अशोक केळकर हे या मताला सहमतअसल्याचे सांगतात. शब्दयोगी अव्ययांचा वेगळा वर्ग करायचा असेल तर सबळ का कारण असले पाहिजे. शुद्ध शब्दयोगी अव्यये हीच तेवढी 'शब्दयोगी' होत. बाकीच्यांना त्यांच्या प्रचलित नावापेक्षा विभक्तिधर्मी अव्यये हे नाव अधिक अन्वर्थक ठरेल या पार्श्वभूमीवर अर्जुनवाडकर आणि अन्वयांचे केलेले वर्गीकरण पुढील-

**अव्ययांचे वर्गीकरण**

अव्यय – अ) स्वायत्त (अवशिष्ट) ब) परायत्त (जुनी शब्दयोगी).

परायत्त (जुनी शब्दयोगी) याचे दोन प्रकार – १) शेष (शुद्ध) २) सामान्यरूपापेक्षी.

सामान्यरूपापेक्षीचे दोन प्रकार – १) षष्ठ्यंत सा / रू २) विभक्तीचे सा/ रू

षष्ठ्यंत सा / रू यांचे दोन प्रकार १) अस्वतंत्र (नित्य समस्त) २) स्वतंत्र (पृथक पद)

शब्दांच्या पारंपरिक वर्गीकरणातील मुख्य वर्गाबरोबर त्यांचे उपवर्गही सदोष असल्याचे अर्जुनवाडकरांनी निदर्शनास आणले आहे. नामांचे इंग्रजी वळणानुसार केलेले द्रव्यवाचक,समूहवाचक असे उपप्रकार क्रियाविशेषणाचे स्थल, काल, रीती हे वर्ग तर्कशास्त्रीय आहेत. विशेषणांचे अधिविशेषण, विधिविशेषण हे वर्ग पदान्वयाशी तर सार्वनामिक विशेषणे हा वर्ग व्युत्पत्तीशी निगडित आहे. संख्याविशेषणे ही गुणविशेषणेच. ती वेगळी काढून व्याकरणाला काही लाभ नाही. तर्कशास्त्रीय संकल्पना किंवा कोशकार्य आधाराला घेऊन केलेले शब्दांचे प्रकार-उपप्रकार व्याकरणात उपयोगाचे नाहीत. याची जाणीव अर्जुनवाडकर करून देतात. शब्दांच्या वर्गीकरणाची नवी दिशा दाखवून अर्जुनवाडकरांनी मराठी व्याकरणात मोलाची भर घातली आहे.

**आपली प्रगती तपासा .**

शब्दांच्या नव्या वर्गीकरणाचा आढावा घ्या.

## १.४ स्वाध्याय

**सरावासाठी प्रश्न**

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१) पारंपरिक व्याकरणातील शब्द म्हणजे काय ते सांगून नाम व सर्वनाम या शब्दजातींचा परिचय करून द्या.

२) शब्दांची विविध वर्गीकरणे सांगून धातू या शब्दजातीचा परामर्श घ्या.

३) अव्ययांचे विशेष सांगून क्रियाविशेषण अव्यय आणि केवलप्रयोगी अव्यय या शब्द्जातींचा परिचय करून द्या.
४) शब्दांच्या नव्या वर्गीकरणाचा आढावा घ्या.

**टिपा लिहा**

१) विशेषणाचे प्रकार सांगा
२) शब्दयोगी अव्यय व्याख्या व प्रकार
३) उभयान्वयी अवयाचे उपप्रकार
४) सर्वनाम शब्दजातीविषयी वाद

**खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

१) ज्या शब्दांच्या मूळ रुपात लिंग वचन विभक्ती नुसार बदल होतो त्या शब्दांना कोणत्या प्रकारचे शब्द म्हणतात?

२) स्वतः, आपण या सर्वनामांचा उपप्रकार ओळखा.

३) 'अरेरे!'या केवलप्रयोगीअव्ययाचाप्रकार सांगा.

४) शब्दाला जोडून येणाऱ्या अव्ययाला काय म्हणतात?

५) व्युत्पत्तीच्या आधारे विशेषणाचे सिद्ध व साधित हे प्रकार कोणी यांनी मानले.

६) क्रियावाचक मूळ शब्दाला काय म्हणतात?

७) कोणते अव्यय म्हणजे एक संपूर्ण वाक्य होय?

८) अर्जुनवाडकर यांनीअव्ययांचे कोणते दोन वर्ग केले?

९) विकारसह आणि विकारासह हे विशेषणांचे प्रकार कोणी केले?

१०) दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी केलेली केवलप्रयोगी अव्ययाची व्याख्या सांगा.

## १.५ संदर्भ ग्रंथ

१) **मराठी व्याकरणाचा अभ्यास ,**डॉ. प्रकाश परब,ओरिएंटल लॉगमन प्रायव्हेट लिमिटेड, २००२.
२) **मराठी व्याकरण परिचय,**प्रा. डॉ. राजशेखर हिरेमठ, मेहता पब्लिशिंग हाऊस, २०००.
३) **मराठीचा भाषिक अभ्यास,**कानडे मु. श्री., संपा, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, १९९४.
४) **मराठीचे व्याकरण,** लीला गोविलकर,मेहता पब्लिशिंग हाऊस, १९९३.

❖❖❖❖

# २

# विकरण

**घटक रचना :**


२.१ उद्दिष्टे

२.२ प्रस्तावना

२.३ लिंग व्यवस्थेचे सामान्य नियम

२.३.१ स्वरूप आणि व्याख्या

२.३.२ वचन विचार

२.३.३ विभक्ती विचार

२.३.४ विभक्तिप्रत्यय आणि शब्दयोगी अव्यय

२.३.५ आख्यात विकार

२.४ समारोप

२.५ स्वाध्याय

२.६ संदर्भ ग्रंथ


## २.१ उद्दिष्टे

- व्याकरणातील शब्दांच्या लिंग विचारांचे स्वरूप समजून येईल.
- वचन विचार समजण्यास मदत होईल.
- नाम , सर्वनाम , व विशेषण यांची सविस्तर माहिती मिळेल.
- भाषा वैज्ञानिकांचे मत जाणून घेता येईल.
- लिंकविकार सविस्तर समजण्यास मदत होईल .
- विभक्ती आणि आख्यात विचाराची ओळख होईल .

## २.२ प्रस्तावना

विद्यार्थी मित्रांनो या प्रस्तुत प्रकरणात आपण मराठी व्याकरणातील लिंगविकार पाहात असताना शब्दांच्या जाती अगोदरच्या प्रकरणात पहिले आहे . या प्रकरणात ज्या ज्या शब्दाला विकार होतो त्याचा या ठिकाणी आपणास अभ्यास करावयाचा आहे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण मराठी व्याकरणातील शब्दांच्या लिंगविकाराचे स्वरूप पाहणार आहोत. नाम, सर्वनाम व विशेषण यांना तीन प्रकारचे विकार होतात. ते म्हणजे लिंग, वचन आणि विभक्ती होत. मात्र विभक्तिविकार जेवढे स्पष्ट व नियमबद्ध आहेत तेवढे लिंग,वचनविकार असलेले दिसत नाहीत. कृ. पा. कुलकर्णी यांच्यामते,'एकूण लिंगप्रकरण हे सर्वत्र क्लिष्ट आणि कठीण आहे. मराठी भाषेतील शब्दांची लिंगव्यवस्था ही कठीण समस्या आहे. अमुक एक शब्द लिंगाचा असला पाहिजे, असे विधान करणे कठीण आहे. मराठी भाषेच्या लिंग व्यवस्थेबद्दल ठाम असा नियम नाही, हे ध्यानात घेऊन आपण लिंग व्यवस्थेचे स्वरूप विचारात घ्यावे लागते.'

'लिंग, वचन, व विभक्ती यांमुळे नामाच्या रूपात बदल होतो. त्याला 'नामाचे विकरण' असे म्हणतात यांचा आपण क्रमाने विचार खालील प्रमाणे करू .

लिंग या शब्दाचा अर्थ लक्षण,खूण किंवा चिह्न कसा आहे. लिंग म्हणजे चिह्न पण ते पदार्थांचे 'पुंसत्व','स्त्रीत्व,''नपुंसत्व' यापैकी कोणते तरी चिह्नदाखवते, असा अर्थ व्याकरणात रूढ झाला आहे. निसर्गात सजीवसृष्टीमध्ये, प्राणीसृष्टी मध्ये नर-मादी, स्त्री-पुरुष असा भेद केला जातो. मात्र त्याचा व्याकरणिक लिंगव्यवस्थेशी तसा संबंध नाही. अमुक एक शब्द कोणत्या लिंगाचा असावा याविषयी मतभेद व्यक्त झाले आहेत. साधारणतः पुरुषवाचक शब्द हे पुल्लिंगी, स्त्री वाचक शब्द स्त्रीलिंगी तर जड निर्जीव पदार्थवाचक शब्द हे तिन्ही लिंगी असतात. अज्ञातलिंगी पदार्थवाचक शब्द नपुसकलिंगी असतात.

### २.३.१ स्वरूप आणि व्याख्या:

**व्याख्या**

दामले यांनी लिंगभेदाच्याव्याख्या केल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे-

१) **पुल्लिंग**–ज्या नामाच्या वाक्यातील प्रयोगावरून त्याच्या अर्थाच्या ठायी वास्तविक किंवा काल्पनिक पुरुषत्वाचा बोध होतो त्यास पुल्लिंग असे म्हणतात. जसे – घोडा,बैल, सूर्य.

२) **स्त्रीलिंग**–ज्या नामाच्या वाक्यातील प्रयोगावरून त्याच्या अर्थाच्याठायी वास्तविक किंवा काल्पनिक स्त्रीत्वाचा बोध होतो त्याच स्त्रीलिंग म्हणतात. जसे- नदी, गाय, काठी.

३) **नपुंसकलिंग-** ज्या नामाच्या वाक्यातील प्रयोगावरून त्याच्या अर्थाच्याठायी वास्तविक किंवा काल्पनिक उभयभिन्नत्वाचा म्हणजे पुरुषत्व किंवा स्त्रीत्व

यादोहोहून वेगळेपणाचा बोध होतो. त्यास नपुसकलिंग म्हणतात. जसे- पत्र, कपाट, यश, आकाश.

४) **सामान्यलिंग-** दादोबा पांडुरंग यांनी या तीन लिंगाशिवाय आणखी एक प्रकार मानला तो म्हणजे 'सामान्यलिंग' होय. त्यांच्या मते –'ज्या नामेकरून वर सांगितलेल्या कोणत्याही लिंगाचा ज्या काळी एखाद्या वाक्यात निश्चयकरता येत नाही त्या काळी सामान्यलिंग समजावे.' उदा. मित्र, मी, पक्षी. मात्र दामले यांनी सामान्यलिंग म्हणण्यापेक्षा 'संदिग्ध','संशययुक्त' किंवा 'अनिश्चितलिंग' असे म्हणावे, असे म्हटले आहे. मित्र, तू. पक्षी.

सामान्यलिंग मानण्याची कल्पना दामले, चिपळूणकर आदींना मान्य झालेली दिसत नाही. केवळ उच्चार केल्याबरोबर ज्या लिंगाचा निश्चय करता येत नाहीत असे काही शब्द आहेत. दादोबानी सुचवलेली 'सामान्यलिंग' ही संज्ञा आणि तीमागील कल्पना रूपदृष्टीने नसली तरी अर्थदृष्टीने योग्य असल्याचे मत खेरांनी व्यक्त केले आहे. खेरांच्या मते 'मनुष्य, मित्र,शेजारी हे शब्द सामान्यलिंगी आहेत कारण त्यातून स्त्री व पुरुष अशा दोहोंचाही निर्देश होतो.' परंतु अनेकलिंगी या अर्थाने सामान्यलिंग ही संज्ञा स्वीकारण्याची आवश्यकता नसल्याचे दामले यांनी स्पष्ट केले आहे.

लिंग हा शब्द व्यवहारात आणि व्याकरणात भिन्नभिन्न अर्थाने वापरला जातो. भाषेतील लिंगाचा वास्तव सृष्टीतील लिंगव्यवस्थेशी संबंध नसतो, असे मंगरूळकर सांगतात. तर लिंग या शब्दधर्माचा प्रकृती आणि प्राणीधर्माशी काही संबंध आहे, असे अर्जुनवाडकरम्हणतात. पण लिंगाच्या एकूण क्षेत्रात संबंधाचे क्षेत्र इतके अल्प आहे की लिंग हा शब्दधर्म यादृच्छिक आणि अतार्किक असे म्हणायला अडचण नाही. जसा शब्दाचा अर्थ कसे शब्दाचे लिंग यादृच्छिक असते.

दादोबा यांनी लिंगव्यवस्था सांगण्याचा प्रयत्न तीन दिशांनी केला आहे.१) अर्थ २) अंत्यवर्ण व ३) लोकव्यवहार. परंतु अर्थाची दिशा अप्रयोजक आहे कारण एखाच अर्थाचे शब्द असून त्यांची लिंगे भिन्न असतात.उदा. वृक्ष, झाड, रस्ता, सडक, यांची लिंगे भिन्नभिन्न असलेली दिसतात. त्यामुळे दामले असे म्हणतात की,'शिष्ठ लोकव्यवहार हा लिंग ठरवण्याचा एकच बिनचूक मार्ग होय.'

चिपळूणकरांनी प्रत्ययांच्या व व्युत्पत्तीच्या आधारे लिंग निर्धारणाचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला आहे.पण ते पुरेसे नाही याची त्यांना जाणीव होती. 'कोणत्या शब्दाचे कोणते लिंग हे भाषाविज्ञानापासून समजून घेतले पाहिजे दुसरा उपाय नाही.'असे त्यांचे म्हणणे आहे. निर्जीव पदार्थवाचक नामांच्या अन् त्या अक्षरापासून नियम सांगण्याचा प्रयत्न मराठीत फारसा उपयुक्त ठरलेला नाही. जसे - एकारान्त नामे स्त्रीलिंगी असतात. उदा. छत्री, पाटील, इत्यादी पण पाणी, लोणी, मोती अशा ईकारांत नामाना हा नियम लागत नाही.

नामाच्या अर्थापेक्षा त्यांच्या अंत्यवर्णावरून केलेले नियम लिंग ओळखण्यास उपयुक्त ठरतात. दामले यांनी असे अनेक नियम आपल्या व्याकरणात नमूद केले आहेत. नामाचे

लिंग अर्थाप्रमाणे ठरविण्याचे प्रयत्न करणे म्हणजे वाऱ्याची मोट बांधण्यासारखे आहे असे सांगून याकामी लोकव्यवहार किंवा भाषणप्रचार याशिवाय दुसरा राजमार्ग आपणास दिसत नसल्याचे दामले सांगतात.

## २.३ लिंग व्यवस्थेचे सामान्य नियम

१) प्राणीवाचकनामांपैकी पुरुषवाचक नामे पुल्लिंगी, स्त्रीवाचक नामे स्त्रीलिंगी असतात. जसे पुरुष,घोडा,बकरा(पुल्लिंगी) स्त्री, घोडी, बकरी (स्त्रीलिंगी).

२) प्राणीवाचक नामांपैकी ज्या नामांनी सामान्य जातीचा बोध होतो त्याचे बहुदा नपुसकलिंग असते. जसे –जनावर, कुत्रे, पिल्लू, वासरू.

३) प्राणीवाचक नामांपैकी अपत्यवाचक नामे ही बहुदा नपुसकलिंगी असतात. मुल, वासरू, पिल्लू.

४) मराठी नामांच्या अंती बिंदू असतो म्हणजे त्यांचा अंतवर्ण अनुनासिक असतो ती सारी नपुसकलिंग समजली जातात. बकरें, दहीं, मोतीं,तळें,बोलणें.

५) भाववाचक नामांच्या लिंगासंबंधी पुढील बाबी दिसून येतात-

अ) पणा आणि वा प्रत्ययांत भाववाचक नामे पुल्लिंगी असतात. जसे की- मनुष्यपणा, चांगुलपणा, ओलावा.

आ) की, गिरी हे प्रत्यय लागून साधलेली भाववाचक नामे स्त्रीलिंगी असतात. गरीबी, पाटीलकी, मानवता, कारागिरी, भामटेगिरी.

इ) पण, त्व,य, व हे प्रत्यय लागणारी भाववाचक नामे नपुंसकलिंगी असतात.उदा. पशुत्व, गौरव. आर्जव.

६) कृदंते किंवा धातुसाधिते नामाच्या लिंगाविषयी प्रत्ययावरून काही नियम सांगता येतील –

अ) आ आणि प्रत्ययांत कृदंत नामे पुल्लिंगी असतात. उदा.  वेडा, झगडा, ठोका, चावा.

आ) णान्त आणि नान्त म्हणजे  ण आणि न प्रत्ययांत कृदन्त नामे नपुंसकलिंगी असतात. उदा. लेखन, दळण.

इ) ई प्रत्ययांत एकेरी व अ आणि ई प्रत्ययांत द्विरुक्त धातुसाधित नामे स्त्रीलिंगी असतात.उदा.उडी, थुंकी, थापी, पळापळ, धावाधाव, मारामारी.

ई) णी, णूक, णावळ या प्रत्ययांनी साधलेली कृदंत नामे स्त्रीलिंगी असतात.उदा.कापणी, लेखणी, चाळणी,वागणूक.

उ) ती प्रत्ययांत क्रियावाचक संस्कृत नावे मराठीत स्त्रीलिंगी समजली जातात. उदा. कृती, मती,नीती,रती, बुद्धी इत्यादी.

ऊ) ईक प्रत्ययांत नामे स्त्रीलिंगी आहेत. आगळीक, आर्थिक, मोकळीक, सोयरीक.

ऋ) त्र प्रत्ययांत शब्द  नपुसकलिंगी असतात.उदा.सूत्र, मंत्र,तंत्र, पात्र, सत्र.

ऌ) अरबी फारसी भाषेतून जे शब्द मराठीत आलेत त्यांच्या लिंगाबद्दल काही नियम नाहीत.

वरील नियम संगितले जात असले तरी लिंगाविषयी कोणतेही निश्चित नियम ठोसपणे सांगता येत नाहीत. कारण कोणत्याही नियमाला अपवाद असणारे शब्द भाषेत सापडतात.

### २.३.१ वचन विका र:

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण मराठी व्याकरणातील शब्दांच्या वाचनविकाराचे स्वरूप पाहणार आहोत.सर्व विकारी शब्दांच्या ठिकाणी, प्रामुख्याने नाम, सर्वनामाचे ठिकाणी संख्या सुचवण्याचा जो धर्म असतो त्याला वचन असे म्हटले जाते. एका व्यक्तीविषयी अगर वस्तूविषयी बोलणे म्हणजे एक वचन आणि अनेक व्यक्ती वा वस्तुविषयी बोलणे म्हणजे अनेकवचन असे म्हणतात. अनेकवचनास मराठीत बहुवचन अशीही एक संज्ञा वापरली जाते. म्हणजेच वचन ही व्याकरणातील संख्याबोध घडवणारी संज्ञा आहे. दामले यांनी वचनाची व्याख्या करताना असे म्हटले आहे की,'नामाच्या व इतर सर्व विकारी शब्दांच्या ठिकाणी संख्या सुचवण्याचा गुणधर्म असतो त्यास वचन असे म्हणतात. मराठीत दोन वचने आहेत. एकवचन आणि अनेकवचन किंवा बहुवचन.' दामले यांची ही व्याख्या खूपच व्यापक असलेली दिसते. म्हणून कृ. पा. कुलकर्णी यांच्या मते 'वचन म्हणजे बोलणे एका व्यक्तीबद्दल अगर वस्तूबद्दल बोलणे म्हणजे एकवचन अनेक व्यक्ती किंवा वस्तू बद्दल बोलणे म्हणजे अनेकवचन.' थोडक्यात वचनामुळे नाम, सर्वनाम याच्या एकत्वाचा किंवा अनेकत्त्वाचा बोध पडतो.

**वचनाचे प्रकार**

**एकवचन** - जेव्हा नामा-सर्वनामांच्या एकत्वाचा बोध होतो तेव्हा त्यास एकवचन म्हणतात. आंबा, घोडा, बगळा, पुस्तक हे एकवचनी शब्द होत.

**अनेकवचन** - जेव्हा नामा-सर्वनामांच्या (एखाद्या वस्तूच्या) अनेकत्वाचा बोध होतो तेव्हा त्यास अनेकवचन म्हणतात. जसे की - आंबे, घोडे, बगळे, पुस्तके. ही अनेकवचनी शब्दरूपे आहेत. मात्र लिंगाप्रमाणे वचन विकारातही निश्चितता नाही. काही शब्दांची अनेकवचनी रूपे ही एकवचनी रूपांसारखीच असतात. उदा. पतंग, पोपट, लाडू, देव, दासी इत्यादी शब्दांची दोन्ही वचनातील रूपे समानच असतात.

### २.३.२ पुल्लिंगी नामे :

अ) आकारांत नावे वगळून बाकी सर्व प्रकारच्या पुल्लिंगी नामाचे अनेकवचन होताना शेवटचे अक्षर बदलत नाही. उदा. देव- देव, दासी- दासी, लाडू-लाडू, पतंग- पतंग.

आ)आकारांत नामाचे अनेक वचन एकारान्त होते. घोडा- घोडे, आंबा- आंबे, चुलता – चुलते, कावळा- कावळे.

**स्त्रीलिंगी नामे**

१) आ, इ, उ कारान्त नामांचे अनेकवचन होताना मूळच्या रूपात काही फरक होत नाही. उदा. शाळा-शाळा, गती- गती.

२) ए, ऐ, ओ कारांत नामे यांचे अनेकवचन आकारान्ती होते. उदा. बायको –बायका.

३) ई,ऊकारान्त नामाची अनेकवचने ईकारान्त किंवा याकारान्त होतात. उदा. स्त्री - स्त्रिया, बी- बिया, जाऊ- जावा, साडी- साड्या.

४) अकारान्त नामाचे अनेकवचन आकारान्त, ईकारान्त किंवा एकारान्त होते. भिंत- भिंती, रीत- रीती, झोप - झोपा

**नपुसकलिंगी नाम**

१) ईकारान्त व उ-कारान्त नामाचे अनेकवचन होताना कित्येक नामांना य, व हे आदेश होतात. उदा. मोती -मोत्ये, लेकरू- लेकरे, पाखरू –पाखरे.

२) आकारांत नामाचे अनेकवचन एकारान्ती होते. घर –घरे, पान –पाने. झाड- झाडे.

३) एकारान्त नामाचे अनेकवचन ईकारान्ती होते. तळे –तळी, मडके- मडके.

**वचनासंबंधी काही नियम**

१) नामांच्या विशेषनाम, सामान्यनाम, भाववाचकनाम यापैकी सामान्यनाम ही शब्दजाती वचनक्षम आहे. विशेषनाम हे व्यक्तीचे असल्यामुळे त्याचे अनेकवचन होत नाही. भाववाचक नामाचे अनेकवचन होत नाही.

२) ज्यांचे मापन संख्येने करता येत नाही तर परीमाणाने करावे लागते, उदा. पाणी, लोखंड या सारखी सामान्यनामे त्या वस्तूचे प्रकार दाखवायचे असतील तर ते अनेकवचनी येतात.

३) काही नामांचे अनेकवचन ती कोणत्या लिंगी असली तरी होत नाही. उदा. गहू, पाणी, आकाश, माती.

४) नाम व सर्वनाम यांच्या एकवचनी, अनेकवचनी रूपांचा क्रियापदावरही परिणाम होतो. मुलगा जातो. मुले जातात.

वचन हे स्वतंत्र विकरण आहे की विभक्तीचाच भाग आहे या विषयी मतभिन्नता दिसते. विभक्ती व वचन यांचे प्रत्यय एकच असतात. म्हणजे ज्या प्रत्ययाने विभक्तीचा बोध होतो, त्यानेच कित्येक ठिकाणी वचनाचा बोध होतो. म्हणून वचने व विभक्ती यांचे एकत्र निरुपण करण्याची चाल आहे. चिपळूणकर, गुंजीकर, दामले यांनी हे मान्य असलेले दिसते. परंतु विषय विवेचनाच्या सोईसाठी वचनाचे वेगळे विवेचन असावे हे दामले यांना इष्ट वाटते.

### २.३.३ विभक्ती :

विभक्तीविकार हा मराठी व्याकरणातील महत्त्वाचा आणि वादग्रस्त विचार आहे. नाम व सर्वनाम यांना लिंग, वचन आणि विभक्ती असे तीन विकार होतात. वाक्यामध्ये वापरण्यात येणाऱ्या शब्दांना'पद' ही संकल्पना वापरली जाते. अशा वाक्यघटकांना पदरूप प्राप्त होण्यासाठी विभक्तीचे प्रत्यय हे आवश्यक ठरतात. तेव्हाच त्यांचा अर्थदृष्ट्या इतर शब्दांशी संबंध प्रस्थापित होतो. मात्र या विभक्तीप्रत्यय या विषयी व्याकरणकारामध्ये अनेक मतभेद आहेत. कारण विभक्तिविचार हा संस्कृतमधून मराठीत आला आहे. तसेच संस्कृतमधून मराठीत येताना मूळ संस्कृतमधील विभक्तिप्रत्यय यांची अदलाबदल होणे, मराठीत संस्कृतमध्ये नसलेले प्रत्यय वापरले जाणे, यातून ही मतभिन्नता निर्माण झालेली दिसते. तसेच विभक्ती अर्थावरून मानाव्यात की प्रत्ययावरून हा ही एक मूलभूत वाद विभक्ती विचारांमध्ये दिसून येतो.प्रस्तुत विवेचनात आपण विभक्तिविकाराचा विचार करू.

**विभक्ती म्हणजे काय**

विभक्ती हा शब्द वि + भज या धातूला 'ती' हा नामधारक प्रत्यय लागून बनला आहे. नामिकांचा वाक्यातील अन्य पदांची संबंध प्रस्थापित करण्यासाठी त्यांना ते प्रत्यय लागतात. त्या प्रत्ययांचे गट किंवा विभाग अशी विभक्ती या शब्दामागील कल्पना आहे.

**विभक्तीच्या व्याख्या**

१) नामाचा व क्रियेचा जो संबंध तो कारकसंबंध आणि हा संबंध सुचविणारे जे प्रत्यय,तदन्त जे शब्द त्यास विभक्ती असे म्हणतात.**- दादोबा पांडुरंग तर्खडकर**

२) क्रियेशी आणि क्रियावाचक शब्दांशी नामांचा जो संबंध त्यास कारकसंबंध म्हणतात.आणि तो संबंध दाखविणाऱ्या प्रत्ययास विभक्ती प्रत्यय म्हणतात. नामास विभक्तिप्रत्यय जोडून जी रूपे तयार होतात त्यास विभक्ती किंवा विभक्त्यंत असे म्हणतात. **- गोडबोले शास्त्री**

३) नामास व सर्वनामास जे विकार झाल्याने त्यांचा वाक्यातील इतर शब्दांशी असलेला संबंध समजतो त्या विकारांच्या भिन्नभिन्न जातीस विभक्ती असे म्हणतात **- मो. के. दामले.**

४) नामाचा अथवा सर्वनामाचा वाक्यातील अन्य पदांशी संबंध जोडणारी उपाधी म्हणजे विभक्ती होय. **-अरविंद मंगरूळकर**

वरील वाक्यांचा विचार करता नाम व सर्वनाम यांचे संबंधदर्शक प्रत्यय लागतात त्याना विभक्तिप्रत्यय अशी संज्ञा वापरली जाते. विभक्तिप्रत्यय जोडले गेल्यामुळे दोन गोष्टी घडून येतात. त्या म्हणजे शब्दाना पद ही संज्ञा प्राप्त होते आणि वाक्यातील शब्दांचा अन्य पदांशी संबंध प्रस्थापित होतो. या संबंधाला कारकसंबंध असे म्हटले जाते.'गौतमने गाईला चारा घातला.' या वाक्यात गौतम आणि गाय या दोन शब्दांना अनुक्रमे 'ने' आणि'ला' प्रत्यय जोडून आले आहेत. त्यामुळे गौतमने आणि गाईला दोन

पदे सिद्ध झालेली दिसतात. यांनाच पदसिद्धी असे म्हणतात.पदसिद्धी होताना दोन प्रकारचे संबंध असतात.

१) नामाचा क्रियापदाची असलेल्या संबंधाला कारकसंबंध म्हणतात.
२) इतर पदांची असलेल्या संबंधाला उपपद संबंध म्हणतात. वरील वाक्यातील 'चारा' या शब्दाशी अन्य पदांचाअसलेला संबंध म्हणजेच उपपदसंबंध होय.

**विभक्तीचे स्वरूप व चिकित्सा**

मराठीमध्ये संस्कृतप्रमाणेआठ विभक्ती मानण्यात आल्या आहेत. मात्र संस्कृतमध्ये सात विभक्ती आहेत. संबोधन ही आठवी विभक्ती संस्कृतमध्ये नाही. ती प्रथमा विभक्तीतच अंतर्भूत आहे. मराठीत तिला स्वतंत्र स्थान देण्यात आले आहे. त्यामुळे विभक्तींची संख्याही आठ झालेली दिसते आहे. ती पुढीलप्रमाणे -

| विभक्तीचे नाव | एक वचनी प्रत्यय | अनेक वचनी प्रत्यय | अर्थ |
|---|---|---|---|
| प्रथमा | -- | -- | कर्ता |
| द्वितीया | स ला ते | स ला ना ते | कर्म |
| तृतीया करण | ने, ए, ई, शी | नि, ही, ई, शी | |
| चतुर्थी | स, ला, ते | स, ला, ना, ते | संप्रदान |
| पंचमी | ऊन, हून | ऊन, हून | अपादान |
| षष्टी | चा,ची,चे, | चे, च्या,ची | संबंध |
| सप्तमी | त, ई, आं | त, ई, आं | अधिकरण |
| संबोधन संबोधन | -- | नो | |

ही विभक्ती व्यवस्था शालेय व्याकरणापासून रूढ असलेली दिसते.

**विभक्तिप्रत्यय आणि शब्दयोगी अव्यय**

नाम व सर्वनाम यांना विभक्ति प्रत्यय जोडले जातात त्याप्रमाणे शब्दयोगी अव्ययेही जोडली जातात. त्यामुळे त्यांच्यामध्ये एक कार्यसाम्य दिसून येते. त्यामुळे त्याविषयी व्याकरणकारांनी विभिन्न मते व्यक्त केली आहेत. नाम व सर्वनामांचा इतर पदांशी संबंध दाखविणे, शब्दांना पद बनविणे व वाक्यगत घटक बनवणे, हे कार्य विभक्तिप्रत्ययाप्रमाणे शब्दयोगी अव्ययेही करतात. या दोघांचे प्रत्यय लागताना नाम व सर्वनाम यांची सामान्यरूपे होतात. उदा. झाड- झाडाला, राम –रामाकडून इत्यादि. यामुळे असा प्रश्न निर्माण होतो की दोघांच्या प्रत्ययांनासमान प्रत्ययका मानू नये. याबाबत दामले यांचे मत असे की,'शब्दयोगी अव्ययांनीविभक्तींचे कार्य होणे अर्थदृष्ट्या सहाजिकच आहे.

तसेच भाषादृष्ट्याही स्वाभाविक आहे. कारण विभक्तिप्रत्यय हे मूळ शब्दयोगी अव्ययापासूनच संक्षेपाने किंवा छाटाछाटीने उत्पन्न झाले आहेत. असे भाषा शास्त्रज्ञांचे मत आहे. तेव्हा शब् योगी अव्ययांनी विभक्तीची कार्य व्हावी हे योग्यच आहे. विभक्ति प्रत्ययही मूळची शब्दयोगी अव्यय आहेत हे खरे.'

वास्तविक विभक्ति प्रत्यय हे नामा-सर्वनामांना लागतात. शब्दयोगी अव्यये नाम व सर्वनामाबरोबर क्रियाविशेषण व अन्य शब्दजातीनाही लागतात. तसेच विभक्तिप्रत्यय केवळ प्रत्यय आहेत. तर शब्दयोगीअव्यये हे शब्द आहेत. विभक्ति प्रत्ययांचा स्वतंत्र वापर कधीच होत नाही.परंतु शब्दयोगी अव्ययांचा मात्र होत असतो. उदा. 'झाडावर पक्षी आहे.','पक्षी वर बसला आहे. 'विभक्ति प्रत्ययांना स्वतःचा स्वतंत्र अर्थ नाही. शब्दयोगी अव्ययांना मात्र थोडा तरी अर्थ असतो. विभक्ति प्रत्ययांना कारकार्थ आणि उपपदार्थ आहेत. शब्दयोगी अव्ययांना कारकार्थ नाहीत. हा भेद विचारात घेऊन विभक्ति प्रत्यय स्वतंत्र म्हणावे लागतात.

**विभक्तीचे प्रकार**

**प्रथमा विभक्ती**

प्रथमा विभक्तीला प्रत्यय नाहीत. नामाचे व सर्वनामाचे मूळ रूप तेच प्रथमेचे रूप असते. अर्थात एकवचनी आणि अनेकवचनी रूपात फरक होतो. तो फरक वचनामुळे होतो. मूल – मूले,झाड –झाडे.प्रथमा विभक्ती ही कर्त्याची विभक्ती मानली असल्यामुळे कर्ता प्रत्ययरहित यायला हवा. परंतु 'रामाने रावणास मारले.' यासारख्या वाक्यात कर्त्याला तृतीयेचा प्रत्यय लागलेला दिसतो.द्वितीया ही कर्माची विभक्ती मानली जाते. मात्र बहुतांश वेळा कर्म हे प्रथमेत येते. तेव्हा त्याची विभक्ती प्रथमा समजायची का असा प्रश्न निर्माण होतो.'तो पेरू खातो.'या वाक्यात पेरू या शब्दाची विभक्ती प्रथमा हीच आहे. त्यामुळे म. प. सबनीस यांनी प्रथमेला विरोध करून 'प्रथमा मानू नये असे म्हटले. कारण प्रथमेला प्रत्यय नाहीत व तिचे सामान्यरूपही होत नाही,' म्हणून त्यांनी प्रथमेस विरोध केला आहे. पण अनेक व्याकरणकारांनी प्रथमा मानली आहे.दादोबानी जुन्या मराठीत प्रथमेला प्रत्यय असल्याचे म्हटले.  रावो- ओ, राऊ, सागरू–ऊ असे हे प्रत्यय असलेले दिसतात.विभक्ती विचारात केवळ प्रत्ययांनाच महत्त्व नसून करकार्थानाही आहे.  प्रथमेचा अर्थ कर्ता असा असल्याने प्रथमा विभक्ती मागणे हे योग्य ठरते.

**द्वितीया व चतुर्थीविभक्ती**

समान प्रत्यय असल्यामुळे द्वितीया आणि चतुर्थी या विभक्ती वादग्रस्त असलेल्या दिसतात. या वादाचे तीन पक्ष आहेत.द्वितीया व चतुर्थी मानणारे, केवळ द्वितीया मानणारे आणि केवळ चतुर्थी मानणारे असे हे पक्ष असल्यामुळे या विभक्तीविषयी अनेक मतमतांतरे दिसतात. त्यांचा परामर्श घेऊ.

**१) द्वितीया मानू नये म्हणणाऱ्यांनी पुढील मुद्दे मांडले आहेत.-**

श्री चिपळूणकर व गोडबोले यांच्या मते स, ला, ते, आणि स, ला, ना,ते हे प्रत्यय संस्कृतातील षष्ठीच्या स्य,वना या प्रत्ययावरून आले असून प्राकृतात चतुर्थीच्या जागी षष्ठीचा प्रयोग करावा असे म्हटल्याने षष्ठीच्या प्रत्ययापासून निर्माण झालेल्या प्रत्ययांना चतुर्थीचे मानणे योग्य, तर दामले यांच्या मते संस्कृतमधील द्वितीया विभक्तीपासूनमराठीत एकही प्रत्यय आला नाही. म्हणून ते प्रत्यय चतुर्थीचे मानावेत.

२) दामले यांच्या मते स, ला, ना या प्रत्ययांचा कर्म या अर्थापेक्षा संप्रदान या अर्थी अधिक उपयोग होतो. शिवाय कर्मार्थापेक्षा संप्रदानाची व्यापकता अधिक आहे. म्हणून द्वितीयेपेक्षा चतुर्थी मानली पाहिजे.

३) द्वितीयाचे कर्म सूचित करण्याचे कार्य मराठीत अंशतः चतुर्थीच्या त्यांनी होते व काही प्रमाणात प्रथमेच्याप्रत्ययांनी होते. म्हणजे कर्मास जेव्हाप्रत्यय लागलेला असतो तेव्हा ते रूप चतुर्थीसारखे असते. उदा. रामाने रावणास मारले, शिकाऱ्याने वाघ मारला. या वाक्यात द्वितीया ही चतुर्थी व प्रथमा यांच्यात लोप पावलेली दिसते.

४) कर्त्याची ज्याप्रमाणे प्रथमा विभक्ती मानली जाते. म्हणून कर्माची द्वितीया मानावी, हेमत दामले यांना मान्य नाही. त्यांच्यामते कर्ता हे कारक आहे, ते  प्रथमा, तृतीया, चतुर्थी,षष्ठी यांच्या ठायी आढळूशकते. म्हणून कर्माची विभक्ती ही द्वितीयाच मानली पाहिजे असे नाही ती प्रथमा, चतुर्थीही मानता येते.

**वरील मतांना विरोध करणारे मुद्दे**

१) व्युत्पत्तीच्या आधारे द्वितीयेचे अस्तित्व न मानणे हे योग्य नाही. त्याआधारे चतुर्थीचा पुरस्कारही करता येणार  नाही. उत्पत्तीचा आधार घेतल्यास प्राकृतात चतुर्थीचा लोप झाला असेल आणि तिचे कार्य षष्ठी विभक्तीने होत असेल तर चतुर्थीचा पुरस्कार कोणत्या आधारे योग्य ठरतो? प्राकृतात चतुर्थीचालोप झाल्यामुळे नंतर मराठीत चतुर्थी मानणे शास्त्रीयदृष्ट्या योग्य नाही.

२) द्वितीयेचेकर्मार्थी रूप हे प्रथमेसारखे प्रत्यय विरहित असते हे खरे परंतु प्रत्यय नसलेल्या प्रथमेला दामले मानतात,मग प्रत्यय नसलेल्या द्वितीयेला कामानू नये?आणि कर्त्याखालोखाल कर्माला महत्त्व असताना त्याला स्वतंत्र विभक्ती मानण्यात अडचण काय? केवळ प्रत्ययांच्या आधारे द्वितीयेला विरोध करता कामा नये. संस्कृत, हिंदी इत्यादी भाषात कर्मकारकास प्रत्यय नसतानाही द्वितीया विभक्ती मानली आहे. त्यामुळे मराठीत का मानू नये?

३) म. पा. सबनीस यांनी दामले यांच्या द्वितीयेच्या विरोधावर आक्षेप घेतला. त्यांच्या मते 'त्यांनी व्युत्पत्तीस फाजील महत्त्व दिले आहे. द्वितीयेचे अप्रत्ययी रूप प्रथमेत अंतर्धान पावले असे म्हणण्यापेक्षा प्रथमाच द्वितीयेत अंतर्धान पावली असे का म्हणू नये? म्हणून गाळायची असल्यास प्रथमागाळावी व चतुर्थी सकट द्वितीया ठेवावी.'

४) प्रा. मंगरूळकर यांच्या मते कर्त्याच्याखालोखाल कर्माचे महत्त्व असल्याने त्यांच्या विभक्ती क्रमाने जवळजवळ असाव्यात हे ओघाने येते. कर्म हा अर्थ व्यक्त करण्याचा मान द्वितीयेचाच आहे.'

**चतुर्थी मानू नये म्हणणाऱ्या व्याकरण करावी खालील मुद्दे मांडले आहे आहेत**

१) डॉ. ग. मो. पाटील व मंगरूळकर यांनी चतुर्थीला विरोध करून द्वितीया मानावी असे म्हटले आहे.

पाटील यांच्यामते'मराठी गद्य भाषेत स, नाहे प्रत्ययकर्मार्थापेक्षा संप्रदानार्थी विशेष प्रचारात आहेत, याला प्रमाण काय? प्राकृतात लोप पावलेली चतुर्थी मराठीत आली कुठून? आणि कशी निर्माण झाली? त्या लुप्त चतुर्थीचे कार्य अंशत: द्वितीयेने का होऊ नये? मराठीत संप्रदानापेक्षा कर्मार्थ धातू अधिक संख्येने आहेत.द्विकर्मक धातू मराठीत असणे यात गैर काहीच नाही. यासाठी द्वितीया ठेवून चतुर्थी गाळावी असे स्पष्ट मत आहे.'

२) मंगरूळकर यांच्या मते 'कर्म हा अर्थ व्यक्त करण्याचा मान द्वितीयेचा आहे. तर चिपळूणकर यांच्यामते मराठीची मूलभूत जी बालभाषा त्या भाषेत चतुर्थी विभक्ती मुळीच नाही. त्यादृष्टीने ऐतिहासिक रीतीने पाहता मराठीत चतुर्थी नाही मुळीच नाही. तसेच द्वितीया कर्माशिवाय दुसरा अर्थ व्यक्त करीत नाही.' असा युक्तिवाद करीत त्यांनी चतुर्थीला विरोध केला

**द्वितीया व चतुर्थी या दोन्ही विभक्ती मानणारे व्याकरणकार**

१) या दोन्ही व्यक्तींचे प्रत्येक समान असले तरी कार्य भिन्न आहेत. द्वितीया कर्मकारक आहे तर चतुर्थी संप्रदानकारक आहे. म्हणून या दोन स्वतंत्र व वेगळ्या मानाव्यात.

२) दादोबा पांडुरंग,रा. भी. गुंजीकर,म. पा. सबनीस यांनी अर्थाला प्राधान्य देऊन दोन्ही विभक्ती मानल्या आहेत.

३) ग. ह. केळकर यांनी दोन्ही विभक्तीचा पुरस्कार करून कर्म हे स्वतंत्र व महत्त्वाचे कारक आहे, असे म्हटलेआहे.

४) कृ. पा. कुलकर्णी यांनी द्वितीया व चतुर्थी या दोन्ही विभक्तीमानाव्यात असे प्रतिपादन केले. वाक्यात एखादा शब्द कोणते कार्य करतो त्याचा कारकार्थ काय हे पाहूनच विभक्ती ठरवाव्यात, असे त्यांचे म्हणणेआहे.

सारांश द्वितीया आणि चतुर्थी याविषयी व्याकरांकारामध्ये हे मतभेद आहेत. समान प्रत्यय असले तरी दोन विभक्तींची कार्ये स्वतंत्र असल्यामुळे या दोन्ही विभक्तीमानणे हे यथोचित ठरते.

**तृतीयाविभक्ती**

तृतीया विभक्तीविषयी कोणतेही मतभेद नाहीत. ने, ए, ई, शी हे एकवचनाचे आणि नि, ही, ई, शी हे अनेकवचनाचे प्रत्यय आहेत. आजच्या मराठीत ने व नी हे दोनच प्रत्यय आढळतात. कारकवाद्यांनी क्रियेचे  साधन या अर्थाने 'करणकारक' असेनाव तृतीयेला दिले आहे.

**पंचमीविभक्ती**

पंचमी विभक्ती मानण्याकडे अनेकांचा कल असला तरी अरविंद मंगरूळकर आणि अर्जुन वाडकर यांनी ही विभक्ती मानू नये असे म्हटले आहे. ग.मो. पाटील यांनी ह्या विभक्ती विरोध केलेला दिसतो. त्याची कारणे अशी-

१) पंचमीचे प्रत्यय ऊन, हून हे दोन अक्षरी आहेत.
२) ऊन हा प्रत्यय सर्वनामांना लागत नाही. ज्या काही नामांना लागतो येथे त्या नामाचे सामान्य रूप न होता पररूप संधीने लागतो.
३) हून प्रत्ययाचे शब्दयोगी अव्ययाशी नाते आहे. उदा. त्याच्याहीपेक्षा, त्याच्याहीहून इत्यादी
४) पंचमी विभक्त्यंत रूप विश्लेष्य आहे. (जसे- रामाहीहून)

पंचमी विभक्ती मानण्यासाठी मोडक आणि काही युक्तिवाद केला आहे आहे त्यांच्या मते-

१) 'घरून' सारख्या अत्यल्प रूपात का होईना पंचमी विभक्ती आढळते.
२) पंचमी मानण्याची रूढी आहे.
३) पंचमी मानल्यास कोणतीही हानी नाही. त्यामुळे विभक्तीचा क्रम अबाधित राहतो.

**षष्ठी विभक्ती**

षष्ठी ही मराठीतील अत्यंत वादग्रस्त विभक्ती आहे.या वादात षष्ठी मानवी आणि षष्ठी मानू नये असे दोन गट असलेले दिसतात. कृष्णशास्त्री चिपळूणकर, म. पा. सबनीस, ग. मो. पाटील, अरविंद मंगरूळकर या व्याकरणकारानी षष्ठीला विरोध केलेला दिसतो. या व्याकरणकारांची मते पुढीलप्रमाणे-

१) कृष्णशास्त्री चिपळूणकर म्हणतात 'लिंग, वचन, विभक्ती, सामान्यरूप हे विकार संस्कृतात होत नाहीत व मराठीत षष्ठी विभक्तीशिवाय दुसऱ्या विभक्तीस होत नाहीत.षष्ठीचा जो 'चा'त्यास मात्र हे विकार होतात.

२) संस्कृतातील षष्ठीच्या प्रत्ययापासून मराठीत षष्ठीचे प्रत्यय आलेले नाहीत. संस्कृतातील तद्धित प्रत्ययापासून ते उत्पन्न झाले असावेत.

३) षष्ठीलाकारकसंबंध नाही म्हणून तिची गणना विभक्तीत करू नये असे चिपळूणकरांचे व  गोडबोले यांचे म्हणणे आहे.

४) दामले यांनी षष्ठीचा पक्ष घेतला परंतु त्यांच्या मतांना मंगळूरकर यांनी विरोध केला आणि षष्ठीचे विभक्तित्व नाकारले.

षष्ठीच्या संदर्भात दोन पक्ष पडलेले दिसतात एक्ष षष्ठीवादी आणि दुसरा षष्ठीविरोधक

षष्ठी विभक्तीच्या विरोधात जे म्हणून मुद्दे मांडले जातात त्यातील ठळक मुद्दे असे आहेत-

१) षष्ठीला कारकार्थ नाही.

२) षष्ठीचे प्रत्यय हे चरम प्रत्यय नाहीत. उदा. त्यांचा –त्यांचाही.

३) षष्टीचे प्रत्यय विशेषणात्मक आहेत.

४) विभक्तिप्रत्ययांस लिंग, वचन, विभक्ती, सामान्यरूप हे विकार संस्कृतात वगैरे होत नाहीत. मराठीत फक्त षष्ठीचा त्याला अपवाद आहे. त्यामुळे हा तद्धित प्रत्यय मानावा. संस्कृतातील षष्ठीच्या अर्थाच्या तद्धित 'ईय' या प्रत्ययापासून तो निर्माण झाला असावा.

५) षष्ठीचे प्रत्यय लागून अव्ययापासून विशेषणे बनतात. उदा. एथचा, वरचा इत्यादि.

चिपळूणकरानी 'चा' प्रत्ययाला तद्धित प्रत्यय मानून षष्ठीला विरोध केल्यानंतर षष्ठीच्या बाजूने व विरोधात वेगवेगळे मुद्दे समोर आले ते पुढील प्रमाणे-

दामले यांनी या मुद्द्यांचा परामर्श घेऊन षष्ठीचे समर्थन केले. दामले यांच्या प्रतिपादनाचा सारांश पुढीलप्रमाणे-

१) षष्ठीला कारकार्थ नसल्यामुळे ती विभक्ती नव्हे या आक्षेपाला अर्थ नाही. याने फारतर इतकेच सिद्ध होईल की कारकाद्वारा केलेले विभक्तिलक्षण त्याज्य होय.

२) संस्कृत 'ईय'या तद्धित प्रत्ययापासून मराठीतषष्ठीचा 'चा'प्रत्यय आला असे म्हणता येणार नाही.

३) तद्धित प्रत्ययापूर्वी नामाचे सामान्यरूप कधीच होत नाही. काही अपवाद सोडता यापूर्वी मात्र नामाचे सामान्यरूप होते. असे अपवाद नागपूरला, नागपूरहून इत्यादी ठिकाणी अन्य प्रकाराबाबतही आढळतात.

४) 'चा' प्रत्यय चरम प्रत्यय नाही हे खरे असले तरी ही गोष्ट सप्तमीच्या प्रत्ययाबाबतीतही आढळते. उदा क्रांतीचा, रात्रीचा.हा विभक्ती प्रत्ययमूळ संस्कृतातही निरपवाद नाही.

५) 'चा'प्रत्ययाप्रमाणे 'ला' प्रत्ययाने येथला, तिथला इत्यादी विशेषणे होतात.पण या 'ला' प्रत्ययास कोणी विभक्तिप्रत्यय म्हणत नाही. विशेषणातील 'ला' व चतुर्थीचा 'ला' असे दोन भिन्न प्रत्यय समजले जातात.तोच न्याय येथला, तिथला या रूपातील 'चा'ला लागू होतो.

६) तद्धित प्रत्ययापासून वचनाचा बोध होत नाही. परंतु चा प्रत्ययान्त शब्दापासून वचनाचा बोध होतो. घरचा (एक वचन) घरांचा (अनेक वचन).

७) षष्ठीविभक्तीच्या अभावी केळफुल, देवघर इत्यादी षष्ठी तत्पुरुष समासाची व्यवस्था लावता येणार नाही.

८) विशेषणापासून भाववाचक नामे साधतात पण हातचे, घराचे, मुलाचा ही जर विशेषणे होत तर त्यापासून भाववाचक नाम कोणते व कसे साधते.

दामले यांच्या प्रतिपादनाचा मुख्य भर षष्ठ्यन्त रूपे विश्लेषणात्मक नाही ते सिद्ध करण्यावर आहे. कारण षष्ठीच्या विरोधात जाणारा तो एकच मुद्दा आहे.

मंगरूळकरांनीषष्ठीचा विभक्तीमध्ये समावेश करणे समर्थनीय नाही, याविषयी आता फारसा विवाद उरलेला नाही, असे सांगत षष्ठीच्या समर्थनार्थ दामले यांनी मांडलेल्या अनेक मुद्द्यांचा विस्तारपूर्वक विमर्श केला आहे.षष्ठीविभक्ती विश्लेषणात्मक असल्यामुळे तिथे स्वरूप अन्य विभक्तीहून सर्वथा वेगळे आहे. या व इतर कारणांमुळे षष्ठीचा सर्वच व्यवहार इतर विभक्तीहूनविलक्षण असल्यामुळे ती वगळून तिचा समावेश विशेषणात 'पांढरगणात' करावा असे मंगरूळकरांनी म्हटले आहे.

अर्जुनवाडकरांनी मंगरूळकर यांच्या प्रतिपादनाचा परामर्श करताना मंगरुळकरांनी कुस्ती जिंकली असा निर्णय करणे कठीण असल्याचे म्हटले आहे. त्याविषयी अर्जुनवाडकर यांचे मत असे-

१) षष्ठीच्या ठिकाणी विशेषणाचे धर्म आहेत म्हणून तिला विभक्तीतून उठून पाहतात ते ज्या आख्यातात विशेषणाचे धर्म आहेत त्यांना(ताख्यात, वाख्यात)आख्यातातून वगळत नाहीत.त्यामुळे षष्ठीला एक न्याय आणि आख्याताला दुसरा न्याय लावणे सुसंगत नाही.

२) षष्ठीचे प्रत्यय चरमप्रत्यय नाहीत हे खरे असले तरी ई-आख्याताची अकरणरूपे करतानाही मध्ये 'ना' हे अव्यययेते. जसे –येईनात, जाईनात. धातू आणि 'त' हा प्रत्यय त्यांच्यामध्ये 'ना'ही अव्यय आलेम्हणून आख्याततत्त्व बाधित होत नाही.
अशाप्रकारे मराठीतील षष्ठी विभक्ती ही सर्वात विवादास्पद असलेली दिसते. मात्र पारंपरिक विवेचनात ही विभक्ती मानलेली दिसते. तसेच भाषेवरही या विभक्तीचा मोठा प्रभाव आहे.

**सप्तमी विभक्ती**

सप्तमी विभक्ती काहीशी वादग्रस्त आहे. सप्तमीचे त, ई. आ हे एकवचनाचे व अनेकवचनाचे प्रत्यय आहेत.कारकवाद्यानी स्थळ-काळ या अर्थी तिला 'अधिकरण' असे म्हटले आहे. दामले यांनी संस्कृतीच्या आधारे हीविभक्ती मानली. ग. मो. पाटील यांनीही विभक्ती मागण्यास विरोध केला आहे.

१) डॉ. पाटील यांच्या मते, सप्तमीच्या प्रत्ययांनी साधलेली सर्वच रूपे क्रियाविशेषण बनून क्रियेबद्दल स्थळ, काळ दाखवतात म्हणून सप्तमीच्या प्रत्ययांना क्रियाविशेषण साधितप्रत्यय मानावेत. उदा. 'तो मैदानात खेळतो.''तो सकाळी येतो.'

२) प्रा. मंगरूळकर यांच्या मते, सप्तमीचे प्रत्यय त, ई. आ असे देतात. यातील 'आ'हा प्रत्यय बोटावर मोजण्याइतकयाच नामाना लागतो. जसे –माथा, गळा, पाया इत्यादी. सर्वनामाना लागत नाही.ई हा प्रत्यय केवळ नामानाच लागतो. त्याठी अकारान्त नामांना लागत नाही.

३) मंगरूळकर यांच्या मते, सप्तमीच्या 'त' प्रत्ययांच्या ठिकाणी वैलक्षण आहे. तोचरमप्रत्यय नाही.त्याला ऊन,ला इत्यादी शेषप्रत्यय लागतात. उदा. घरातून,घरातला.

**संबोधनविभक्ती**

संबोधन हीदेखील काहीशी वादग्रस्त विभक्ती आहे.ती न माणण्याकडे अनेकांचा कल आहे. संबोधनालाएकवचनी प्रत्यय नाहीत. अनेकवचनी 'नो' हा प्रत्यय आहे. दामले यांनी परंपरा म्हणून विभक्ती मानली आहे.

१) संबोधला एकवचनाचे प्रत्यय नाहीत.

२) विभक्तीवाचून संबोधनाचा कोणत्या गटात समावेश करणार? हा प्रश्न उद्भवतो.

३) संबोधनाला वाक्यगत घटकपदांशी अन्वय होताना हे पद कोणत्याही विभक्तीत येऊ शकते. म्हणजे त्याचा दुसऱ्या पदाशी संबंध असतो. उदा.'मुलांनो तुम्ही आज अभ्यास केला नाही.' या वाक्यातील मुलांनो या रूपाचा तुम्ही या सर्वनामाशी संबध आहे.

संबोधनाला स्वतंत्र प्रत्यय आहेत. त्यांना पुढे विकृती होत ना. म्हणून संबोधनाचा स्वीकार करावा असे दामले यांनी म्हटले आहे.

ग. मो. पाटील यांनी संबोधन विरोध करताना असे म्हटले की,

१) संस्कृतमध्ये संबोधनाला प्रत्यय नाहीत व कारकार्थही नाहीत म्हणून तिला स्वतंत्र विभक्ती मानलेली नाही.

३) वाक्यातील कोणत्याही पदाशी संबोधनाचा कोणताही संबंध नसतो. वाक्यातील संबोधन काढून टाकले तरी अर्थबोध होण्याच्या दृष्टीने काही अडत नाही.

४) सर्वनामाला संबोधन कधीच लागू होत नाही.

४) संबोधनाबरोबर अरे, ए इत्यादी केवलप्रयोगी अव्यये येतात.

**शून्य प्रत्यय**

शून्य प्रत्यय ही मराठी व्याकरणातील एक महत्त्वाची संकल्पना आहे. ही विभक्ती विचारांशी निगडित असल्यामुळे तिचा विचार विभक्ती विवेचनात करण्यात येतो. वाक्यात

जेव्हा नाम सर्वनामांची प्रत्ययरहित शब्दरूपे येतात केव्हा त्या शब्दांना शून्य प्रत्यय मानले जातात. कारण प्रत्ययाशिवाय पद ही संकल्पना पूर्ण होत नाही. वाक्य हे पदानी बनलेले असते. म्हणून वाक्यात येणाऱ्या प्रत्येक शब्दाला प्रत्यय जोडले जाणे अपरिहार्य असतात. मात्र जेव्हा प्रत्येक नसतात तेव्हा हा शून्यप्रत्यय मानला जातो.

पाणिनीच्या व्याकरणातून आलेली ही संकल्पना आहे. जेव्हा एकच ध्वनिरूप भिन्न प्रकारचे व्याकरणिक कार्यकरते तेव्हा ही संकल्पना वापरली जाते.हत्ती हे नाव एकवचनात व अनेकवचनात एकच अर्थ व्यक्त करते. त्याच्या बाह्य रुपात कोणताही बदल होत नाही. म्हणून अनेकवचनाचा प्रत्ययलोप होतो म्हणून तिथे शून्यप्रत्यय मानला जातो.

प्रथमा विभक्तीतही या संकल्पनेचा उपयोग होतो.शब्दाचे मूळ रूप तेच प्रथमेचे रूप होय. मंगळूरकरांनी एकवचन व अनेकवचन प्रथमा व संबोधन या व्यक्तीचे प्रत्ययही शून्यप्रत्यय सांगितले आहेत. 'तो पेरू खातो.'या वाक्यात पेरू या पदाला कोणताच प्रत्यय नाही.म्हणून तिथे शून्यप्रत्यय मानवा लागतो.

मराठीत प्रथमेला एकवचनाचा प्रत्यय नाही असें न म्हणता प्रत्ययाचा लोप किंवा शून्यप्रत्यय सांगणे हे अर्जुनवाडकरांना तर्कशुद्ध वाटते.

**विभक्ती प्रत्ययावरून की अर्थावरून**

विभक्ती प्रत्ययावरून मानाव्यात की अर्थावरून हा एक महत्त्वाचा वाद व्याकरणकारांमध्ये आहे. काही व्याकरणकार प्रत्ययवादी आहेत, तर काही व्याकरणकार अर्थवादी आहेत. दोघांनीही आपली मतेआग्रहाने मांडली आहेत.

विभक्ती प्रत्ययावरून मानाव्यात असे म्हणणाऱ्या व्याकरणकारांची मते -

१) मूळ संस्कृत भाषेत प्रत्ययावरून विभक्ती मानल्या आहेत आणि मराठीत विभक्ती विचार संस्कृतमधून आल्याने मराठीतही प्रत्ययावरून मानाव्यात.

२) वाक्यात शब्दांची रूपे होतात ती प्रत्यय लागल्याने होतात. विभक्ती हवीत विकार आहे आणि शब्दविचार आहे. वाक्यविचार नव्हे.म्हणून वाक्यातील अर्थाच्या संबंधात विचार करणे योग्य नाही.

३) कारकव्यवस्था सदोष आहे. त्यामुळे कारकावरून विभक्ती मानणे योग्य नाही.

४) नाम, सर्वनाम या शब्दांचा नेहमी क्रियापदाची संबंध असतो असे नाही, तो इतर शब्दांशीही असतो. उदा. आमचा मुलगा.

५) विभक्तीमध्ये अर्थ महत्त्वाचा असला तरी तो प्रत्ययांशिवाय व्यक्त होत नाही. त्यामुळेच अर्थ व्यक्त होतो म्हणून प्रत्यय महत्त्वाचे आणि अर्थ गौण होय.

६) प्रत्यय भिन्न भिन्न असले तरी एकच अर्थ स्पष्ट करणारे प्रत्यय एका जातीचे समजून समान अर्थांच्या प्रत्यययांचा एक गट करून त्यांची वर्गवारी आहे केली आहे. त्यांनाच प्रथमा, द्वितीया अशी नावे दिली आहेत, ती योग्य आहेत.

७) षष्ठी विभक्तीच्या ठाई विभक्तीचे गुणधर्म असल्याने ती विभक्ती मानावी. कारकावरून ती त्याज्य मानणे योग्य नाही.

८) एकच प्रत्यय भिन्नभिन्न अर्थाने येत असला तरी त्यामुळे विभक्तीत्त्व नाकारणे योग्य नाही.

९) एकच विभक्ती भिन्न भिन्न अर्थाने येते ही अपूर्णावस्था आहे. परंतु त्यामुळे फारसे बिघडत नाही. तिचा उपयोग कोणत्या कोणत्या अर्थाने होतो त्याची नोंद घेतली तरी पुरे.

याउलट अर्थावरून विभक्ती मानावी म्हणणाऱ्या व्याकरणकारांची मते अशी-

१) उत्पत्तीचा आधार योग्य नाही कारण मराठीचे विभक्तिप्रत्यय प्रत्यक्ष संस्कृतवरून आले नसून ते संस्कृत –प्राकृत -अपभ्रंश या मार्गाने आले आहेत. त्यामुळे संस्कृतपेक्षा मराठी विभक्तीचे स्वरूप वेगळे आहे.

२) विभक्तीमध्ये प्रत्ययापेक्षा अर्थास महत्त्व आहे. अगोदर अर्थ नंतर प्रत्यय म्हणून अर्थ महत्त्वाचा प्रत्ययगौण आहेत.

३) कारकार्थ महत्त्वाचे असल्याने कारकार्थावरूनच विभक्ती मानाव्यात.कारक सहा प्रकारचे असल्याने मराठीत विभक्ती संख्या सहा मानावी.षष्ठी व संबोधनास कारक नसल्यामुळे त्या विभक्ती मानू नये.

४) विभक्तिप्रत्यय लागणारे शब्द यांचा परस्परांशी संबंध नसून तो क्रियापदाची असतो.हाच कारकसंबंध होय.

५) कारकावरून विभक्तीनाकर्तृकारक, कर्मकारक,करणकारक अशी अर्थावरून नावे देणे योग्य. प्रथमा, द्वितीया अशी देऊ नये.

६) प्रत्ययावरून विभक्ती मानण्यात अनेक अडचणी येतात. प्रथमेला प्रत्यय नाहीत. द्वितीया व चतुर्थीचे समान प्रत्यय आहेत. अशा वेळीच नव्हे तर प्रत्येक वेळी विभक्ती ठरवताना अर्थाचे सहाय्य घ्यावे लागते.

७) प्रत्यय हे बाह्यरूप असून अर्थ आत्मा असतो. त्यामुळे प्रत्ययापेक्षा अर्थाला महत्त्व आहे.

८) प्रत्ययव्यवस्था सदोष असल्याने प्रत्ययावरून विभक्ती मानणे अडचणीचे आहे. एकच प्रत्यय भिन्नभिन्न अर्थ व्यक्त करतो अशावेळी अर्थाचे सहाय्य घ्यावे लागते.

विभक्ती विचारात महत्त्व प्रत्ययाला की अर्थाला हा वाद एकांगी व दुराग्रही आहे. म्हणून सबनीसांनी स्वीकारलेली भूमिका योग्य वाटते. विभक्ती हा विकार आहे. तो नामाचा

क्रियापदाची असलेला संबंध दाखवण्यासाठी होतो. म्हणून कारकानां महत्त्व आहे. पण विकाररूपे प्रत्ययांच्याद्वारे होतात व विभक्तिप्रकार प्रत्ययामुळे होतात. म्हणून विभक्ती ओळखण्याच्या कामी प्रत्ययांचे महत्त्व अधिक आहे. म्हणजे विभक्ती ठरवताना दोहोंचे सहाय्य घ्यावे व दोघांनाही महत्त्व द्यावे.

**सामान्यरूप**

सामान्यरूपाचा विचार विभक्तिविचारात मोडतो. सामान्यरूप ही मराठी भाषेची विशेषता आहे. म्हणून विभक्तिविचारात सामान्यरूपाला महत्त्व आहे. कारण नाम, सर्वनाम याना विभक्तिप्रत्यय जोडले जाताना त्यांच्या अंत्याक्षरांमध्ये बदल होतो त्याला सामान्यरूप असे म्हणतात. उदा.'पुस्तक' या शब्दाला तो हा प्रत्यय लागताना त्याचे 'पुस्तकात' असे रूप होते. म्हणजे मूळ पुस्तक याचे 'पुस्तका'सामान्यरूप होते.

**व्याख्या –**

१) विभक्तिप्रत्यय लागण्यापूर्वी प्रातिपदिकास जो विकार होतो या विकारास विभक्तिकार्य किंवा सामान्यरूप अशी पारिभाषिक संज्ञा आहे.

**२)** 'विभक्तिप्रत्यय लागण्यास अगदी तयार झालेले जे अंगचे रूप ते सामान्यरूप होय'- **दामले**

३) 'विभक्तिप्रत्यय घेणारे मूळ रूपाशी स्वरूप किंवा विरूप असे शब्द रूप ते सामान्यरूप' - **मोडक**

सामान्यरूप मराठीचे वैशिष्ट्य मानले जाते.विभक्तिप्रत्यय लागताना जसे शब्दाचे सामान्यरूप होते, तसे शब्दयोगीअव्यय लागतानाही शब्दाचे सामान्यरूप होते.जसे - घर –घरासमोर, झाड – झाडावर. दामले यांनी विकृतांग व अविकृतांगनामे असा भेद करून सामान्यरूपाचे प्रकार सांगितले आहेत. सामान्यरूप न होणाऱ्या अपवादात्मक शब्दांना ते अविकृतांग म्हणतात. गावचा पाहुणा, दूरदर्शनच्या बातम्या इत्यादि.

मराठीत सामान्यरूप होण्याचे वेगवेगळे प्रकार दृष्टीस पडतात. उदा. आकारान्त घड्याळा,ईकारान्त- कविता, एकारान्त– बागेत, कोणत्या शब्दात कोणती सामान्यरूपे लागतात हे त्यांच्या अंत्याक्षरांवर व लिंगावर अवलंबून असल्याचे चिपळूणकर सांगतात. सामान्यरूप विभक्त्यंत किंवा शब्दयोगी अव्ययरूपात होते असे नाही. नामिक गटातील विशेषण भाव असणाऱ्या काही शब्दांचे सामान्यरूप होते. जसे– पांढऱ्या घोड्याला.

सामान्यरूपाचे काही नियम असलेतरी प्रत्येकवेळी नियमानुसार सामान्यरूप होतेच असे नाही. सर्वनामाची सामान्यरूपे वेगळ्या पद्धतीने होतात. उदा. तो- त्याचा, आम्ही- आम्हाला इत्यादि.

******

## आख्यात विकार

मराठीत लिंग, वचन, विभक्ती आणि अख्यातहे प्रमुख चार विकार आहेत. या पैकी मुख्यत्वे आख्यातविकाराचा  विचार आपणास येथे करावयाचा आहे.नाम-सर्वनाम यांना विभक्तिविकार होतो तसा धातूला जो विकार होतो त्याला आख्यातविकार असे म्हणतात. धातूला विकार होऊन क्रियापदे तयार होतात, म्हणून आख्यात विकार हा क्रियापदविचार आहे.

## धातू व क्रियापद

पारंपरिक व्याकरणात धातू आणि क्रियापद या दोन संज्ञा काहीशा समान अर्थाने वापरल्या जातात. मात्र या दोन्ही संज्ञामध्ये थोडेफार भेद आहेत. धातू ही शब्दजाती आहे आणि क्रियापद हा विचार आहे.धातू व क्रियापदाच्या व्याख्या एकत्रित करण्याचे प्रयत्न वेगवेगळ्या व्याकरणकारांनी केले आहेत ते पुढील प्रमाणे-

१) ‘क्रियापद म्हणजे ज्या शब्देकरून कोणत्याही व्यापाराचा अथवा स्थितीचा बोध होतो ते... क्रियापदाचे मूळ त्यास धातू म्हणतात.’**- दादोबा पांडुरंग तर्खडकर**

**२)** ‘ज्या शब्दापासून कालगत क्रियेचा बोध होतो ती क्रियापदे’ **- कृष्णशास्त्री चिपळूणकर**

**३)** ‘वाक्यातील ज्या क्रियावाचक विकारी शब्दाने वाक्यासपूर्णता येते आणि वक्त्याचेदृष्टीने या क्रियेच्या आख्याताचा म्हणजे काळाचा किंवा काही विशेष अर्थाचा बोध होतो त्यास क्रियापद असे म्हणतात.’ **- मो. के. दामले**

**४)** ‘ज्याला अख्यातप्रत्यय लागतात तो धातू. धातूचा अर्थ ती क्रिया. धातू अधिक आख्यात प्रत्यय म्हणजे क्रियापद.’**अर्जुन वाडकर**

धातू हा क्रियादर्शक शब्द असला तरी दामले यांच्या मते,‘प्रत्येक धातुपासून कोणत्या ना कोणत्या प्रकारचा क्रियेचा बोध होतो असे नाही. बरेच धातू क्रियादर्शक आहेत. तथापि काही धातू सत्तादर्शक किंवा स्थितीदर्शक आहेत उदा.अस.

## आख्यात ही संज्ञा

धातूंना काळाचे आणि अर्थाचे प्रत्यय लागून क्रियापदे तयार होतात. संस्कृतात काळ आणि अर्थ यांची गणना विभक्ती या नावानेच केली गेली. मराठीत मात्र दामले यांनी यासाठी ‘आख्यात’ ही स्वतंत्र संज्ञा रूढ केली आहे. आख्यात हे नाव आज प्रचलित असले तरी ते अनेक टप्प्यातून गेलेले दिसते. म. ना.आचार्य यांनी धातू व्याकरणाच्या नामकरणाचा व वर्गीकरणाचा ऐतिहासिक आढावा घेतला असून त्यांनी पुढील टप्पे सांगितले आहे

१) पंडित व्याकरणात सहा प्रत्ययमाळा दिल्या आहेत.
२) दादोबानी इंग्रजी व्याकरणावरून काळ व अर्थ सांगितले आहेत.
३) चिपळूणकरांनी आख्यात ही संज्ञा वापरून प्रत्ययनिष्ठ भूमिका घेतली.

४) गुंजीकरांनी वर्तमान, आज्ञार्थ इत्यादीकालार्थवाचक संज्ञा बाजूला ठेवून आपल्या सुबोध व्याकरणामध्ये प्रथम आख्यात,दुसरे आख्यात अशी क्रमसूचक नावे वापरली आहेत.

५) दामले आणि ताख्यात, लाख्यात अशा प्रत्ययनिष्ठ संज्ञांची व्यवस्थित मांडणी केलेली दिसते.

दामल्यांनी नामविभक्तीप्रमाणे धातूविभक्तीनाही सांकेतिक नावे देण्यामागे आपली भूमिका स्पष्ट केली आहे. धातूंची प्रत्ययान्त रूपे अनेक अर्थ व्यक्त करीत असल्यामुळे नावाऐवजी अर्थहीन चिन्हे अधिक उपयुक्त होत असल्याचे दामले सांगतात.

**आख्यातांचेप्रकार**

मराठीतील प्रख्यातविचार वादग्रस्त नाही. धातूंना लागणाऱ्या प्रत्ययांचे वर्गीकरण काळानुसार करायचे की अर्थानुसार हा आख्यातविचारातील एक महत्त्वाचा प्रश्न आहे. याचे उत्तर बहुतेक व्याकरणकारांनी प्रत्ययानुसार असे दिलेले आहे. राजवाडे, अर्जुनवाडकर, आचार्य आणि गुंजीकर यांनी आठ आख्याते सांगितली. तर दामले यांनी सात सांगितली आहेत. गुंजीकरांनी 'णार' हे भविष्यकाळ व निश्चय या अर्थाचे आख्यात वगळून दामल्यांनीसात आख्याते सांगितली आहेत.

प्रत्येक आख्यातात पुरुष, वचन, लिंग भेदाने क्रियापदाची जी रूपे होतात त्यांची माहिती दामल्यांच्या व्याकरणात विस्ताराने मिळते.

| **आख्यातवर्ग** | **अर्थ** | **उदाहारण** |
|---|---|---|
| प्रथम-ताख्यात | वर्तमान काळ | तो जातो |
| द्वितीय -ताख्यात | संकेतार्थ | जर तो जाता |
| लाख्यात | भूतकाळ | तो गेला |
| वाख्यात | विद्यार्थ | त्याने जावे |
| ई-आख्यात | रीती भूतकाळ | तो जा |
| ऊ- आख्यात | आज्ञार्थ | तो जावो |
| ईलाख्यात | भविष्यकाळ | तो जाईल |

दामले यांनी सांगितलेल्या आख्यातामध्ये चाख्याताची भर घालून आचार्यानी आठ आख्यातांची व्यवस्था सुचवली आहे. ते एक आख्यात म्हणजे चाख्यात होय.

| **आख्यातवर्ग** | **अर्थ** | **उदाहारण** |
|---|---|---|
| चाख्यात | रीती भूतकाळ | जायचा / त्याने जायचे |

मराठी दामले यांनी मांडलेल्या आख्यात व्यवस्थेचे स्वरूप पुढीलप्रमाणे सांगता येतील

१) धातूचे प्रत्यय लागून क्रियापदे तयार होतात त्यास आख्यातप्रत्यय म्हणतात.

२) आख्याते एकूण सात आहेत.

३) प्रत्येक व्याख्यातात तीन पुरुष, दोन वचने आणि तीन लिंगे आहेत. म्हणजे आख्यातरूप पुरुष, लिंग, वचन याप्रमाणे बनते.

४) विभक्तीप्रमाणे आख्यातेही प्रत्ययावरून मानली पाहिजेत.

**आख्यातांचे अर्थ**

**१) प्रथम ताख्यात (वर्तमानकाळ)**

ज्याला पारंपरिक व्याकरणात'वर्तमानकाळ' असे म्हणतात त्यास दामले यांनी 'प्रथमताख्यात' म्हटले आहे. या आख्याताचे प्रत्यय पुरुषाच्या लिंग वचनाप्रमाणे बदलतात.तिन्ही लिंगी बहुवचनी एकच प्रत्यय लागतात. फक्त एक वचनात फरक आहे.

**२) द्वितीय ताख्यात (संकेतार्थ)**

ज्याला पारंपरिक व्याकरणात'संकेतार्थ' असे म्हटले जाते त्यास दामले यांनी'द्वितीय ताख्यात'असे म्हटले आहे. प्रथमताख्याताप्रमाणेच त्याची रूपे असतात. याचे प्रत्यय लिंगानुसार बदलतात. जाता, असता, जातो, असतो इत्यादी.'पाऊस पडला असता तर पिके चांगली आली असती.''त्याने अभ्यास केला असता तर तो परीक्षेत पास झाला असता.'

**३) लाख्यात(भूतकाळ)**

ज्याला पारंपरिक व्याकरणात'भूतकाळ' असे म्हटले जाते त्यात दामले यांनी 'लाख्यात' असे म्हटले आहे. गेला, गेले, गेली अशी क्रियापदाची रूपे तयार होतात.

**४) वाख्यात (विद्यार्थ)**

ज्याला पारंपरिक व्याकरणात'विद्यर्थ' असे म्हटले जाई त्याला दामले यांनी 'वाख्यात' असे म्हटले आहे. ज्या अर्थापासून विशिष्ट प्रत्ययांच्याद्वारे विधी म्हणजे इच्छा, अपेक्षा, कर्तव्य, आशीर्वाद, सामर्थ्य इत्यादी हेतूंचा बोध होतो त्यास विद्यर्थ असे म्हणतात.'तुम्ही अभ्यास करावा.','त्यांनी एकनिष्ठ राहावे.','त्यांना शक्ती प्राप्त होवो. इत्यादी.

**५) ई –आख्यात(रीतिभूतकाळ)**

ज्याला पारंपरिक व्याकरणात'रीतिभूतकाळ' असे म्हटले जाते, त्यास दामले यांनी 'ई -आख्यात'असे म्हटले आहे.क्रियेची सवय, क्रियेचे सातत्य असा क्रियापदाचाभूतकाळी अर्थ असतो. जाई, जाऊ, जातअशी क्रियापदाची रूपे तयार होतात.

**६) ऊ –आख्यात (आज्ञार्थ)**

ज्याला पारंपरिक व्याकरणात'आज्ञार्थ' असे म्हटले जाते त्यास दामले यांनी 'ऊ – आख्यात' असे म्हातले आहे. विशिष्ट प्रत्ययांच्याद्वारे विनंती, आज्ञा, प्रार्थना यांचा बोध होतो त्यास आज्ञार्थ असे म्हणतात.'तुम्ही जा/ खेळा.''आपण देशासाठी लढू.'

**७) ई-लाख्यात (भविष्यकाळ)**

ज्याला पारंपरिक व्याकरणातभविष्यकाळ असे म्हटले गेले त्यास दामले यांनी 'ई-लाख्यात' असे म्हटले आहे. या आख्याताचे प्रत्यय ई – आख्याताच्या प्रत्ययापासून

आले असल्यामुळे त्याचे प्रत्यय लिंगभेद त्यानुसार बदलत नाहीत. जाईन, जाऊ, जातील अशी क्रियापदरूपे होतात.

**आख्यातव्यवस्थेवरील आक्षेप**

दामले यांनी धातूना लागणाऱ्या प्रत्ययांच्याआधारे आख्यात व्यवस्था मांडली. तिच्यावर काही व्याकरणकारांनी आक्षेप घेतलेले दिसतात.

१) म. पां.सबनीस यांच्या मते संस्कृतमध्ये आख्यात व विभक्ती या दोन्ही संज्ञा एकाच अर्थाने वापरल्या जातात. मराठीत त्याभिन्न अर्थाने घेणे योग्य नाही. तसेच काळ व अर्थ या दोन संज्ञा असताना आख्यातही नवी संज्ञा शोधण्याची आवश्यकता नाही.

थोडक्यात सबनिसांचाआख्यात ही संज्ञा वापरण्यास विरोध आहे.आख्यात संज्ञेचा मराठीने स्वतंत्ररीत्या उपयोग करण्यास हरकत नाही. काळ व अर्थ या दोन्ही संज्ञा असल्या तरी दोन्ही प्रकारच्या प्रत्ययांचा समावेश होऊ शकेल अशी संज्ञा वापरली तर काही बिघडत नाही.

२) दामले यांनी सात आख्याते मांडली आहेत ती प्रत्यायावरून मानली आहेत. प्रा. चंद्रकांत अदावतकरांनी यावर आक्षेप घेतला. त्यांच्या मते 'दामले यांनी दोन ताख्याते माणण्याची गरज नव्हती. एकाच ताख्यात मानून त्याचे दोन उपयोग सांगणे बरे असे दामले का म्हणत नाहीत?'

३) रा. भि. गुंजीकर यांनी शिकणार, करणार, देणारइत्यादीचे स्वतंत्र आख्यात मानले आहे. आख्यातसंख्या आठ मांडली. परंतु दामले म्हणतात त्याप्रमाणे 'णार - आख्यात मानण्याची गरज नाही; कारण ते आख्यात कृदंत आहे त्या पुढे त्याचे सहाय्य क्रियापद असते, व ते अध्याहृत म्हणजे गुप्त असते. जसे की, जाणार आहे, जाणार होता, जाणार असेल अशी त्या पदांची रूपे मिळतात म्हणून 'णार -आख्यात नावाचा प्रकार मानण्याची गरज नाही.

अशाप्रकारे आख्यात विचाराचे स्वरूप आहे.

## २.४ समारोप :

अशा प्रकारे आपणास वरील मुद्याच्या आधारे मराठी व्याकरणात लिंगविकार यांचा अभ्यास करीत असताना लिंगविकार हा सामान्यपणे नाम, सर्वनाम , विशेषण या शब्दाच्या जातीला कशा पध्दतीने विकार जाडतो यांचा विचार आपण वरील विवेचनावरून केला आहे. या मध्ये ज्यांना विकार जाडतो टो म्हणजे लिंग वचन आणि विभक्ती होत हे आपणास लक्षात ठेवणे आवश्यक आहे. कारण विभक्ती विकार जेवढे स्पष्ट व नियमबद्ध आहेत तेवढे लिंग , वचन विकार असलेले दिसत नाहीत . कारण मुळातच लिंग या शब्दाचा अर्थच आहे 'लक्षण,खूण ,किंवा चिन्ह असा अर्थ आपणास सांगता येईल म्हणून पुरुष वाचक शब्द हे पुल्लिंगी स्त्रीवाचक शब्द हा स्त्रीलिंगी , आणि पदार्थ वाचक

शब्द हा नपूसकलिंगी असा घेता येईल अशा प्रकारे वरील विवेचनाद्वारे विचार करता येईल .

**आपली प्रगती तपास :**

भाषेतील लिंगविकार सविस्तर स्पष्ट करा.

## २.५ स्वाध्याय :

**सरावासाठी प्रश्न**

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१) भाषेतील लिंग विचार म्हणजे काय ते सांगून स्वरूप वैशिट्याची सविस्तर चर्चा करा.

२) व्याकरणातील लिंग व्यवस्थेचे सामान्य नियम उलघडून दाखवा.

३) वचन विचार म्हणजे काय? वचनाचे प्रकार स्पष्ट करा.

४) विभक्ती म्हणजे काय? विभक्तीचे स्वरूप स्पष्ट करा.

५) विभक्तीचे प्रकार सांगा.

६) आख्यात विकार म्हणजे काय? आख्याताचे प्रकार सांगा.

**टिपा लिहा.**

१) विभक्ती विकार

२) विभक्तिप्रत्यय आणि शब्दयोगी अव्यय

३) संबोधनविभक्ती

४) पंचमीविभक्ती

**खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

**१) लिंगविकार म्हणजे काय?**

**२) दामले यांनी परंपरा म्हणून कोणती विभक्ती मानली आहे?**

**३)** दामले, चिपळूणकर यांनी कोणती लिंग व्यवस्था मान्य केली नाही?

**४)** मराठीमध्ये संस्कृतप्रमाणे किती विभक्ती मानण्यात आल्या आहेत?

५) डॉ. ग. मो. पाटील व मंगरूळकर यांनी कोणत्या विभक्तीला विरोध करून द्वितीया मानावी असे म्हटले आहे.

## २.६ संदर्भ ग्रंथ

१) **मराठी व्याकरणाचा अभ्यास ,** डॉ. प्रकाश परब, ओरिएंटल लॉंगमन प्रायव्हेट लिमिटेड, २००२.

२) **मराठी व्याकरण परिचय,** प्रा. डॉ. राजशेखर हिरेमठ, मेहता पब्लिशिंग हाऊस, २०००.

३) **मराठीचा भाषिक अभ्यास,** कानडे मु. श्री., संपा, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, १९९४.

४) **मराठीचे व्याकरण,** लीला गोविलकर, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९९३.

❖❖❖❖

# ३

# शब्दसिद्धी

**घटक रचना :**

३.१ उद्दिष्टे

३.२ प्रस्तावना

३.३ शब्द, पद व प्रत्यय संकल्पना

३.४ शब्दसिद्धीचे प्रत्यय

३.५ मराठीतील शब्दसिद्धी

  ३.५.१ उपसर्गघटित शब्द

  ३.५.२ प्रत्ययघटित शब्द

  ३.५.३ सामासिक शब्द

  ३.५.४ अभ्यस्त शब्द

३.६ समारोप

३.७ स्वाध्याय

३.८ संदर्भग्रंथ

## ३.१ उद्दिष्टे :

१) शब्द, पद व प्रत्यय या संकल्पना समजून घेणे.
२) शब्दसिद्धी प्रत्ययांचे सविस्तरपणे विश्लेषण करणे.
३) मराठीतील शब्दसिद्धी विचाराचा सविस्तर आढावा घेणे.
४) सिद्ध शब्द व साधित शब्द यांचा परिचय करून देणे.
५) उपसर्गघटित शब्द म्हणजे काय ते सांगून उपसर्गघटित शब्दांची मांडणी करणे.
६) प्रत्ययघटित शब्दाची व्याख्या स्पष्ट करून प्रत्ययघटित शब्दांची चर्चा करणे.
७) सामासिक शब्द ही संकल्पना स्पष्ट करून सामासिक शब्दांचे प्रकार अभ्यासणे.
८) अभ्यस्त शब्द म्हणजे काय ते समजून घेऊन अभ्यस्त शब्दांचे प्रकार स्पष्ट करणे.

## ३.२ प्रस्तावना

'शब्दसिद्धी' या अभ्यासघटकामध्ये मराठीतील शब्दसिद्धी विचाराचा सर्वांगाने विचार केला जाईल. तसेच शब्द व प्रत्यय संकल्पना, सिद्ध शब्द, साधित शब्द, उपसर्गघटित शब्द, प्रत्ययघटित शब्द, सामासिक शब्द, अभ्यस्त शब्द या संकल्पना आणि त्यांच्या प्रकारांचा सविस्तरपणे आढावा घेतला जाईल

शब्दसिद्धी म्हणजे काय? ते आता आपण पाहू. भाषा ही नियमबद्ध असते तसेच ती सर्जनशील असते. काटकसर आणि मितव्ययता हे भाषेचे विशेष सांगितले जातात. एकामागोमाग एक वर्ण येऊन रुढीने वा संकेताने शब्द तयार होतो व त्यातून एका शब्दापासून त्याला उपसर्ग, प्रत्यय वा अन्य शब्द लागून अनेक शब्द तयार होतात याला ‘शब्दसिद्धी' असे म्हणतात. थोडक्यात शब्द कसा तयार झाला म्हणजेच तो कसा सिद्ध झाला यालाच ‘शब्दसिद्धी' म्हणतात.

शब्दसिद्धी व पदसिद्धी या संज्ञा व्याकरणात भिन्न अर्थाने वापरल्या जातात. ही अर्थभिन्नता लक्षात घेण्यासाठी मुळात शब्द व पद यातील फरक लक्षात घेतला पाहिजे. शब्द व पद हे दोन्ही तसे सामान्य अर्थाने शब्दच. या दोघांमध्ये पारिभाषिक फरक सांगायचा झाला तर तो असा की मूळ कोशगत व त्यापासून साधित तो 'शब्द’ आणि वाक्यगत ते 'पद' होय.

'शब्द' ही वाक्यनिरपेक्ष संज्ञा आहे, तर 'पद' ही वाक्यसापेक्ष संज्ञा आहे. पद ही शब्दाची उपाधी आहे असेही म्हणता येईल. भाषेतल्या भाषेत साधित शब्द तयार होण्याच्या प्रक्रियेला 'शब्दसिद्धी' असे म्हणतात. तर शब्दाचे वाक्यगत रूप सिद्ध होण्याच्या प्रक्रियेला 'पदसिद्धी' असे म्हणतात. शब्दसिद्धी व पदसिद्धी या दोन्हींचे प्रत्यय वेगवेगळे आहेत. शब्दसिद्धीचे प्रत्यय चरमेतर प्रत्यय असतात, तर पदसिद्धीचे प्रत्यय चरम प्रत्यय असतात.

शब्दसिद्धीचे प्रत्यय हे नवीन शब्द तयार करणारे असल्यामुळे त्यांचे व्याकरणमूल्य तयार व्हायचे असते. शब्दसिद्धीचे प्रत्यय चरमेतर प्रत्यय असून ते लागून नवे शब्द तयार होतात.

* उदा.

- ‘शाबास' या सिद्ध शब्दाला ‘की' हा तद्धित प्रत्यय लागून ‘शाबासकी’ असा शब्द तयार होतो.
- 'गा' धातूला ‘ऊन' प्रत्यय लागून ‘गाऊन’ हे साधित तयार होते.
- 'गा' धातूला 'णारा’ हा कृत प्रत्यय लागून ‘गाणारा’ हे साधित प्रत्यय तयार होते.

काही अपवाद वगळता शब्दसिद्धीचे प्रत्यय शब्दांचे जात्यंतर करतात. म्हणजे शब्दजातीत बदल घडवून आणतात.

* उदा.

- ‘माणूस' हे नाव आहे, त्याला ‘की' प्रत्यय लागून ‘माणुसकी’ हे विशेषण होते.
- ‘चढ' धातूला 'णारा' प्रत्यय लागला तर ‘चढणारा' हे विशेषण तयार होते.

शब्दसिद्धीचे प्रत्यय हे शब्दावरून नवीन शब्द तयार करणारे असल्यामुळे त्यांचे व्याकरणमूल्य तयार व्हायचे असते. मराठी व्याकरणात मो. के. दामले यांचा शब्दसिद्धीचा विचार प्रमाण मानला जातो.

## ३.३ शब्द, पद व प्रत्यय संकल्पना

**१] शब्द -**

रुढीने किंवा परंपरेने अथवा संकेताने ज्या ध्वनींना वा ध्वनीसमूहाला अर्थ प्राप्त झालेला असतो, त्याला ‘शब्द' असे म्हणतात.

- उदा. झाड, घर, फळा, खडू, डोंगर, नदी, समुद्र इ.

**२] पद –**

पदाचा संबंध हा मुख्यतः वाक्याशीच असतो. पद हा वाक्याचा एक घटक असतो. वाक्यात आलेला शब्द म्हणजे पद होय. शब्दाला प्रत्यय लागून पद सिद्ध होते.

- उदा.

(शब्द + प्रत्यय = पद)

i) झाड + खाली = झाडाखाली

ii) गाडी + वर = गाडीवर

iii) विकास + ने = विकासने

iv) कविता + ला = कविताला

**३] प्रत्यय -**

ज्या ध्वनींना वा ध्वनीसमुच्चयांना स्वतंत्र अर्थ नसतो, त्यांचा स्वतंत्र कोठेच उपयोग केला जात नाही, त्यांना 'प्रत्यय' असे म्हणतात. प्रत्ययांमुळे शब्दाला पदत्व प्राप्त होते.

- उदा. स, ला, ते, णारा, की इ.

*** प्रत्ययांचे प्रकार :**

**१) चरम प्रत्यय –**

विभक्ती प्रत्यय, आख्यात प्रत्यय हे चरम प्रत्यय आहेत. ज्या प्रत्ययांमुळे शब्दाची वाढ खुंटते, ज्या प्रत्ययानंतर शब्दाला इतर कोणताही प्रत्यय लागू शकत नाही, अशा प्रत्ययाला ‘चरम प्रत्यय' म्हणतात. चरम प्रत्ययांना स्वतंत्र अर्थ नसतो.

- उदा. इल, ने, नी, स, ला, ते

**२) चरमेतर प्रत्यय -**

चरमेतर प्रत्ययांमुळे एका शब्दापासून दुसरा शब्द तयार होऊ शकतो. हे प्रत्यय चरम नसतात. ते शब्दसिद्धीचे प्रत्यय असतात.

- उदा. पणा, गिरी

i) तरुण + पणा = तरुणपणा

शहाण + पणा = शहाणपणा

ii) गुलाम + गिरी = गुलामगिरी

दादा + गिरी = दादागिरी

## ३.४ शब्दसिद्धीचे प्रत्यय

**१) तद्धित प्रत्यय -**

तद्धित प्रत्यय नामिकांना लागतात. म्हणजेच नाम, सर्वनाम, विशेषण यांना प्रत्यय लागून बनलेल्या शब्दांना 'तद्धिते' म्हणतात. तद्धित प्रत्यय लागून तयार होणाऱ्या प्रत्ययघटित शब्दांना 'तद्धिते' म्हणतात. दादोबांनी त्याला 'शब्दसाधिते' असे म्हटले आहे.

- उदा.

(नाम + तद्धित प्रत्यय = तद्धिते / नामसाधित/ शब्दसाधित)

i) आनंद + मय = आनंदमय

ii) मास्तर + की = मास्तरकी

iii) शाबास + की = शाबासकी

iv) तरुण + पणा = तरुणपणा

v) थंड + गार = थंडगार

**२) कृत प्रत्यय -**

कृत प्रत्यय धातूंना जोडले जातात. कृत प्रत्यय जोडून तयार होणाऱ्या शब्दांना 'कृदन्ते' म्हणतात. यालाच 'धातुसाधिते' असेही म्हटले जाते.

- उदा.

(धातू + कृत प्रत्यय = कृदन्ते/ धातुसाधिते)

i) रड + का = रडका

ii) फाट + का = फाटका

iii) पड + का = पडका

## ३.५ मराठीतील शब्दसिद्धी

एकामागोमाग एक वर्ण येऊन रुढीने वा संकेताने शब्द तयार होतो व त्यातून एका शब्दापासून त्याला उपसर्ग, प्रत्यय वा अन्य शब्द लागून अनेक शब्द तयार होतात याला 'शब्दसिद्धी' असे म्हणतात. मराठीत उपसर्गघटित, प्रत्ययघटित, सामासिक, अभ्यस्त या चार प्रकारांनी शब्दसिद्धी होते. थोडक्यात शब्द कसा तयार झाला म्हणजेच तो कसा सिद्ध झाला यालाच 'शब्दसिद्धी' म्हणतात. भाषेतील सर्व शब्दांचे सिद्ध व साधित असे दोन भाग पडतात.

**अ] सिद्ध शब्द**

**ब] साधित शब्द**

**अ] सिद्ध शब्द -**

जे शब्द इतर शब्दांपासून व्युत्पन्न झालेले नसून स्वतः सिद्ध असतात, त्या शब्दांना 'सिध्द शब्द' म्हणतात.

- उदा. माती, डोंगर, झाड, समुद्र, विचार, हवा, ढग इ.

*** सिद्ध शब्दांचे प्रकार :**

१) तत्सम शब्द
२) तद्भव शब्द
३) देशी शब्द
४) परभाषीय शब्द

**१) तत्सम शब्द :**

जे संस्कृत शब्द मराठी भाषेत जसेच्या तसे काहीही बदल न होता आले, त्यांना 'तत्सम शब्द' असे म्हणतात.

- उदा. अग्नी, दीप, राजा, परंतु, दुग्ध, चक्र, गृह, पुष्प, अंध, जल, पुत्र, पिता, कन्या, गुरू, पुरुष, वृक्ष, विद्वान, पिंड, दंड, गायन, प्रसाद इ.

**२) तद्भव शब्द :**

जे शब्द संस्कृतमधून मराठीत येताना त्यांच्या मूळ रूपात काही बदल होतो, त्या शब्दांना 'तद्भव शब्द' असे म्हणतात.

- उदा. घर, गाव, दूध, फुल, चाक, काम, घाम, आग, पान, वीज, शेत, पाणी, पेटी, विनंती, तहान, कोवळा इ.

**३) देशी शब्द –**

जे मूळ मराठीतील शब्द आहेत त्या शब्दांना 'देशी शब्द' असे म्हणतात.

- उदा. झाड, पोट, लुगडे, डोळा, घोडा, दगड, डोके, हाड, गुडघा, झोप, वांगे, चिमणी, कंबर, पीठ, मुलगा, लाजरा, वेडा इ.

**४) परभाषीय शब्द –**

इतर भाषांमधून मराठी भाषेत आलेल्या शब्दांना 'परभाषीय शब्द' असे म्हणतात.

- उदा.

- **पोर्तुगीज** – बटाटा, तुरुंग, चावी, पगार, जुगार, कोबी, फणस, हापूस, घमेले, लोणचे, तंबाखू, तिजोरी, काडतूस इ.
- **फारसी** – पोशाख, रवाना, अत्तर, हकीकत, महिना, अब्रू, पेशवा, सरकार, गुन्हेगार, कामगार, महिना, हप्ता, समान, बाम, शाई, गरीब इ.
- **अरबी** – अर्ज, इनाम, जाहीर, खर्च, मेहनत, मंजूर, साहेब, मालक, मौताज, इनाम, नक्कल, पैज, शहर, मजबूत, नजर इ.
- **कानडी** – खलबत्ता, विळी, अडकित्ता, हंडा, भांडे, तांब्या, अक्का, अण्णा, गाजर, भाकरी, बांगडी, पिशवी, लवंग, खोली, किल्ली, पापड, तूप, चिंधी, गच्ची, खिडकी इ.
- **तेलगू** – शिकेकाई, डबी, बंडी, अनरसा, किडूकमिडूक इ.
- **हिंदी** – बच्चा, भाई, दिल, बात, बेटा, नानी, तपास, इमली, दाम, करोड इ.
- **गुजराती** – ढोकळा, दादर, रिकामटेकडा, दलाल, शेट, सदरा, घी इ.
- **इंग्रजी** – टेबल, पेन, डॉक्टर, स्टॉप, स्टेशन, रेल्वे, बस, ऑफिस, आईसक्रीम, ग्लास, कोर्ट, सायकल, बॉल, बॅट, ड्रायव्हर, टीचर, मॅडम, पार्सल, हॉस्पिटल, फाईल, पास, कप, नंबर, पेपर, नर्स, पेपर, इंजेक्शन इ.

**ब] साधित शब्द -**

जे शब्द इतर शब्दांपासून व्युत्पन्न झालेले असतात, म्हणजेच इतर शब्दांपासून बनलेले असतात त्यांना 'साधित शब्द' म्हणतात.

- उदा. पितांबर, गैरहजर, जबाबदार, अपुरा, गैरव्यवहार इ.

*** साधित शब्दांचे प्रकार :**

मराठीत उपसर्गघटित, प्रत्ययघटित, सामासिक, अभ्यस्त या चार प्रकारांनी शब्दसिद्धी होते.

१) उपसर्गघटित शब्द
२) प्रत्ययघटित शब्द
३) सामासिक शब्द
४) अभ्यस्त शब्द

### ३.५.१ उपसर्गघटित शब्द :

उपसर्ग हे शब्दांच्या आधी येतात. शब्दाच्या पूर्वी किंवा आधी उपसर्ग लागून जो नवा शब्द तयार होतो त्याला 'उपसर्गघटित शब्द' म्हणतात.

* उदा.

i) ‘पूर्ण’ शब्दाच्या आधी ‘अ’ हा उपसर्ग लागून ‘अपूर्ण’ शब्द तयार झाला.

(अ + पूर्ण = अपूर्ण)

ii) ‘रोज’ शब्दाच्या आधी ‘दर’ हा उपसर्ग लागून ‘दररोज’ शब्द बनतो.

(दर + रोज = दररोज)

iii) 'प्रकार' शब्दाच्या पूर्वी ‘उप’ उपसर्ग लागून ‘बेईमान' शब्द बनतो.

(उप + प्रकार = उपप्रकार)

iv) शब्दाच्या आधी ‘सब’ हा इंग्रजी उपसर्ग लागून पुढील शब्द बनतात -

सब - सबइन्स्पेक्टर, सबटायटल, सबजज, सबकास्ट

- **उपसर्गघटित शब्द पुढीलप्रमाणे –**

उपसर्ग ही संस्कृत व्याकरणातील संकल्पना आहे. त्यामुळे संस्कृत उपसर्ग अधिक असलेली दिसतात. उपसर्ग हे संस्कृत, मराठी, फारसी, अरबी या भाषेतून आलेले आहेत. त्यांचा वापर स्वतंत्र होत नाही. उपसर्गांच्या साहचर्यामुळे धातूच्या अर्थात बदल होतात.

- **संस्कृत व मराठी उपसर्ग :**

- अ – अशिक्षित, असुंदर, अविकार, अनैसर्गिक, अबोल, अज्ञान, अमोल, अविचार, अमंगल, अदृश्य, अतृप्त, अजाण, अवैध
- अति – अतिक्रमण, अतिसार, अतिव्याप्ती, अतिरंजक, अतिशहाणा, अतिश्रम
- अधि – अधिकारी, अधिपती, अधिष्ठाता, अधिष्ठान

- आ – आजन्म, आमरण, आस्वाद, आकर्षण, आकंठ
- अनु – अनुक्रम, अनुकृती, अनुयायी, अनुकरण, अनुप्रास, अनुराग, अनुरूप, अनुवाद, अनुमान, अनुताप
- अप – अपमान, अपयश, अपघात, अपवाद, अपव्यय, अपशब्द, अपशकून, अपहरण, अपभ्रंश
- उप – उपप्रकार, उपवास, उपकरण, उपक्रम, उपहार, उपयोजित, उपभेद, उपग्रह, उपदिशा, उपनाम, उपनगर, उपरोधिक
- प्र – प्रमुख, प्रक्रिया, प्रख्यात, प्रशिक्षित, प्रयोग, प्रबळ, प्रगती, प्रभाव, प्रवृत्ती, प्रशांत
- सु – सुविचार, सुसंवाद, सुनियोजित, सुबोध, सुमंगल, सुजाण, सुमन, सुशोभित, सुज्ञानी, सुशिक्षित, सुयोग्य
- परा – पराजय, पराजित, पराभव
- प्रति – प्रतिस्पर्धी, प्रतिगामी, प्रतिकूल, प्रतिसाद, प्रतिघात
- अभि – अभिमान, अभिरूची, अभिवादन, अभिशाप
- अति – अतिक्रमण, अतिसार, अतिव्याप्ती, अतिरंजक, अतिशहाणा, अतिश्रम
- वि – विजय, विरोध, विख्यात, विवाद, विसंगत
- नि – निमग्न, निकामी, निबंध, निवृत्ती
- अड – अडवणूक, अडसर, अडथळा
- आड – आडनाव, आडवळण, आडकाठी, आडपडदा, आडवाट
- अव – अवकाश, अवजड, अवखळ, अवघड, अवतरण, अवगत, अवलक्षण, अवमान, अवकृपा, अवमूल्यन, अवकाळी, अवगुण

- **फारसी / अरबी उपसर्ग :**

- बे – बेजबाबदार, बेफाम, बेअब्रू, बेधडक, बेदखल, बेरोजगार, बेईमान, बेमिसाल, बेशिस्त, बेकार, बेअक्कल, बेवारस
- बद – बदनाम, बदलौकिक, बदसुरत, बदमाश, बदकर्म
- हर – हरसाल, हरप्रकारे, हरघडी, हरकत, हररोज
- दर – दररोज, दरमहा, दरवेळी, दरदिवशी, दरसाल, दरवाजा, दरमजल
- गैर- गैरसमज, गैरसोय, गैरहजर, गैरवापर, गैरप्रकार, गैरवाजवी,
- सर – सरसकट, सरन्यायाधीश, सरचिटणीस, सरपंच, सरलष्कर, सरनौबत
- कम – कमनशिबी, कमजोर, कमकुवत
- ऐन – ऐनवेळी, ऐनपावसात
- बिन – बिनधास्त, बिनतोड

## ३.५.२ प्रत्ययघटित शब्द :



शब्दांच्यापुढे वा नंतर साधित प्रत्यय लागून जे नवीन शब्द तयार होतात, त्यांना 'प्रत्ययघटित शब्द' म्हणतात.

- उदा.

  (शब्द + प्रत्यय = प्रत्ययघटित शब्द)

  i) चढ + आई = चढाई

  ii) लढ + आई = लढाई

  iii) खेळ + कर = खेळकर

- **प्रत्ययाचे दोन प्रकार पडतात -**

१) तद्धित प्रत्यय

२) कृत प्रत्यय

### १) तद्धित प्रत्यय -

तद्धित प्रत्यय हे नामिकांना म्हणजेच नाम, सर्वनाम, विशेषण यांना लागतात. तद्धित प्रत्यय लागून तयार होणाऱ्या प्रत्ययघटित शब्दांना 'तद्धिते' म्हणतात. दादोबांनी त्याला 'शब्दसाधिते' असे म्हटले आहे.

- उदा.

  i) तरुण + पणा = तरुणपणा

  ii) थंड + गार = थंडगार

- **तद्धिते/ शब्दसाधिते (नामसाधिते) –**

- की – माणुसकी, बांधिलकी, पावकी, दिडकी, शाबासकी, पाटीलकी, मास्तरकी, टवाळकी
- ई – लाकडी, आकाशी, गुलाबी, पैठणी, बेगडी, सरकारी, आभारी, लाचारी, आभारी, शहरी, लोखंडी, झाडी
- इक – रसिक, आर्थिक, धार्मिक, मानसिक, सांस्कृतिक, सामाजिक, नागरिक, पारंपरिक
- मय – आनंदमय, जलमय, करुणामय, सुखमय, दुःखमय, मंगलमय, वासनामय, वेदनामय, तेजोमय, आभासमय
- दार – जबाबदार, दुकानदार, घरदार, ऐटदार, मालदार, फौजदार, ईमानदार, पाणीदार, चवदार, राखणदार, दमदार
- करी – शाळकरी, माळकरी, शेतकरी, वारकरी, गावकरी, पहारेकरी

- पणा – शहाणपणा, मूर्खपणा, कमीपणा, परकेपणा, आगाऊपणा, धीटपणा, एकटेपणा, दिखाऊपणा, मीपणा
- आड – खादाड, नासाड, बिघाड, ओसाड, थोराड
- वाला – भाजीवाला, टांगेवाला, झाडूवाला, बाटलीवाला, घोडेवाला
- वान – वेगवान, बलवान, गुणवान, सत्यवान, दयावान, नशीबवान, हिंमतवान, कर्तृत्ववान, शीलवान, बागवान
- वंत – गुणवंत, जातिवंत, विचारवंत, बलवंत, रसवंत
- गिरी – दादागिरी, भाईगिरी, ताईगिरी, आगाऊगिरी, कामगिरी, गुलामगिरी
- खोर – हेकेखोर, भांडखोर, दरोडेखोर, बंडखोर, लाचखोर, हरामखोर, चिडखोर
- दान – रक्तदान, नेत्रदान, देहदान, अवयवदान, कन्यादान, पुत्रदान
- य – चातुर्य, सौंदर्य, माधुर्य, गांभीर्य
- वा – गारवा, ओलावा, गोडवा, कडवा
- गा – पोरगा, तोडगा, मुलगा, खळगा, पानगा
- डा – मुखडा, म्हातारडा, भिकारडा, थेरडा
- डी – पोतडी, म्हातारडी, भिकारडी, थेरडी
- डे – टोपडे, अंगडे
- चट – खुळचट, बुळचट, खवचट, पानचट
- टी – चोरटी, एकटी, थापटी, खोपटी, दुकटी
- दा – कितीदा, यशदा, खूपदा, पुष्कळदा, बरेचदा, एकदा, दोनदा, अनेकदा, सर्वदा
- बंद – चिरेबंद, नजरबंद, ताळेबंद, बाजूबंद
- गर – सौदागर, बाजीगर, जादूगर
- गार – थंडगार, कामगार, जादूगार, हिरवेगार
- शार – निळेशार, काळेशार
- ऊक – चिंधूक, किडूक, अंधूक, भावूक
- ऊस – तांबूस, आजूस, बापूस, आंबूस
- शाही – लोकशाही, हुकुमशाही, राजेशाही, नोकरशाही, गुलामशाही, मुघलशाही, नवरेशाही
- नामा – जाहीरनामा, पंचनामा, सरकारनामा, करारनामा, राजीनामा
- खाना – दवाखाना, कैदखाना, जिमखाना, कत्तलखाना
- बाज – नखरेबाज, धडाकेबाज, ठसकेबाज, चालबाज, नशाबाज

## २) कृत प्रत्यय -



कृत प्रत्यय लागून तयार होणाऱ्या प्रत्ययघटित शब्दांना 'कृदन्ते' असे म्हणतात. यालाच 'धातुसाधिते' असेही म्हणतात. या प्रकारात मूळ शब्द हा धातू असतो आणि त्याला पुढे प्रत्यय लागून धातुसाधित शब्द अथवा कृदन्ते तयार होतात.

- उदा.

(धातू + प्रत्यय = कृदन्ते/ धातुसाधिते)

i) पड + का = पडका

ii) फसव + णूक = फसवणूक

- **कृदन्ते / धातुसाधिते -**

- आ – भरणा, हिसका, निवाडा, वाचा, वेडा, झगडा, झोपा, नाचा, ठेवा, मारा, धावा, जावा, झोपा, लिहा, शोधा
- ई – चोरी, उकळी, कात्री, शिटी, बोली, खेळी, रूची
- ऊ – चढू, खेळू, नाचू, उतरू, गाऊ, झोपू, खाऊ, पाहू, झाडू, बोलू, करू
- आई – चढाई, लढाई, कमाई, खोदाई
- आऊ – लढाऊ, जळाऊ, शिकाऊ, टाकाऊ
- आट – गडगडाट, भरभराट, झगमगाट, चमचमाट
- आळू – विसराळू, झोपाळू
- णारा – गाणारा, करणारा, जाणारा, खाणारा, बोलणारा, देणारा
- णार - करणार, खाणार, खेळणार, देणार
- णूक - फसवणूक करमणूक, निवडणूक, अडवणूक, गुंतवणूक, मिरवणूक
- ण – वळण, दळण, जेवण, झाकण, सारवण, पाठवण, आठवण, राखण, साठवण
- णा – देखणा, भरणा, पाळणा
- णे – वाचणे, लिहिणे, करणे, बोलणे, मारणे, बसणे, खाणे, पिणे, नाचणे
- ऊन – देऊन, गाऊन, जाऊन, पिऊन
- क – निवडक, मापक, वेचक, वाचक, जाचक, बाधक
- का – मळका, कुजका, फाटका, जळका, फुटका, मारका, रडका, चिडका
- ट – घाबरट, पुसट, पसरट, सुकट
- प – वाटप, झोडप, वाढप
- ळ – विरळ, ठोकळ
- ती – भरती, गळती, बढती, पावती, बोलती, हलती, भटकंती
- या – लाव्या, जोड्या, उधळ्या, फसव्या, हसव्या
- रा – हसरा, लाजरा, चावरा, धावरा, नाचरा
- री – हसरी, चावरी, नाचरी, लाजरी

*** अनेकदा प्रत्ययघटित शब्दामध्ये मूळ शब्दाचे जात्यंतर झालेले दिसते.**

*** तध्दित जात्यंतर -**

१) नामाला प्रत्यय लागून धातू तयार होतो.

- उदा.

i) थोबाड + णे = थोबाडणे

ii) फूल + णे = फुलणे

२) विशेषणापासून धातू तयार होतात.

- उदा.

i) गढूळ + णे = गढूळणे

ii) लांब + णे = लांबणे

३) विशेषणापासून नामे तयार होतात.

- उदा.

i) चिकट + आ = चिकटा

ii) ताठ + आ = ताठा

४) काही नामांना 'ई' प्रत्यय लागून ते काम करणारा या अर्थाची दुसरी पदे तयार होताना दिसतात.

- उदा.

i) स्वयंपाक + ई = स्वयंपाकी

ii) आचार + ई = आचारी

- **धातूंचेही जात्यंतर होऊन नाम, विशेषण, क्रियाविशेषणे तयार होतात.**

१) धातूंना ‘आ’ प्रत्यय लागून नामे तयार होतात.

- उदा.

i) झगड + आ = झगडा

ii) निवड + आ = निवडा

iii) वेड + आ = वेडा

२) धातूंना 'आई' प्रत्यय लागून स्त्रीलिंगी नामे तयार होतात.

- उदा.

i) लढ + आई = लढाई

ii) खोद + आई = खोदाई

iii) चढ + आई = चढाई

३) धातूंना 'आऊ' प्रत्यय लागून नामे तयार होतात.

- उदा.

i) लढ + आऊ = लढाऊ

ii) टाक + आऊ = टाकाऊ

iii) जळ + आऊ = जळाऊ

४) धातूंना 'आरी' प्रत्यय लागून कर्तृवाचक नामे तयार होतात.

- उदा.

i) पिंज + आरी = पिंजारी

ii) पूज + आरी = पूजारी

५) द्विरूक्त धातूंना 'आट' प्रत्यय लागून भाववाचक नामे तयार होतात.

- उदा.

i) गडगडणे + आट = गडगडाट

ii) लखलखणे + आट = लखलखाट

**३.५.३ सामासिक शब्द :**

एका शब्दामध्ये दुसरा शब्द मिळून नवीन साधित शब्द तयार होतो, त्या शब्दाला 'सामासिक शब्द' म्हणतात. समास हा साधित शब्दांचा एक प्रकार आहे. विचार थोडक्यात व्यक्त करणे हे समासाचे प्रयोजन असते.

दोन किंवा अधिक शब्दांचा जो एकत्र शब्द तयार होतो, त्या शब्दास 'सामासिक शब्द' किंवा 'समासघटित शब्द' असे म्हणतात. या दोन किंवा अधिक शब्दांचा परस्परसंबंध दाखवणारे शब्द किंवा प्रत्यय लोप पावलेले असतात.

- उदा. गण + ईश = गणेश (गणांचा ईश)

'गणेश' हा सामासिक शब्द. गणेश म्हणजे गणांचा ईश. यात 'गणांचा ईश'मधील 'चा' प्रत्ययाचा लोप होऊन ‘गणेश’ हा सामासिक शब्द तयार झाला आहे.

- **व्याख्या -**

दोन किंवा अधिक शब्दांचा परस्पसंबंध दाखविणारे शब्द वा प्रत्यय यांचा लोप करून त्या दोन शब्दांचा एकत्र संयोग करून जो एक स्वतंत्र शब्द तयार होतो, त्याला ‘समास’ किंवा 'सामासिक शब्द' असे म्हटले जाते.

- **समासाचे प्रकार -**

समासाचे चार प्रकार पडतात.

१) अव्ययीभाव समास

२) तत्पुरूष समास

३) द्वंद्व समास

४) बहुव्रिही समास

**१) अव्ययीभाव समास -**

ज्यामध्ये पहिले पद प्रधान असते व संपूर्ण समास हे क्रियाविशेषण अव्यय म्हणून येते त्याला 'अव्ययीभाव समास' असे म्हणतात. पहिल्या पदामुळे समासाचा अर्थ अधिक स्पष्ट होतो.

- उदा.
- घरोघर (प्रत्येक घरी)
- दिवसेंदिवस (प्रत्येक दिवशी)
- दररोज (प्रत्येक दिवशी)
- दारोदार (प्रत्येक दारी)
- गावोगाव (प्रत्येक गावी)
- आजन्म – (जन्मभर)
- आमरण (मरण येईपर्यंत)
- आकंठ (कंठापर्यंत)

- प्रतिवर्ष (प्रत्येक वर्षी)
- गल्लोगल्ली (प्रत्येक गल्लीत)
- जागोजागी (प्रत्येक जागी)
- प्रतिदिन (प्रत्येक दिवशी)

**२) तत्पुरूष समास -**

ज्या समासामध्ये दुसरे पद प्रधान असते त्याला 'तत्पुरूष समास' असे म्हणतात. पहिला शब्द नाम किंवा विशेषण असते.

- उदा. राजवाडा, राजदरबार, रानडुक्कर, तोंडपाठ, घरकोंबडा, पुरणपोळी, त्रिभुवन इ.

- **तत्पुरूष समासाचे प्रकार -**

१) विभक्ती तत्पुरूष समास
२) उपपद तत्पुरूष समास
३) अलुक् तत्पुरूष समास
४) नञ तत्पुरूष समास
५) कर्मधारेय तत्पुरूष समास –
६) द्विगु तत्पुरूष समास
७) मध्यमपदलोपी तत्पुरूष समास

**i) विभक्ती तत्पुरूष समास –**

या समासाचा विग्रह करताना विभक्ती प्रत्यय प्रकट होतात म्हणून याला 'विभक्ती तत्पुरूष समास' म्हणतात. या समासाच्या विग्रहात प्रथमा व संबोधन सोडून सर्व विभक्ती प्रत्यय प्रकट होतात.

- उदा.
- राजवाडा (राजाचा वाडा)
- ईश्वरदत्त (ईश्वराने दिलेले)
- भाषाशास्त्र (भाषेचे शास्त्र)
- विद्यालय (विद्येचे आलय)
- देवालय (देवाचे आलय)
- सूर्यप्रकाश (सूर्याचा प्रकाश)

- गंगाजल (गंगेचे जल)
- देवपूजा (देवाची पूजा)
- शास्त्रपंडित (शास्त्रात पंडित)

**ii) उपपद तत्पुरूष समास –**

उपपद तत्पुरूष समासामध्ये दुसरे पद प्रधान असते.

- उदा.

  * गृहस्थ (गृही स्थिर असलेला)
  * ग्रंथकार (ग्रंथ लिहिणारा)
  * शेतकरी (शेती करणारा)
  * लाकूडतोड्या (लाकूड तोडणारा)
  * खिसेकापू (खिसे कापणारा)
  * कामकरी (काम करणारा)
  * भाजीविक्या (भाजी विकणारा)

**iii) अलुक तत्पुरूष समास –**

संस्कृतमधील 'लुक्' या धातूचा अर्थ लोप पावणे आणि 'अलुक्' म्हणजे लोप न पावणे. म्हणजेच ज्या समासातील शब्द लोप पावत नाहीत त्या समासाला 'अलुक् तत्पुरुष समास' म्हणतात.

- उदा.
- अग्रेसर (अग्र + ए + सर)
- पंकेरूह (पंक + ए + रूह)
- युधिष्ठिर (युद्ध + ई + ष्ठिर)

**iv) नञ तत्पुरूष समास –**

या समासातील पद सामान्यतः नकारार्थी किंवा अभावदर्शक असते. तसेच द्वितीय पद महत्वाचे असते.

- उदा.
- असुंदर (सुंदर नसलेले)
- अन्याय (न्यायाचा अभाव)
- गैरहजर (हजर नसलेले)
- अपुरा (पुरा नसलेला)
- अनादर (आदराचा अभाव)
- अजाण (जाण नसलेला)
- असमंजस (समंजस नसलेला)
- अनोळखी (ओळख नसलेला)
- निर्लज्ज (लाज नसलेला)
- अज्ञानी (ज्ञान नसलेला)
- अशुद्ध (शुद्ध नसलेला)
- अज्ञात (ज्ञात नसलेला)
- अपरिपक्व (परिपक्व नसलेला)

**v) कर्मधारेय तत्पुरूष समास –**

यात निदान एक पद गुणविशेषण असते. कधीकधी दोन्ही पदे गुणविशेषण असतात.

- उदा.
- मंगलकार्य (मंगल असे कार्य)
- खडीसाखर (खडीसारखी साखर)
- नरसिंह (सिंहासारखा नर)
- तांबडमाती (तांबडी अशी माती)
- महादेव (महान असा देव)

- पुरुषोत्तम (उत्तम असा पुरुष)
- निळासावळा (निळा आणि सावळा असा)
- कमलमुख (कमळासारखे मुख)
- **vi) द्विगु तत्पुरूष –**
- द्विगु तत्पुरूष समासात एक पद संख्याविशेषण असते.
- उदा. चौकोन, त्रिकोण, अष्टकोन, त्रिभुवन, अष्टलोक, चतुर्वेद, नवरात्र, सप्तपदी, तिरंगा, पंचारती, दशमुख, सप्तरंग, अष्टभुजा, बारमाही, त्रिदल इ.
- **vii) मध्यमपदलोपी तत्पुरूष –**
- मध्यमपदलोपी तत्पुरूष समासाच्या विग्रहावेळी समासातील दोन शब्दांमधील गाळलेले शब्द प्रकट होतात.
- उदा.
- पुरणपोळी (पुरण घालून केलेली पोळी)
- गुलाबपाणी (गुलाबापासून तयार केलेले पाणी)
- कांदेपोहे (कांदे घालून केलेले पोहे)
- साखरभात (साखर घालून केलेला भात)
- **३) द्वंद्व समास :**
- ज्या समासामध्ये दोन्ही शब्द प्रधान असतात त्याला 'द्वंद्व समास' असे म्हणतात. या समासात दोन किंवा अधिक पदे सारखीच महत्त्वाची असतात.
- उदा. आईबाप, दूधभात, हातपाय, रामलक्ष्मण, विटीदांडू इ.
- **द्वंद्व समासाचे प्रकार -**
- **इतरेतर द्वंद्व**
- **वैकल्पिक द्वंद्व**
- **iii) समाहार द्वंद्व**

- **इतरेतर द्वंद्व –**
- इतरेतर द्वंद्व या समासाचा विग्रह करताना दोन पदांमध्ये ‘आणि', ‘व’ ही अव्यये येतात.
- उदा.
- आईबाप (आई आणि बाप)
- रामलक्ष्मण (राम आणि लक्ष्मण)
- विटीदांडू (विटी आणि दांडू)
- स्त्रीपुरुष (स्त्री आणि पुरुष)
- हातपाय (हात आणि पाय)
- भीमार्जुन (भीम आणि अर्जुन)

**ii) वैकल्पिक द्वंद्व –**

या समासाचा विग्रह करताना दोन पदांमध्ये ‘अथवा', 'किंवा' ही अव्यये वापरली जातात. त्यातून विकल्प सूचित होतो.

- उदा.
- पापपुण्य (पाप किंवा पुण्य)
- न्यायअन्याय (न्याय किंवा अन्याय)
- सत्यासत्य (सत्य किंवा असत्य)
- खरेखोटे (खरे किंवा खोटे)
- बरेवाईट (बरे किंवा वाईट)
- भलेबुरे (भले किंवा बुरे)

**iii) समाहार द्वंद्व –**

या समासात विग्रहावर काहीही अवलंबून नसते. समासातील पदांच्या अर्थाशिवय आणखी तशाच अर्थाचा अंतर्भाव त्यात असतो.

- उदा.
- मीठभाकर (मीठ, भाकर व साधे पदार्थ)
- भाजीपाला (भाजी, पाला व कोथिंबीर यासारख्या इतर वस्तू)
- शेतीवाडी (शेती, वाडी वगैरे)
- दानधर्म (दान, धर्म वगैरे)

**४) बहुव्रिही समास :**

ज्या समासात कोणतेही पद महत्वाचे नसते त्याला ‘बहुव्रिही समास’ असे म्हणतात. या समासात प्रत्यक्ष दिसणाऱ्या सामासिक शब्दापेक्षा वेगळाच अर्थ सूचित होतो.

- उदा. लंबोदर, जितेंद्रिय, नीलकंठ, चक्रपाणी इ.

*** बहुव्रिही समासाचे प्रकार -**

**i) विभक्ती बहुव्रिही समास**

**ii) सहबहुव्रिही समास**

**iii) नञबहुव्रिही समास**

**i) विभक्ती बहुव्रिही समास –**

ज्या समासाचा विग्रह करताना शेवटी एक संबंधी सर्वनाम येते त्या समासाला 'विभक्ती बहुव्रिही समास' असे म्हणतात.

- उदा.
- लंबोदर (लंब आहे ज्याचे उदर असा तो)
- नीलकंठ (निळा आहे ज्याचा कंठ असा तो)
- चक्रपाणी (चक्र आहे ज्याच्या हाती असा तो)
- दशानन (दहा आहेत ज्याला तोंडे असा तो)
- अष्टभुजा (आठ आहेत जिला भुजा अशी ती)
- प्राप्तधन (प्राप्त आहे ज्याला धन असा तो)

**ii) सहबहुव्रिही समास -**

ज्या समासाचे पहिले पद ‘सह' किंवा ‘स' अशी अव्यये असून हा सामासिक शब्द एखाद्या विशेषणाचे कार्य करतो, त्यास 'सहबहुव्रिही समास' म्हणतात.

- उदा.
- सानंद (आनंदाने सहित असा जो)
- सहपरिवार (परिवारासहित असा जो)
- सहकुटुंब (कुटुंबासहित असा जो)
- सप्रेम (प्रेमासहित असा जो)

**iii) नञबहुव्रिही समास -**

ज्या सामासाचे पहिले पद नकारदर्शक असते त्याला 'नञबहुव्रिही समास' असे म्हणतात.

- उदा.
- नीरस (नाही रस ज्यात ते)
- अनंत (नाही अंत ज्याला तो)
- अनाथ (ज्याला नाथ नाही असा तो)
- अपूर्ण (पूर्ण नाही असे ते)
- अकर्मक (नाही कर्म ज्याला ते)

दामलेंनी समासाचे वरील सर्व प्रकार सांगितले. कृ. श्री. अर्जुनवाडकर यांनी मात्र यावर आक्षेप घेतला. त्यांच्या मते, सामासिक शब्दांचा विचार करताना केवळ मराठीच्या संदर्भातच करावा. त्याबरोबर दोन शब्द एकत्र आलेले असताना त्याला आपण कधीच समास म्हणू शकत नाही. दामले यांनी समासाचे प्रकार सांगताना पहिले पद, दुसरे पद महत्त्वाचे असे सांगितले आहे. समासाचा विचार करताना पदांचा विचार लक्षात घेणे जरूरी आहे. हा निष्कर्ष कृ. श्री. अर्जुनवाडकर यांनी शब्दसिद्धी संदर्भात मांडला आहे.

**३.५.४ अभ्यस्त शब्द :**

जेव्हा शब्दांच्या आवृत्तीमधून एखादा शब्द सिद्ध होतो तेव्हा त्याला ‘अभ्यस्त शब्द' असे म्हणतात. अभ्यस्त शब्द हे एकप्रकारे नवे शब्दच असतात. अभ्यस्त शब्दांनाच 'पुनरुक्त शब्द' असेही म्हणतात. पुनरुक्ती म्हणजे पुन्हापुन्हा येणे. म्हणून एकच शब्द पुन्हापुन्हा येऊन तयार होणाऱ्या **शब्दांना ‘अभ्यस्त शब्द' म्हणतात.**

- **अभ्यस्त शब्दाचे प्रकार -**

१) **पूर्णाभ्यस्त शब्द**
२) **अंशाभ्यास्त शब्द**

३) **अनुकरणवाचक शब्द**

**i) पूर्णाभ्यस्त शब्द -**

जेव्हा शब्दाची जशीच्या तशी पुनरावृत्ती होऊन शब्द बनतो तेव्हा त्याला 'पूर्णाभ्यस्त शब्द' असे म्हणतात.

- उदा. लाललाल, समोरासमोर, पुढेपुढे, वटवट, मधूनमधून, घरघर, पैसापैसा, कळकळ, मळमळ, हळूहळू, झोपताझोपता इ.

**ii) अंशाभ्यस्त शब्द -**

ज्या शब्दांमध्ये शब्दाची पूर्णपणे आवृत्ती न होता शब्दाच्या काही भागाची वा शब्दातील काही अक्षरांची आवृत्ती होते, त्याला 'अंशाभ्यस्त शब्द' म्हणतात.

- उदा. शेजारीपाजारी, बारीकसारीक, पुस्तकबिस्तक, दगडबिगड, कापडचोपड, झाडबिड, जिकडेतिकडे, उलटसुलट, सोक्षमोक्ष, किडूकमिडूक इ.

**iii) अनुकरणवाचक शब्द -**

जेव्हा ध्वनिवाचक शब्दांची पुनरावृत्ती होऊन शब्द बनतो तेव्हा त्याला 'अनुकरणवाचक शब्द' म्हणतात.

- उदा. खळखळखळखळ, किरकिर, गुणगुण, फसफस, टिकटिक, झुळझुळ, लखलखाट, गडगडाट, टपटप, कडकडाट इ.

अभ्यस्त शब्दांच्या प्रकारामध्ये शब्दांची पुनरावृत्ती कोणकोणत्या अर्थी होते हे सांगितले आहे. तसेच सामासिक शब्दांचे उपप्रकार करतानाही त्यांचा अर्थ लक्षात घेण्याची प्रवृत्ती दिसते. त्यामुळे या उपप्रकारांना व्याकरणिकदृष्ट्या महत्त्व नाही. व्याकरणाच्या दृष्टीने शब्दांची घडण कशी होते एवढेच महत्त्वाचे असते.

## ३.६ समारोप

अशाप्रकारे वरील विवेचनावरून मराठीतील शब्दसिद्धी विचार स्पष्ट होतो. भाषा ही नियमबद्ध असते, तसेच ती सर्जनशील असते. काटकसर आणि मितव्ययता हे भाषेचे विशेष सांगितले जातात. एकापुढे एक वर्ण येऊन रुढीने वा संकेताने शब्द तयार होतो व त्यातून एका शब्दापासून त्याला उपसर्ग, प्रत्यय वा अन्य शब्द लागून अनेक शब्द तयार होतात याला ‘शब्दसिद्धी' असे म्हणतात. मराठीत उपसर्गघटित, प्रत्ययघटित, सामासिक, अभ्यस्त या चार प्रकारांनी शब्दसिद्धी होते.

एकंदर या अभ्यासघटकामध्ये आपण शब्द व प्रत्यय संकल्पना, सिद्ध शब्द संकल्पना व प्रकार, साधित शब्द संकल्पना व प्रकार; तसेच उपसर्गघटित शब्द, प्रत्ययघटित शब्द, सामासिक शब्द, अभ्यस्त शब्द या संकल्पनांचा आणि त्यांच्या प्रकारांचा सर्वांगाने विचार केला.

## ३.७ स्वाध्याय

- **दीर्घोत्तरी प्रश्न**

१) शब्दसिद्धीचे प्रत्यय मांडून मराठीतील शब्दसिद्धीचा सविस्तर आढावा घ्या.

२) शब्दसिद्धी म्हणजे काय ते सांगून सिद्ध शब्द आणि साधित शब्द यांचे सोदाहरण विवेचन करा.

- **एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) शब्दसिद्धी म्हणजे काय?

२) चरम प्रत्यय म्हणजे काय?

३) सामासिक शब्द म्हणजे काय?

४) अभ्यस्त शब्द म्हणजे काय?

५) अभ्यस्त शब्दांचे एकूण किती प्रकार पडतात?

६) बहुव्रिही समास म्हणजे काय?

७) उपसर्गघटित शब्द म्हणजे काय?

८) द्वंद्व समासाचे एकूण किती प्रकार पडतात?

९) समासाचे किती प्रकार पडतात?

१०) अनुकरणवाचक शब्द म्हणजे काय?

११) सिद्ध शब्द म्हणजे काय?

१२) साधित शब्द म्हणजे काय?

१३) शब्दसिद्धीच्या प्रत्ययांचे कोणतेही एक लक्षण लिहा.

१४) शब्द म्हणजे काय?

१५) पद म्हणजे काय?

- **टीपा**

१) शब्द व प्रत्यय संकल्पना

२) प्रत्ययघटित शब्द

३) उपसर्गघटित शब्द,

४) सामासिक शब्द

५) अभ्यस्त शब्द

६) सिद्ध शब्द

## ३.८ संदर्भग्रंथ :


- दामले मो. के., शास्त्रीय मराठी व्याकरण, तिसरी आवृत्ती, पुणे, १९६५.
- अर्जुनवाडकर कृ. श्री., मराठी व्याकरण वाद आणि प्रवाद, सुलेखा प्रकाशन, पुणे, १९८७.
- अर्जुनवाडकर कृ. श्री., मराठी व्याकरणाचा इतिहास, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ, १९९२.
- आचार्य मा. ना., मराठी व्याकरणविवेक, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २००१.
- मंगरूळकर अरविंद, मराठी व्याकरणाचा पुनर्विचार, पुणे विद्यापीठ, १९६४.
- गुंजीकर रा. भि., मराठी व्याकरणावर विचार, रा. भि. गुंजीकर यांचे संकलित लेख. खंड १.
- दीक्षित प्र. ना., मराठी व्याकरण : काही समस्या, शुभदा प्रकाशन, फलटण, १९७५
- गोविलकर लीला, मराठीचे व्याकरण, मेहता पब्लिशिंग, पुण, १९९३.


❖❖❖❖

# ४

## प्रयोग विचार

**घटक रचना :**

४.१ उद्दिष्टे

४.२ प्रस्तावना

४.३ प्रयोग व्याख्या

४.४ कर्ता, कर्म, पूरक, क्रियापद संकल्पना

४.५ दामलेकृत प्रयोगव्यवस्था

४.५.१ कर्तरी प्रयोग

४.५.२ कर्मणी प्रयोग

४.५.३ भावे प्रयोग

४.५.४ संकीर्ण प्रयोग/ संकर प्रयोग

४.६ दामल्यांच्या प्रयोगव्यवस्थेची वैशिष्ट्ये

४.७ दामल्यांच्या प्रयोगव्यवस्थेतील विवाद्य मुद्दे

४.८ समारोप

४.९ स्वाध्याय

४.१० संदर्भग्रंथ

## ४.१ उद्दिष्टे

१) दामलेकृत प्रयोगव्यवस्थेचा सविस्तर आढावा घेणे.

२) कर्ता, कर्म, पूरक, क्रियापद या संकल्पनांचा परिचय करून देणे.

३) कर्तरीप्रयोगम्हणजे काय ते समजून घेऊन त्याचे प्रकार अभ्यासणे.

४) कर्मणीप्रयोगाची व्याख्या व प्रकार सविस्तरपणे स्पष्ट करणे.

५) भावे प्रयोग हीसंकल्पना स्पष्ट करून त्याचे प्रकार अभ्यासणे.

६) संकीर्ण/ संकरप्रयोगाची व्याख्या व प्रकार समजून घेणे.

७) दामल्यांच्या प्रयोगव्यवस्थेची वैशिष्ट्ये मांडणे.

८) दामल्यांच्या प्रयोगव्यवस्थेतील विवाद्य मुद्दे स्पष्ट करणे.

## ४.२ प्रस्तावना

या अभ्यासघटकामध्ये आपण 'प्रयोगविचार' हा घटक अभ्यासणार आहोत. 'प्रयोगविचार' या घटकांतर्गत कर्ता, कर्म, पूरक, क्रियापद या संकल्पनांचा परिचय करून घेणार आहोत. तसेच दामलेकृत प्रयोगव्यवस्थेची चिकित्साकरणार आहोत,त्याबरोबरच दामल्यांच्या प्रयोगव्यवस्थेची वैशिष्ट्ये आणिविवाद्य मुद्दे यांचा सविस्तरपणे आढावा घेणार आहोत.

पारंपरिक व्याकरणातील 'प्रयोगविचार' हा वाक्यविचाराचा वा पदान्वयविचाराचाच एक प्रकार आहे. रचनेच्या पातळीवर भाषा वाक्यात्मक असते. वाक्य ही भाषेतील सर्वात सर्वात मोठी रचना असते. या रचनेचा विचार म्हणजे 'वाक्यविचार' होय. वाक्यविचार म्हणजे हा पदान्वयविचारच असतो. शब्दांना संबंधदर्शक आणि कालार्थदर्शक प्रत्यय लागून म्हणजेच विभक्ती प्रत्यय आणि आख्यातप्रत्यय लागून त्यांची वाक्योपयोगी पदे तयार होतात. आणि अशा पदांच्या संबंधांतून वा अन्वयातून वाक्य तयार होतात. वाक्यगत पदांच्या परस्परांतील असलेल्या नात्याचा शोध म्हणजेच वाक्यविचारवा पदान्वयविचार होय.

प्रयोगविचार हा वाक्यविचाराचा एक प्रकार असल्याचे आपण पाहिले. आता प्रयोग म्हणजे नेमके काय ते पाहू. व्याकरणातील रुपलक्ष्यी पदान्वयविचार म्हणजे प्रयोग होय. प्रयोग ही रुपनिष्ठ संकल्पना आहे. कर्ता, कर्म, क्रियापद या प्रयोगविचारातील महत्वाच्या संकल्पना आहेत. 'प्रयोग' हा शब्द संस्कृत (प्र + युज = योग) आहे. वाक्यातील क्रियापदाचे वाक्यातील कर्त्याशी अथवा कर्माशी असलेले रूपसाधर्म्य म्हणजे 'प्रयोग' होय किंवा वाक्यातील क्रियापदाचा त्याच्या कर्त्याशी किंवा कर्माशी पुरुष, लिंग, वचन याबाबत जो अन्वय असतोत्यास 'प्रयोग' असे म्हणतात.

मराठी व्याकरणात दामल्यांनी लावलेली प्रयोगव्यवस्था प्रमाण म्हणून स्वीकारण्याचा अनेकांचा कल आहे. प्रयोगांची लक्षणे, त्यांचे उपप्रकार, महत्त्वाच्या संकल्पना यांची सोदाहरण व व्यापक मांडणी मराठी व्याकरणात पहिल्यांदा दामल्यांनी केली. त्यांनी मराठीची सर्वसमावेशक अशी प्रयोगव्यवस्था लावली. त्यानंतर बहुतेक वैयाकरणांनी दामल्यांची प्रयोगव्यवस्था आधारभूत मानून प्रयोग चिकित्सा केली.

## ४.३ प्रयोग व्याख्या

**१) मो. के. दामले –**

वाक्यातील क्रियापदाचा त्याच्या कर्त्याशी किंवा कर्माशी लिंग, वचन, पुरुष याबाबत जो अन्वय असतो त्यास 'प्रयोग' असे म्हणतात.

**२) कृ. य. गोडबोले –**

'प्र' म्हणजे निकट आणि 'योग' म्हणजे संबंध यावरून कर्ता, कर्म, क्रियापद यांचा जो परस्परनिकट संबंध, त्यास प्रयोग म्हणतात.

**३) मा. ना. आचार्य –**

कर्ता, कर्म, क्रियापद यांच्या अन्वयसंबंधांचे विधान म्हणजे प्रयोग होय.

थोडक्यात वाक्यात क्रियापद महत्त्वाचे असते. क्रियापदाला केंद्र मानून ते रुपदृष्ट्या कर्ता वा कर्म यापैकी कोणाला अनुसरते यासंबंधीचे विधान म्हणजे प्रयोग होय. प्रयोग ही रूपनिष्ठ संकल्पना आहे. वाक्याच्या अर्थापेक्षा कर्ता, कर्म, क्रियापद यांच्या रूपाला प्रयोग संकल्पनेत महत्त्व असते.

## ४.४ कर्ता, कर्म, पूरक, क्रियापद संकल्पना

**१) कर्ता -**

व्याकरणात 'कर्ता' ही संज्ञा अनेक अर्थाने वापरली जाते. क्रिया करणारा म्हणजे कर्ता अथवा वाक्यातील क्रियेचा आश्रय म्हणजे कर्ता.कर्ता म्हणजे वाक्यातील उद्देश्य पद, कर्ता म्हणजे क्रियापदाच्या रूपावर अधिकार चालविणारा. असे विविध अर्थ 'कर्ता' या संज्ञेचे सांगितले जातात.

सर्वसाधारणपणे ‘वाक्यातील क्रिया करणारा तो कर्ता' असे मानले जाते.

- उदा.

**i) <u>विकास</u> सफरचंद खातो.**

या वाक्यात 'खातो' हे क्रियापद आहे. कोण खातो? असा प्रश्न विचारल्यानंतर जे उत्तर येते, ते उत्तर त्या वाक्यातील ‘कर्ता’ असते. येथे खाण्याची क्रिया करणारा विकास आहे. म्हणून ‘विकास’ हा या वाक्यातील कर्ता होय.

**ii) <u>मुकुंद</u> नाच करतो.**

या वाक्यात 'करतो' हे क्रियापद आहे. कोण करतो? असा प्रश्न विचारल्यानंतर जे उत्तर येते, ते उत्तर त्या वाक्यातील ‘कर्ता’ असते. येथे नाचण्याची क्रिया करणारा मुकुंद आहे. म्हणून ‘मुकुंद’ हा या वाक्यातील कर्ता होय.

येथे आपल्या लक्षात येते की 'कर्ता' या शब्दाचा व्यवहारातील अर्थ आणि व्याकरणिक अर्थ भिन्न भिन्न आहे. क्रियेचा आश्रय म्हणजे कर्ता.

*** व्याख्या :**

- **दामले –**

“कर्ता म्हणजे क्रिया करणारा किंवा वाक्यातील क्रियाघडवून आणणारा जो, तो त्या क्रियेचा कर्ता होय.”

**अथवा**

”क्रियापदातील धातूस 'णारा', 'णारी', असे प्रत्यय लावून 'णारे' तयार होणारे कृदन्त ज्यास लागू पडेल तो कर्ता होय.”

- **अर्जुनवाडकर –**

“प्रथम ताख्यातातील क्रियापद ज्याला अनुसरते त्याला वाक्यातील कर्ता मानावे. म्हणजेच वाक्यातील क्रियापद ज्याच्या लिंग, वचन, पुरुषाप्रमाणे बदलते त्याला वाक्यातील कर्ता म्हणतात.”

जर वाक्यातील क्रियापद अन्य आख्यातात असेल तर ते प्रथम ताख्यातात बदलून घ्यावे.

- उदा.i) <u>विकास</u> घरी जाईल.

**ii) <u>विकास</u> घरी जातो.**

दुसऱ्या वाक्यातील 'जातो' हे प्रथम ताख्यातातील क्रियापद 'विकास' या पदाच्या लिंगवचनानुसार बदलते म्हणून 'विकास' हा वरील वाक्यातील कर्ता होय.

**i) <u>विकास</u> घरी जातो.**

**ii) <u>कविता</u> घरी जाते.**

कधी कधी वाक्यात दोन कर्तेअसतात. एक प्रत्यक्ष व दुसरा अप्रत्यक्ष. प्रत्यक्ष कर्ता हा त्या वाक्यातील क्रियेला प्रत्यक्षपणे जबाबदार असतो आणि जेव्हा कर्ता प्रत्यक्षपणे क्रियेला जबाबदार नसतो त्यावेळी त्याला अप्रत्यक्ष कर्ता म्हणतात.

- उदा.

i) तिला दूध आवडते.

ii) त्याला सरबत आवडते.

वाक्यात नेहमी कर्ता असतोच असे नाही.

- उदा.i) मळमळते

  ii) कामकरवते.

  iii) अंगात येते.

  iv) सांजावते.

वरील वाक्यांमध्ये क्रिया घडल्या आहेत, परंतु त्या क्रियेला कर्ता नाही हे लक्षात येते.

अशाप्रकारे वाक्यातील कर्ता कसा ओळखावा? वाक्यातील कर्ता कसा शोधून काढावा यासाठी व्याकरणकारांनी सुचविलेल्याया काही कसोट्या आहेत.त्या त्या वाक्यानुसार योग्य तेव्हा योग्य ती कसोटी लागू केली जाते.

## २) कर्म –

'कर्म' ही प्रयोगविचारातील एक महत्वाची संकल्पना आहे. कर्म हे एक प्रमुख कारक आहे. दामले आणि अर्जुनवाडकर यांनी कर्म संकल्पना स्पष्ट केली आहे. त्यांच्या व्याख्या पुढीलप्रमाणे –

- **दामले -**

"धातूने दाखवली जाणारी क्रिया कर्त्यापासून निघते व ज्या दुसऱ्यावर किंवा कशावर तिचा परिणाम घडतो वा निदान ज्याकडे तिचा रोख वा कल असतो, त्यास त्या क्रियेचे कर्म म्हणतात."

* उदा. 'रामाने <u>रावणास</u> मारले'

दामले यांची ही व्याख्या त्यांच्या कर्ता, क्रियापद या व्याख्येप्रमाणेच अर्थाधिष्ठीत असून कर्म या संकल्पनेचे तार्किक स्पष्टीकरण करणारी आहे.

- **अर्जुनवाडकर -**

"जे प्रथमांत असल्यास 'ला' प्रत्ययांताने व 'ला' प्रत्ययांत असल्यास प्रथमांताने वाक्याच्या सामान्य नियमानुसार प्रतिष्ठापनीय असते ते कर्म."

उदा.

* रामाने <u>रावणाला</u> मारले.

रामाने <u>रावण</u> मारला

* मी <u>चित्र</u> पाहतो.
मी <u>चित्रास</u> पाहतो.

अशाप्रकारे अर्जुनवाडकर यांनी रूपतत्त्वाच्या आधारे कर्म ओळखण्याची खूण सांगितली आहे.

थोडक्यात वाक्यातील क्रिया कर्त्यापासून निघून ज्याकडे तिचा कल असतो तिला कर्म मानले जाते.

* उदा.

i) 'विकासने <u>किरणला</u> मारले'

या वाक्यात 'मारले' हे क्रियापद सकर्मक असून त्याचे 'किरणला' हे कर्म आहे. कारण मारण्याची क्रिया 'विकास' या कर्त्यापासून निघून तिचा परिणाम किरण यावर घडला आहे.

ii) 'ती <u>नाटक</u> पाहते'

या वाक्यात पाहण्याची क्रिया 'ती' या कर्त्यापासून निघाली असून तिचा रोख नाटकाकडे आहे. त्यामुळे 'नाटक' हे कर्म आहे.

वाक्यात नेहमीच कर्म असते असे नाही.

- उदा. i)पेरू पडला.
  ii) नदी वाहते.
  iii) तो बसतो.
  iv) ती बसली
  v) मी खाल्ले.

अशाप्रकारे वरील वाक्यांमध्येकर्म नाही.

**३) पूरक –**

'पूरक' ही संकल्पना प्रयोगविचारात जरी महत्वाची नसली तरी कर्ता, कर्म यांच्या जोडीने ती वाक्याच्या संदर्भात मांडली जाते.पूरक ही संकल्पना रूढ मराठी व्याकरणामध्ये कॉम्प्लिमेंटच्या (complement) धर्तीवर स्पष्ट करता येते.

दामले यांच्या मते, काही अकर्मक धातू असे आहेत की कर्ता आणि क्रियापद या दोनच शब्दांनी त्यांच्यासंबंधीचे होणारे विधान पूर्ण होत नाही, तर विधान पूर्ण होण्यासाठी आणखी निदान एका शब्दाची तरी अपेक्षा असते, अशा शब्दाला 'विधानपूरक शब्द' किंवा 'पूरक' असे म्हणतात.

- उदा.

i) 'ती राणी झाली'

ii) 'पेरू चांगला निघाला'

पहिल्या वाक्यात 'राणी' या शब्दाशिवाय विधान पूर्ण होत नाही. म्हणून 'राणी' हा पूरक शब्द आहे. तरदुसऱ्या वाक्यात 'चांगला' या शब्दाशिवाय विधान पूर्ण होत नाही. म्हणून 'चांगला' हा पूरक शब्द आहे.

सकर्मक धातूंसंबंधी विधान कर्माशिवाय पूर्ण होत नाही, म्हणून कर्मासही पूरक असे म्हटले जाते.

- उदा.
  i) तिने पेरू पाडला.
  ii) त्याने भिंत पाडली.
  iii) तिने झाड तोडले.
  iv) त्याने आंबा पाडला.
  v) तिने चिंच तोडली.

वरील वाक्यांमध्ये अनुक्रमे पेरू, भिंत, झाड, आंबा, चिंच ही पदे कर्म आहेत. ती जर वाक्यात नसतील तर वाक्याचा अर्थ पूर्ण होणार नाही, म्हणून त्यांना पूरक असे म्हटले जाते

कर्माला पूरक मानण्याच्या दामल्यांच्या मताशी अर्जुनवाडकर यांनी असहमती दर्शवलीआहे. कारण या पद्धतीने विचार केला तर कर्तासुद्धा पूरक होईल.

* उदा. 'तो निघाला'

यामधील 'तो' हा पूरक ठरू शकतो. त्यामुळे अर्जुनवाडकरांनी पूरक ही संकल्पना सुधारून घेतली आहे. त्यांच्या मते, पूरक हा शब्द नाम किंवा विशेषण असतो आणि तो कर्त्याला किंवा कर्माला विशेष करतो.

* उदा.

i)चंद्रगुप्त राजा झाला.

यामध्ये चंद्रगुप्त हा कर्ता असून राजा हे त्याचे पूरक आहे.

ii) चाणक्याने चंद्रगुप्ताला राजाकेले.

या वाक्यात चंद्रगुप्त या कर्माचे राजा हे पूरक आहे.

अशाप्रकारे पूरक हे गरजेप्रमाणे सकर्मक किंवा अकर्मक धातूचे सहचर असते. दामल्यांच्या विवेचनातील अन्य कमतरता, उणीव अर्जुनवाडकरांनी पूर्ण केली.

**४) क्रियापद –**

क्रियापद म्हणजे वाक्यातील असा विकारी शब्द ज्याच्यामुळे वाक्य पूर्ण होते आणि क्रियेच्या आख्याताचाही (काळाचा) बोध होतो.धातूंना आख्यात प्रत्यय लागून क्रियापद बनते.इंग्रजीतVerb हा शब्द क्रियापद व धातू या दोन्ही अर्थांनीवापरला जातो.मराठी व्याकरणात क्रियापद या नावानेच धातूचा उल्लेख केला जातो.

धातूला काही विकार होऊन क्रियापदाचे रूप बनते. क्रियापदाच्या रूपातून लिंग, वचन, पुरुष यांचाही बोध होतो. प्रयोगविचारात क्रियापदांच्या या लिंग, वचन, पुरुष या धर्मांना केंद्रस्थानी ठेवून त्याचे कर्ता किंवा कर्म यांच्याशी असलेले संबंध तपासले जातात. त्यावरून प्रयोगाचा प्रकार ठरतो.

- उदा.

i) 'सूर्य पूर्वेला उगवतो'
यावाक्यात हे क्रियापद 'उगवतो'आहे. या वाक्यात क्रियापद कर्त्याला अनुसरूनयेते.म्हणजे कर्त्याचे लिंग, वचन, पुरुष यामध्ये बदल केल्यास क्रियापदाचेही रूप बदलेल. कर्त्याचे रूप स्त्रीलिंगी केले तर क्रियापदाचे रूप 'उगवते' होईल. म्हणजेच या वाक्यात क्रियापद कर्तृगामी आहे.

ii)'तिने पुस्तक वाचले'
या वाक्यातक्रियापद कर्माला अनुसरणारे आहे. म्हणजेच ते कर्माच्या लिंग, पुरुष, वचनाप्रमाणे बदलते. या वाक्यात कर्ता बदलला तरी क्रियापद बदलत नाही. मात्र कर्माचे लिंग, वचन बदलले तर क्रियापदाच्या रुपात बदल होतो.

*** व्याख्या :**

- **कृष्णशास्त्री चिपळूणकर –**

"ज्या शब्दांपासून कालगत क्रियेचा बोध होतो त्या शब्दास क्रियापद म्हणतात.क्रियापदाचे मूलभूत जे शब्द म्हणजे ज्या शब्दांस प्रत्यय लागून क्रियापदे होतात त्या मूलभूत शब्दांस धातू म्हणतात."

- **रा.भि. जोशी–**

"ज्या शब्दाच्या योगाने पदार्थाचे असणे किंवा करणे या गोष्टीचा ( म्हणजे क्रियेचा ) काळाच्या संबंधाने पूर्ण बोध होतो, त्यास क्रियापद असे म्हणतात."

*** पुढील वाक्यांमधील क्रियापदे पाहू -**

i) त्याने पुस्तक दिले.

या वाक्यात 'दिले' हे क्रियापद आहे.

ii) त्यानेस्वयंपाक बनवला.

या वाक्यात 'बनवला' हे क्रियापद आहे.

iii) तिने अभ्यास केला.

या वाक्यात 'केला' हे क्रियापद आहे .

iv) रामाने रावणास मारले.

या वाक्यात 'मारले' हे क्रियापद आहे.

v) विकास सफरचंद खातो.

या वाक्यात 'खातोहे क्रियापद आहे '.

प्रयोगविचारात क्रियापदांच्या या लिंग, वचन, पुरुष यांना केंद्रस्थानी ठेवून त्याचे कर्ता किंवा कर्म यांच्याशी संबंध तपासले जातात, त्यावरून प्रयोगाचा प्रकार ठरतो.

## ४.५ दामलेकृत प्रयोग व्यवस्था

मराठी व्याकरणात दामल्यांनी लावलेली प्रयोगव्यवस्था प्रमाण म्हणून स्वीकारण्याचा अनेकांचा कल आहे. दामल्यांनी सांगितलेल्या उपप्रकारांबाबत मतभेद आढळले तरी प्रयोगविचारातील त्यांचे योगदान निर्विवादपणे मोठे आहे. दामल्यांनी मराठीची सर्वसमावेशक अशी प्रयोगव्यवस्था लावली. त्यानंतर बहुतेक वैयाकरणांनी दामल्यांची प्रयोगव्यवस्था आधारभूत मानून प्रयोग चिकित्सा केली.

प्रयोगव्यवस्थेतएकूण किती प्रयोग मानावेत याबाबत मतमतांतरे आहेत. दादोबांनी कर्तरी, कर्मणी, भावे आणि भाव कर्तरी असे चार प्रयोग सांगितले आहेत. तर रा. भि. गुंजीकरांनी कर्तरी, कर्मणी, भावे असे तीन प्रयोग सांगितले आहेत. मो. के. दामले यांनी कर्तरी, कर्मणी,

भावे आणि संकीर्ण असे ४ प्रयोग सांगितले आणि त्याचे १६ उपप्रकार सांगितले आहेत. अशाप्रकारे अभ्यासकांमध्ये प्रयोगसंख्येबाबत मतमतांतरे असलेली दिसतात.

दामल्यांनी कर्तरी, कर्मणी, भावे आणि संकीर्ण असे चार मुख्य प्रकार आणि त्यांचे एकूण सोळा उपप्रकार सांगितले आहेत. ते पुढीलप्रमाणे –

१) कर्तरी
२) कर्मणी
३) भावे
४) संकीर्ण

**४.५.१ कर्तरी :**

ज्या वाक्यातील क्रियापद कर्त्याच्या पुरुष, लिंग, वचनाप्रमाणे बदलते त्या वाक्याचा प्रयोग कर्तरी प्रयोग असतो. कर्तरी प्रयोगात कर्ता प्रथमेत असतो.

- उदा.

* मी जातो.

* ती जाते.

* ते जातात.

* विद्यार्थी अभ्यास करतात.

* ती पुस्तक वाचते.

* तो पुस्तक वाचतो.

* ते हसतात.

* मुकुंद हसतो.

* कविता हसते.

* ती महाविद्यालयात जाते.

* तो महाविद्यालयात जातो.

* ते महाविद्यालयात जातात.

अशा प्रकारे वरील वाक्यांमध्ये कर्त्याच्या पुरुष, लिंग, वचनाप्रमाणे क्रियापद बदलताना दिसते.

*** कर्तरी प्रयोगाचे प्रकार -**

कर्तरी प्रयोगाचे दोन प्रकार आहेत.

**१)अकर्मक कर्तरी**

**२) सकर्मक कर्तरी**

**१) अकर्मक कर्तरी -**

कर्तरी प्रयोग असताना ज्या वाक्यात कर्म नसते त्या वाक्याला ‘अकर्मक कर्तरी प्रयोग' म्हणतात.

- उदा.

*ती बसते.

* तो बसतो.

*नदी वाहते.

*पाऊस पडतो.

*वारा वाहतो.

*मी जातो.

* ती जाते.

* ते जातात.

**२) सकर्मक कर्तरी-**

कर्तरी प्रयोग असताना ज्या वाक्यात कर्म असते त्या वाक्याला ‘सकर्मक कर्तरी प्रयोग' म्हणतात.

- उदा.

*तो <u>पुस्तक</u> वाचतो.

*ती <u>नाच</u> करते.

*मुकुंद <u>काम</u> करतो.

*कविता <u>बाजारात</u> गेली.

* तो <u>काम</u> करतो.

* विद्यार्थीनी <u>अभ्यास</u> करते.

कर्तरी प्रयोगात कर्ता बहुतेक प्रथमा विभक्तीत असतो आणि कर्म बऱ्याचदा प्रथमेत किंवा चतुर्थीत असतो.

- उदा.

*तो पत्र लिहितो. (प्रथमेतील कर्म)

*ते मला ओळखतात. (चतुर्थीतील कर्म)

*** कर्तरी प्रयोगाची लक्षणे -**

- कर्तरी प्रयोगात कर्ता प्रथमेत असतो.
- कर्तरी प्रयोगात कर्त्याला प्राधान्य असते.
- वाक्यातील क्रियापद कर्त्याच्या पुरुष, लिंग, वचनाप्रमाणे बदलते.
- कर्म असल्यास ते प्रथमा, द्वितीया किंवा चतुर्थीत असते.
- कर्तरी प्रयोगात भविष्यकालीन वाक्यरचनेत क्रियापद कर्त्याच्या लिंगानुसार बदलत नसून पुरुष व वचनाप्रमाणे बदलते.

### ४.५.२ कर्मणी प्रयोग :

ज्या वाक्यात क्रियापद कर्माच्या पुरुष, लिंग, वचनाप्रमाणे बदलते त्या वाक्याचा प्रयोग कर्मणी प्रयोग होय. कर्मणी प्रयोगात कर्म नेहमी प्रथमेत असते.

- उदा. i)मुलीने आंबा खाल्ला.
  ii)मुलाने आंबा खाल्ला.

पहिल्या वाक्यात ‘,मुलीने’ हा कर्ता आहे व ‘आंबा’ हे कर्म आहे. दुसऱ्या वाक्यात 'मुलाने' हा कर्ता आहे व 'आंबा' हे कर्म आहे. दुसऱ्या वाक्यात मुलीने ऐवजी ‘मुलाने’ असा कर्ता बदलला तरी क्रियापद ‘खाल्ला' तसेच राहिले. म्हणजेच कर्मणी प्रयोगात क्रियापद कर्त्याच्या पुरुष, लिंग, वचनाप्रमाणे बदलत नाही, तर ते कर्माच्या पुरुष, लिंग, वचनाप्रमाणे बदलते.

*** कर्मणी प्रयोगाचे प्रकार –**

कर्मणी प्रयोगाचे मुख्य दोन प्रकार पडतात.

**१) प्रधानकर्तृक कर्मणी**

**२) गौणकर्तृक कर्मणी**

**१) प्रधानकर्तृक कर्मणी :**

प्रधानकर्तृक कर्मणी प्रयोगात कर्त्यास महत्त्व असते.ज्या प्रयोगात क्रियापद कर्माच्या लिंग, वचनानुसार बदलत असूनही वाक्यात कर्ता प्रधान असतो, त्याला 'प्रधानकर्तृक कर्मणी प्रयोग' म्हणतात. प्रधानकर्तृक कर्मणी हा मराठीतील वैशिष्ट्यपूर्ण प्रकार आहे. हां प्रकार संस्कृत व इंग्रजीमध्ये आढळत नाही. संस्कृत व इंग्रजीतील कर्मणी प्रयोगात कर्ता नेहमीच गौण असतो. परंतु मराठीतील प्रधानकर्तृक कर्मणी प्रयोगात क्रियापद कर्मगामी असले तरी

कर्ताच प्रधान असतो. कर्ता जरी तृतीयांत किंवा चतुर्थीत असला तरी अर्थदृष्ट्या कर्त्यासच प्राधान्य असते.

- उदा.

*त्याने पुस्तक आणले.

*तिने काम केले.

* तिने नृत्य केले.

* पोलिसाने चोर पकडला.

प्रधानकर्तृक कर्मणीमध्ये अर्थाचा विचार केलेला आहे. म्हणून हा प्रयोग मानू नये असे काही व्याकरणकारांचे मत आहे.

**२) गौणकर्तृक कर्मणी :**

गौणकर्तृक कर्मणी हाच खरा कर्मणी प्रयोग असल्याचे मानले जाते. त्याचे ४ उपप्रकार पडतात.

**i)पुराण कर्मणी**

**ii) नवीन कर्मणी**

**iii) समापन कर्मणी**

**iv) शक्य कर्मणी**

**i) पुराण कर्मणी-**

पुराण कर्मणी हा प्रकार जुन्या कवींच्या काव्यात आढळतो म्हणून त्याला 'पुराण कर्मणी' असे म्हणतात.हा प्रयोग प्राचीन पद्यात दिसतो. आजच्या मराठीमध्ये तो दिसत नाही. प्राचीन मराठी काव्यात सकर्मक धातूला 'ज' हा प्रत्यय लावून करिजे, देईजे, बोलिजे अशी रूपे येतात,त्यांनाच 'पुराण कर्मणी' असे म्हटले जाते.

- उदा.

* 'नळे इंद्रासी असे बोलिजे|'

**ii) नवीन कर्मणी -**

ज्या कर्मणी प्रयोगात कर्त्यास 'कडून' हा शब्दयोगी अव्यय लावून नवीन पद्धतीने रचना केली जाते, त्यास 'नवीन कर्मणी प्रयोग' असे म्हणतात. नवीन कर्मणी हा प्रकार अर्वाचीन काळातील वाक्यरचनेमध्ये आढळतो. या प्रयोगात संयुक्त क्रियापदे दिसतात. कर्त्याला 'कडून' हे अव्यय लागलेले असते.

- उदा.

* शिपायाकडून चोर पकडला गेला.

* शिपायाकडून चोर पकडले जातात.

* रामाकडून रावण मारला गेला.

अशा वाक्यांमध्ये संयुक्त क्रियापदांचा वापर दिसतो आणि कर्ता शब्दयोगी अव्ययांत असतो.

**iii) समापन कर्मणी -**

क्रिया समाप्ती हा विशेष अर्थ समापन कर्मणी या प्रयोगातून व्यक्त होतो. या प्रयोगात कर्त्याला षष्ठीचे प्रत्यय लागलेले असतात, तसेच धातूला 'ऊन' प्रत्यय लागलेला असतो.

- उदा.

* त्याचे पत्र लिहून झाले.

* त्याचा निबंध लिहून झाला.

* त्याचे काम करून झाले.

* तिचे पुस्तक लिहून झाले.

* तिचे नृत्य करून झाले.

* त्याचे गाणे गाऊन झाले.

**iv) शक्य कर्मणी -**

शक्य कर्मणी प्रयोगातून शक्यतेचा अर्थ दिसतो. म्हणजेच क्रियेत शक्यता सूचित केलेली असते. कर्ता चतुर्थीत किंवा सहविकार तृतीयांत असलेला दिसतो.

- उदा.

* मला काम करवते.

* मला आज चालवते.

* माझ्याच्याने हे उचलवते.

* माझ्याच्याने जिना चढवतो.

*** कर्मणी प्रयोगाची लक्षणे -**

- सर्व प्रकारच्या कर्मणी प्रयोगात कर्म नेहमी प्रथमेत असते.
- क्रियापद कर्माप्रमाणे बदलते.
- कर्मणी प्रयोग फक्त सकर्मक धातूंबाबतच संभवतो.

- कर्मणी प्रयोगात कर्ता कधीच प्रथमेत नसतो, तर तो तृतीयांत आणि चतुर्थीत, षष्ठ्यंत किंवा शब्दयोगी अव्ययात असतो.
- पुराण कर्मणी व नवीन कर्मणी ही नावे अनुक्रमे प्रचारात नसलेला आणि नव्याने प्रचारात आलेला या अर्थाने योजली आहेत.

**४.५.३ भावे प्रयोग :**

ज्या वाक्यात क्रियापद कर्तृगामी नसते व कर्मगामीही नसते, म्हणजेच ते कर्ता किंवा कर्म यापैकी कोणाच्याही पुरुष, लिंग, वचनाप्रमाणे बदलत नाही, तर ते नेहमीच तृतीयपुरुषी नपुसकलिंगी एकवचनी असते त्या वाक्याला 'भावे प्रयोग' म्हणतात. भावे प्रयोगात क्रियापदाचा जो भाव असतो त्याकडे प्राधान्य असतेव कर्ता, कर्म गौण असतात.

- उदा.

*कविताने लवकर जावे.

* रामाने रावणास मारले.

* त्याने लवकर यावे.

*** भावे प्रयोगाचे प्रकार -**

भावे प्रयोगाचे दोन मुख्य प्रकार असून त्यांचे उपप्रकार संभवतात.

**१) प्रधानकर्तृक भावे**

**२) गौणकर्तृक भावे**

**१) प्रधानकर्तृक भावे :**

ज्या वाक्यात अर्थदृष्ट्या कर्त्याला प्राधान्य असते अशा भावे प्रयोगाला 'प्रधानकर्तृक भावे प्रयोग' असे म्हणतात. याचे कर्माच्या आधारे सकर्मक प्रधानकर्तृक भावे आणि अकर्मक प्रधानकर्तृक भावे असे उपप्रकार होतात.

*** प्रधानकर्तृक भावे प्रयोगाचे प्रकार**

**i) सकर्मक प्रधानकर्तृक भावे -**

ज्या भावे प्रयोगात कर्म असते त्याला 'सकर्मक प्रधानकर्तृक भावे' म्हणतात.

- उदा.

* आईने मुलाला मारले.

* रामाने रावणास मारले.

* मांजराने उंदरास पकडले.

**ii)अकर्मक भावे प्रयोग -**

ज्या भावे प्रयोगात कर्म नसते त्याला 'अकर्मक प्रधानकर्तृक भावे' म्हणतात.

- उदा.

* त्याने जावे

* तिने यावे

*आईने मारले

**२) गौणकर्तृक भावे :**

गौणकर्तृक भावे प्रयोग हाच खरा भावे प्रयोग मानला जातो. त्याचे उपप्रकार कर्मणी प्रयोगाच्या उपप्रकारांप्रमाणेच आहेत.

**१) पुराण गौणकर्तृक भावे**
**२) नवीन गौणकर्तृक भावे**
**३) समापन गौणकर्तृक भावे**
**४) शक्य गौणकर्तृक भावे**

**i) पुराण गौणकर्तृक भावे -**

पुराण गौणकर्तृक भावे हा प्रकार जुन्या कवींच्या काव्यात आढळतो. हा प्रयोग प्राचीन पद्यात दिसतो. आजच्या मराठीमध्ये तो दिसत नाही. या प्रयोगात क्रियापदात 'जे' प्रत्यय असतो.

- उदा.

* पुण्यात्मके पापे स्वर्गा जाईजे|

* पापात्मक पापे नरका जाईजे|

**ii) नवीन गौणकर्तृक भावे -**

नवीन गौणकर्तृक भावे हा प्रयोग अर्वाचीन काळातील वाक्यरचनेमध्ये आढळतो.

- उदा. त्याला पकडण्यात आले.

**iii) समापन गौणकर्तृक भावे –**

यात क्रियापद भावे असून क्रियासमाप्ती असा अर्थ असतो.

- उदा.

* तिचे काम करून झाले.

* त्याचे खेळून झाले.

* त्यांचे लिहून झाले.

* त्याचे जेवून झाले.

**iv) शक्य गौणकर्तृक भावे –**

या प्रयोगातून शक्यतेचा अर्थ असतो. म्हणजेच क्रियेत शक्यता सूचित केलेली असते.त्यामुळे वाक्यात शक्य धातू आलेले दिसतात.

- उदा.

* त्याला जाववते.

* तिला उठवते.

* तिच्याने चालवते.

*** भावे प्रयोगाची लक्षणे -**

- भावे प्रयोगात क्रियापद स्वतंत्र असते.
- मराठीच्या प्रकृतीस अनुसरून प्रधानकर्तृक कर्मणीप्रमाणेच प्रधानकर्तृक भावे प्रयोग सांगावा लागतो.
- गौणकर्तृक भावे प्रयोग हाच खरा स्वरूप अर्थदृष्ट्या भावे प्रयोग होय. अशा ठिकाणी क्रियापदांमध्ये स्पष्ट असा कोणताच कर्ता दिसत नाही. बऱ्याचदा तो अकर्मकही असतो. अशावेळी क्रियापद हेच वाक्य असलेले आढळते.
  उदा. मावळले, ढगाळले, उजाडले.

**४.५.४ संकीर्ण प्रयोग/ संकर प्रयोग :**

संकीर्ण प्रयोगात कर्तरी, कर्मणी, भावे यापैकी कोणत्याही दोन प्रयोगाची लक्षणे एकत्रित दिसतात. कर्तरी, कर्मणी आणि भावे अशा तीन मूळ प्रयोगांपासून संकराने कर्तृकर्म संकर, कर्मभाव संकर, कर्तृभाव संकर असे ३ प्रयोग संभवतात.

*** संकीर्ण प्रयोगाचे प्रकार**

**१) कर्तृकर्म संकर**

**२) कर्मभाव संकर**

**३) कर्तृभाव संकर**

**१) कर्तृकर्म संकर –**

ज्या संकीर्ण प्रयोगामध्ये धातूला कर्तृद्योतक व कर्मद्योतक असे प्रत्यय लागून क्रियापद साधलेले असते, म्हणजेच जो प्रयोग अंशत: कर्तरी आणि अंशत: कर्मणी असतो त्यास 'कर्तृकर्म संकर' असे म्हणतात.

- उदा.

* तू मला पुस्तक दिलेस.

तू मला पुस्तके दिलीस.

* तिने मला पुस्तक दिले.

तिने मला पुस्तके दिली.

**२) कर्मभाव संकर -**

ज्या प्रयोगात क्रियापद भावे असणे म्हणजेच तृतीयपुरुषी नपुसकलिंग एकवचनी असणे हे व्याकरणदृष्ट्या स्वाभाविक दिसते; पण त्याठिकाणी जेव्हा ते कर्मणी असते तेव्हा त्या प्रयोगास 'कर्मभाव संकर' असे म्हणतात.

- उदा.

* त्याने मुलाला शाळेत घातला.

* त्याने मुलीला शाळेत घातली.

* त्याने मुलांना शाळेत घातले.

**३) कर्तृभाव संकर -**

ज्या प्रयोगात क्रियापद भावे असते; पण त्याला कर्तृद्योतक प्रत्यय लागलेला असतो तेव्हा कर्तृभाव संकर प्रयोग होतो. हा प्रयोग अंशत: कर्तरी व अंशत: भावे असतो.

- उदा.

* तू मला वाचवलेस.

तिने मला वाचवले.

* तू घरी जायचे होतेस.

तिने घरी जायचे होते.

कर्तरी, कर्मणी आणि भावे या तीन प्रयोगांपासून तीन संकर होतात. या संकर किंवा संकीर्ण प्रयोगास दादोबा, गोडबोले इ. आद्य मराठी वैयाकरण अशुद्ध आणि निषिद्ध मानतात. पण हे संकर प्रयोग संस्कृत वाक्यरचनेच्या पद्धतीस अनुसरून आहेत. शिवाय मराठीची बोलीभाषा लक्षात घेता या प्रयोगांना अशुद्ध किंवा चमत्कारीक म्हणणे बरोबर नाही.

## ४.६ दामल्यांच्या प्रयोगव्यवस्थेची वैशिष्ट्ये

- दामल्यांनी लावलेली प्रयोगव्यवस्था सर्वसमावेशक आहे. ती प्रमाण मानली जाते.ही प्रयोगव्यवस्था मराठीतील सर्व प्रकारच्या वाक्यरचनांना सामावून घेते.
- प्रयोगांची लक्षणे, त्यांचे उपप्रकार, महत्त्वाच्या संकल्पना यांची सोदाहरण व व्यापक मांडणी मराठी व्याकरणात पहिल्यांदा दामल्यांनी केली.
- मो. के. दामले यांनी कर्तरी, कर्मणी, भावे आणि संकीर्ण असे ४ प्रयोग सांगितले आणि त्याचे १६ उपप्रकार सांगितले.
- पूर्व वैयाकरणांनी अशुद्ध म्हणून निषिद्ध मानलेले संकर प्रयोग दामल्यांनी रितसर दाखल करून घेतले.
- दामल्यांनी सांगितलेल्या उपप्रकारांबाबत मतभेद आढळले तरी प्रयोगविचारातील त्यांचे योगदान निर्विवादपणे मोठे आहे.
- बहुतेक व्याकरणकारांनी दामल्यांची प्रयोगव्यवस्था आधारभूत मानून प्रयोग चिकित्सा केली.

## ४.७ दामल्यांच्या प्रयोगव्यवस्थेतील विवाद्य मुद्दे

दामल्यांनी लावलेली प्रयोगव्यवस्था प्रमाण मानली गेली असली तरी त्यांच्या प्रयोगव्यवस्थेची चिकित्सा अर्जुनवाडकर, मा. ना. आचार्य यांनी केली आहे.

- दामल्यांनी कर्मणी आणि भावे प्रयोग यांचा 'प्रधानकर्तृक' असा जो प्रकार सांगितलातो अर्जुनवाडकर व मा. ना. आचार्य यांना अमान्य आहे. त्यांच्या मते, प्रधानकर्तृक हा प्रकार मानण्याचे कारण नाही. जेथे क्रियापद रूपदृष्ट्या कर्मगामी आहे तो कर्मणी आणि जेथे क्रियापद स्वतंत्र आहे तो भावे प्रयोग एवढेच स्पष्टीकरण पुरेसे आहे.

- दामल्यांनी गौणकर्तृक कर्मणीचे पुराण, कर्मणी, नवीन कर्मणी, समापन कर्मणी, शक्य कर्मणी असे जे उपप्रकार सांगितले ते विवादास्पद आहेत. पुराण कर्मणी हा प्रयोग वर्तमान मराठी गद्यातील नाही. त्यामुळे वर्तमान मराठीचे व्याकरण सांगत असताना पुराण किंवा प्राचीन मराठीत काय होते याच्या आधारे प्रयोग प्रकार सांगण्याची गरज नाही.

- नवीन कर्मणी हा प्रकारही इंग्रजीच्या अनुकरणातून मानण्यात आला आहे. 'शिपायाकडून चोर धरला जातो' अशी वाक्यरचना सांगून दामले त्याला नवीन कर्मणी असे नाव देतात. हा प्रकार संयुक्त क्रियापद यावर आधारलेला आहे. 'संयुक्त क्रियापद' ही संकल्पना मराठीत प्रामादिक आहे. त्यामुळे संयुक्त क्रियापद ही संकल्पना स्वीकारून त्याच्या आधारे नवीन कर्मणी हा प्रयोग प्रकार मानणे हे मराठीच्या दृष्टीने अप्रस्तुत आहे.

- समापन कर्मणी हा उपप्रकार मानताना वाक्य लक्षात घेतले जाते. एकदा कर्ता, कर्म, क्रियापद यांचा रूपदृष्ट्या अन्वय लक्षात घेऊन कर्तरी, कर्मणी, भावे इत्यादी प्रयोगप्रकार करण्याचे ठरवल्यानंतर अर्थाकडे लक्ष देणे सदोष आहे.

- शक्य कर्मणी हा प्रयोग मानतानाही शक्यतेचा अर्थ हा आधार घेतला आहे, म्हणून तोही व्याकरणदृष्ट्या सदोष आहे. व्याकरणाने रुपदृष्टीला महत्त्व दिले पाहिजे. रूपदृष्टीला महत्त्व दिल्यास केवळ कर्मणी प्रयोग हा एकच प्रयोग असू शकतो. त्याचा कुठलाही उपप्रकार उभा राहू शकत नाही कारण ते सगळे अर्थावरून आलेले आहे.

- दामल्यांनी संकर प्रयोगासाठी वापरलेल्या 'संकिर्ण' या संज्ञेवरही आक्षेप घेतला गेला.तसेचसंकीर्ण प्रयोगास दादोबा, गोडबोले इ. आद्य मराठी वैयाकरण अशुद्ध आणि निषिद्ध मानतात.

थोडक्यात दामल्यांनी काही ठिकाणी रूपदृष्टीपेक्षा अर्थदृष्टीला अधिक महत्त्व दिले आहे.व्याकरणाने रूपदृष्टीला महत्त्व दिले पाहिजे.

## ४.८ समारोप

अशाप्रकारे वरील विवेचनावरून दामलेकृत प्रयोगव्यवस्था स्पष्ट होते. मराठी व्याकरणात दामल्यांनी लावलेली प्रयोगव्यवस्था प्रमाण म्हणून स्वीकारण्याचा अनेकांचा कल आहे. दामल्यांनी सांगितलेल्या उपप्रकारांबाबत मतभेद आढळले तरी प्रयोगविचारातील त्यांचे योगदान निर्विवादपणे मोठे आहे. प्रयोगांची लक्षणे, त्यांचे उपप्रकार, महत्त्वाच्या संकल्पना यांची सोदाहरण व व्यापक मांडणी मराठी व्याकरणात पहिल्यांदा दामल्यांनी केली. त्यांनी मराठीची सर्वसमावेशक अशी प्रयोगव्यवस्था लावली. त्यानंतर बहुतेक वैयाकरणांनी दामल्यांची प्रयोगव्यवस्था आधारभूत मानून प्रयोग चिकित्सा केली.

एकंदरया अभ्यासघटकामध्ये आपण कर्ता, कर्म, पूरक, क्रियापद या संकल्पनांचा परिचय करून घेतला. कर्तरीप्रयोग, कर्मणी प्रयोग, भावे प्रयोग आणि संकीर्ण प्रयोग यांच्या व्याख्या व प्रकार, उपप्रकार समजून घेतले. तसेच दामल्यांच्या प्रयोगव्यवस्थेच्या वैशिष्ट्यांसोबतच प्रयोगव्यवस्थेतील विवाद्य मुद्देही अभ्यासले.

**आपली प्रगती तपासा :**

१) प्रयोग व्याख्या-

## ४.९ स्वाध्याय

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१) प्रयोग म्हणजे काय ते सांगून दामलेकृत प्रयोगव्यवस्थेचा सविस्तर आढावा घ्या.

२) कर्तरी प्रयोग आणिकर्मणी प्रयोग म्हणजे काय ते सांगूनत्यांच्या प्रकारांचे सोदाहरण विवेचन करा.

३) भावेप्रयोग आणिसंकीर्ण प्रयोगाच्या व्याख्या मांडून त्यांच्या प्रकारांचे विस्तृत विवेचन करा.

४) प्रयोगविचार हा वाक्यविचार आहे, असे का म्हटले जाते ते सांगून त्याआधारे दामलेकृत प्रयोगव्यवस्थेची चर्चा करा.

**टीपा**

**१)** प्रयोगसंकल्पना

**२)** कर्तरी प्रयोग

**३)** कर्मणी प्रयोग

**४)** भावे प्रयोग

**५)** संकीर्ण प्रयोग

**६)** प्रयोगव्यवस्थेतील विवाद्य मुद्दे

**७)** कर्म संकल्पना

**८)** पूरकसंकल्पना

**९)** क्रियापद

**१०)** कर्ता संकल्पना

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) कर्तरी प्रयोग म्हणजे काय?

२) कर्मणी प्रयोग म्हणजे काय?

३) 'प्रयोग' म्हणजे काय?

४) मराठीची सर्वसमावेशक अशी प्रयोगव्यवस्था कोणी लावली?

५) भावे प्रयोग म्हणजे काय?

६) संकर प्रयोग म्हणजे काय?

७) मो. के. दामले यांनी कोणते प्रयोग सांगितले?

८) दादोबांनी एकूण किती प्रयोग सांगितले व ते कोणते?

९) संकीर्ण प्रयोगाचे प्रकार कोणते आहेत?

१०) कर्मणी प्रयोगाच्या प्रकारांची नावे लिहा.

११) क्रियापद म्हणजे काय?

१२) 'शिपायाकडून चोर पकडला जातो' हे कोणत्या प्रयोगाचे उदाहरण आहे?

१३) रा. भि. गुंजीकरांनी एकूण किती प्रयोग सांगितले व ते कोणते?

१४) दामल्यांनी कर्मणी आणि भावे प्रयोग यांचा 'प्रधानकर्तृक' असा जो प्रकार सांगितला तो कोणी अमान्य केला?

१५) "कर्ता, कर्म, क्रियापद यांच्या अन्वयसंबंधांचे विधान म्हणजे प्रयोग होय", ही व्याख्या कोणाची?

## ४.१० संदर्भग्रंथ


- दामले मो. के.,शास्त्रीय मराठी व्याकरण, तिसरी आवृत्ती, पुणे, १९६५.
- अर्जुन वाडकर कृ. श्री., मराठी व्याकरण वाद आणि प्रवाद, सुलेखा प्रकाशन, पुणे, १९८७.
- अर्जुन वाडकर कृ. श्री., मराठी व्याकरणाचा इतिहास, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ, १९९२.
- आचार्य मा. ना.,मराठी व्याकरण विवेक, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २००१.
- मंगरूळकर अरविंद, मराठी व्याकरणाचा पुनर्विचार,पुणेविद्यापीठ, १९६४.
- गुंजीकर रा.भि.,मराठी व्याकरणावर विचार, रा.भि.गुंजीकर यांचे संकलित लेख खंड १.
- दीक्षित प्र. ना.,मराठी व्याकरण: काही समस्या, शुभदा प्रकाशन, फलटण, १९७५
- गोविलकर लीला,मराठीचे व्याकरण, मेहता पब्लिशिंग, पुण, १९९३.


❖❖❖❖

## सत्र – ६ वे श्रेयांकने -४ व्याख्याने -६०

## मराठी व्याकरण

*उदिष्टे (Objective)*

*१ . मराठी व्याकरणाचा इतिहास व विविध व्याकरण कर्त्यांचा परिचय करुन घेणे.*

*२. शब्दाचे वर्गीकरण समजावून घेणे*

*३. विकारण विचार समजावून घेणे*

*४. शब्द घटना समजावून घेणे*

**घटक -१ शब्दांचे वर्गीकरण– पारंपरिक व आधुनिक**

**घटक –२ विकरण- लिंग, वचन, विभक्ती, आख्यात.**

**घटक-३ शब्दसिद्धी**

**घटक-४ प्रयोग विचार**

## सत्रान्त परीक्षा ( गुण १००)

प्रश्न १. घटक १ वर आधारित प्रश्न ( पर्यायासह) गुण २०
प्रश्न २. घटक २ वर आधारित प्रश्न ( पर्यायासह) गुण २०
प्रश्न ३. घटक ३ वर आधारित प्रश्न ( पर्यायासह) गुण २०
प्रश्न ४. घटक ४ वर आधारित प्रश्न (पर्यायासह ) गुण २०
प्रश्न ५. सर्व घटकांवर आधारित दोन टीपा (पर्यायासह ) गुण २०

***साध्ये (Outcome)***

***१) मराठी व्याकरण व्यवस्थेचा सूक्ष्म परिचय होईल***

***२) मराठी व्याकरण व्यवस्थेतील समस्या लक्षात येतील***

**संदर्भ ग्रंथ-**


१) मराठी व्याकरण वाद आणि प्रवाद, कृष्ण श्री अर्जुनवाडकर
२) मराठी व्याकरण काही समस्या : प्र. ना. दीक्षित
३) मराठी व्याकरणाचा इतिहास कृष्ण श्री अर्जुनवाडकर
४) मराठी व्याकरण : मो. रा. वाळंबे
५) मराठी व्याकरणविवेक : मा. ना. आचार्य
६) मराठी व्याकरणाचा पुनर्विचार :अरविंद मंगरुळकर
७) मराठीचे व्याकरण : लीला गोविलकर
८) शास्त्रीय मराठी व्याकरण : मोरो केशव दामले